म. ग्रं. सं. ठाणे



REFBK-0008196

# विवेकानंद काय म्हणाले?

## कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ।

— वि. वि. पेंडसे

# विवेकानंद काय म्हणाले?

## कृण्वन्तो विश्वम् आर्यम् !

३६९४३ वि: निबंध
१५०९ नों: दि: ८.८.६७

वि. वि. पेंडसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८१९९
संदर्भ शाखा

मूल्य रु. १.५०

# अ नु क्र म


पृष्ठ

१) प्रस्तावना

२) भो गुरो ! नतयस्त्वयि

३) विवेक-पथ-दर्शन १–४९

अ) स्वामीजींचे हिंदुत्वावरील विचार १–३२

आ) आम्हापुढील कार्य ३२–३९

ओ) हिंदुस्थानचा भविष्यकाळ ४०–४९

४) हिंदुराष्ट्र–विवेचन ५०–८५

५) उपसंहार, आक्षेप-विचार ८६–१११



प्रकाशक
वि. वि. पेंडसे
B. Sc., M. Ed., Ph. D.
नवा ५१४ सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक
रा. कृ. कुलकर्णी
एकता मुद्रण
४४६ शनिवार पेठ, पुणें २.

REFBK-0008196

# …वना

'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' या चरित्रग्रंथांत आलेला विचार-मंथन आणि परिशिष्टें हा अखेरचा मजकूर स्वतंत्र रीत्या छापावा, म्हणजे तो कमी किंमतींत मिळून स्वतंत्र अभ्यासाला उपयोगी पडेल, अशी इच्छा अनेक वाचकांनीं प्रदर्शित केल्यावरून, 'विवेकानंद काय म्हणाले?' या नव्या छोटया पुस्तकाचा उपक्रम करण्यांत आला.

हें छोटें पुस्तक नव्यानें छापावयाचें म्हटल्यावर पहिल्या मजकुरांत पुष्कळच भर घातली. या नव्या पुस्तकाचा उपसंहार तर नव्यानेंच लिहिलेला आहे, तसेंच 'विवेकपथदर्शन' या प्रकरणांतहि परिशिष्टांत आलेल्यापेक्षां बराच मजकूर नवीन घातलेला आहे. 'हिंदुराष्ट्र-विवेचन या प्रकरणांत स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचें मंथन करून–'हिंदु'–शब्दार्चा व्याख्या काय, राष्ट्र कशास म्हणावें, आणि हिंदुराष्ट्र म्हणजे काय, याचा ऊहापोह लेखकानें केलेला आहे. उपसंहारांत स्वामी विवेकानंद आणि हिंदु-मुसलमान समन्वयवाद याची चर्चा केलेली आहे. ही चर्चा सामान्येंकरून विचारवंतांची खात्री पटविणारी आहे. तथापि असेहि टीकाकार निघतील आणि याच मजकुरांतील उताऱ्यांच्या आधारें स्वामी विवेकानंद हे हिंदु-मुसलमान यांच्या समन्वयाचे, मिश्रणयुक्त अशा तिसऱ्याच एका संस्कृतीचे चाहते होते असें प्रतिपादन ते करतील. अर्थात् आलेल्या सर्व पुराव्यावर विचार केल्यानंतर ज्याला जें मत ग्राह्य वाटेल तें त्याला प्रतिपादन करण्याचा अधिकार आहेच.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति संपून सुमारें दोन वर्षे होऊन गेली. कल्पनेपेक्षा या पुस्तकाचें स्वागत खूपच झाले. आताची ही दुसरी आवृत्ति पहिल्या इतकीच लोकोपयोगी होईल असा विश्वास वाटतो.

नव्या आवृत्तीच्या उपसंहारांत दोन पाने मजकूर अधिक घातलेला आहे.

**गीता जयंति** …नेधला, अशा हे मा… वि पेंडसे

मार्गशीर्ष शुद्ध ११, शके १८… वावें अशी इच्छा करणारा मी

दि. १०-१-१९५४

ॐ

ममैताः कोटिशः सन्तु

## भो गुरो ! नतयस्त्वयि ॥

रोपितः श्रीविवेकेन केशवेन च पोषितः ।
तरुः सफलतां नेयः हेतुः यस्यायमायुषः ॥१॥
तस्मै मोहपरिभ्रान्तचेतसां विस्मृतात्मनाम् ।
नमः प्रदीपभूताय माधवाय यतात्मने ॥२॥

एकात्म भारतं राष्ट्रम् आसेतुधवलाचलम् ।
साक्षात्कृत्य स्वयं लोकान् भवान् प्रत्याययत्यदः ॥३॥
असक्तोऽपि विरक्तोऽपि भवांश्चिन्ताकुलः सदा ।
पौरुषं सङ्घवृत्तिश्च यूनामाविर्भवेत् कथम् ॥४॥
एष देशः स्वसंस्कृत्या प्राचीनतमया कथम् ।
भूत्वा प्रबुद्धचैतन्यः गरिमाणं भजेदिति ॥५॥
नक्तंदिवमियं चिन्ता मनो दहति तावकम् ।
प्रणतिः कोटिशस्तेऽस्तु हे माधव महाधृते ॥६॥

तरङ्ग इव चैतन्यसागरेऽस्मिन्नहं सदा ।
विहरेयमविच्छिन्नः स्वकर्तव्यपरायणः ॥७॥
अक्षयस्फूर्तिदानेन कार्यनिर्वृत्तिसाधना ।
सततं मे मनस्यास्तां मूर्तिस्ते चेतनामयी ॥८॥

यदालोकनमात्रेण च्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
[illegible] स्वात्माभिषिच्यते ॥९॥
[illegible] युज्यमिच्छतः ।
[illegible] गुरो ! नतयस्त्वयि ॥१०॥

ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ३६८४ वि:
क्रमांक १५०८ नों दि ६.८.६८

ॐ

# हे गुरो ! तुला मी

# कोटिकोटि प्रणाम करतों !

श्रीविवेकाचें उर्वरित कार्य जो चालवित आहे, श्रीकेशवानें आपल्या कार्याची धुरा ज्याचेकडे दिलेली आहे, चारी दिशा मोहव्याप्त होऊन जनमनाला विस्मृतीकडे खेचीत नेत असतांना स्वतेजानें मोहान्धकाराचा नाश करून राष्ट्राला जो कर्तव्याभिमुख करतो, त्या विशुद्धात्म माधवाविना कोणास बरें प्रणिपात करावा ?

सेतूपासून हिमालयापर्यंत एकात्म भारताचा साक्षात्कार तो घडवीत आहे; स्वत: सर्वसंगपरित्यागी असतांना हा देश, ही प्राचीनतम संस्कृति, हे कोटिकोटि लोक जागृतचैतन्य कसे होतील, त्यांचेमधून संघवृत्तीचे नि पौरूषाचे प्रवाह कसे वाहते होतील याचीच चिन्ता त्याला रात्रंदिवस जाळीत आहे; अशा या महाधैर्यशील माधवाविना विनम्रभावानें कोटिकोटि प्रणाम मी कोणास बरें करूं ?

तरंग समुद्राचा आहे, समुद्र तरंगाचा नव्हे–तसें माझें जीवन या विशाल चैतन्यसागरावर तरंगरूपानें कर्तव्य करीत असों दे ! त्याचें चिन्तन दिनरात्र घडून त्यांतून कार्यास लागणारी अपरंपार शक्ति नि अमित स्फूर्ति आम्हांमधून प्रकट होऊं दे !

ज्याच्या दर्शनमात्रेंकरून सर्व संशय निखंदून जातात आणि जणूं कांहीं पुण्यामृताच्या वृष्टीनें आत्मा न्हाऊन निघतो, अशा हे माधवा ! हे गुरो ! या चैतन्याशीं एकरूपत्व पावावें अशी इच्छा करणारा मी तुला पुन: पुन: कोटिकोटि प्रणाम करतों !

८१८६

ॐ

१

# स्वामीजींचें हिंदुत्वावरील विचार

## हिंदु नांव कशावरून-सिंधुवरून

जुन्या पारसिकांनीं सिंधूच्या पलीकडे राहणाऱ्या लोकांना हिंदु हें नांव दिलें. संस्कृतमध्यें जेव्हां जेव्हां 'स' येतो तेव्हां तेव्हां त्याच्या जुन्या पारसिक भाषेमध्यें 'ह' होतो. म्हणून पारसिक लोक आपणांस सिंधुवरून हिंदु म्हणूं लागले. ग्रीक लोकांना या 'ह' चाहि उच्चार करिता येत नाहीं. ते 'ह' चा उच्चार 'इ' असा करतात. त्यावरून लोक आपणांस इंडियन म्हणूं लागले.

(हिंदुजीवनांतील वेदान्तांचें आचरण–पान २२८)

## कुलपरंपरेचा उगम अध्यात्मांत

असा देश तुम्हांला माहीत आहे का कीं जेथील मोठेमोठे सम्राट आपली कुलपरंपरा कोण्या राजाशीं नेऊन भिडवीत नाहींत, अथवा कोण्या दऱ्याखोऱ्यांत लपून राहणाऱ्या, वेळीं अवेळीं लोकांना लुटणाऱ्या पेंढारी सर-

दाराशी जोडीत नाहीत, तर अर्धनग्न, गुहेंत राहणाऱ्या ब्रह्मवेत्त्यांशीं नेऊन भिडवितात ? हिंदुस्थान देश असा आहे !

एवढ्याकरितां तुम्हांला आवडो वा न आवडो, राष्ट्रीय जीवनासाठीं एका हातानें आपलें अध्यात्म पक्कें धरून ठेवा आणि मग दुसऱ्या हातानें इतर राष्ट्रांपासून जें मिळवणें शक्य असेल तें मिळवा.

(रामनद येथील मानपत्राला उत्तर–पान १५३)

## हिंदुजातीचें चैतन्य केवळ धर्मच

मीं पश्चिमेंत जाऊन अत्यंत अल्प असें काम केलें. पण कोलंबोपासून या शहरापर्यंत– कुंभकोणम्‌पर्यंत –प्रत्येक गांवानें आत्मीयतेनें, स्नेहार्द्रतेनें माझें स्वागत केलें. ती आत्मीयता कल्पनातीत आहे. आपणां हिंदूंच्या, हिंदुजातीच्या परंपरेला हें साजेसेंच आहे ! कारण या हिंदुजातींचें चैतन्य, हिचा जीवनाधार, हिचा आत्मा म्हणजे केवळ धर्मच आहे !

(वेदान्तप्रसाराचें कार्य–पान १७७)

## आपल्या देशांत धर्माचें स्थान कोणतें ?

प्रत्येक देशाची स्वतंत्र, विशिष्ट अशी कामाची पद्धत असते. कांहीं राजकारणाच्या द्वारें प्रगति करतात, कांहीं सामाजिक प्रश्नांच्याद्वारें प्रगति करतात. आपणांस धर्म हें एवढेंच साधन उपलब्ध आहे कीं, ज्याच्या साहाय्यानें आपण हालचाल करूं शकूं. इंग्लिश माणसाला धर्मसुद्धा राजकारणाच्या वाटेंच कळूं शकतो. अमेरिकन माणसाला सामाजिक सुधारणांच्या वाटें धर्म कळतो, पण आम्हां हिंदूंना राजकारणहि कळूं शकेल तें केवळ धर्माच्याच वाटें ! समाजशास्त्रहि कळूं शकेल तेंसुद्धां धर्माच्या वाटें ! प्रत्येक गोष्ट धर्माच्याच मुखांतून आली पाहिजे. कारण धर्म हाच येथील ओंकारध्वनि आहे. बाकीचे सूर म्हणजे या राष्ट्रीय जीवनसंगीतांतील केवळ संवादी सूर आहेत.

(कलकत्त्याच्या मानपत्राला उत्तर–पान ३१४)

## आपला राष्ट्रीय स्वभाव कोणता ?

सर्व भौतिक शास्त्रें आपणांस काय देतील ? अन्न देतील, कपडा देतील, मनुष्यावर अधिकार गाजविण्यास शिकवितील, मनुष्याला जिंकावयास शिक-

वितील, थोडक्यांत म्हणजे सबळानें दुर्बलावर सत्ता कशी गाजवावी हें शिकवितील. हिंदूची इच्छा असती तर हीं भौतिक शास्त्रें त्यानें केव्हांच शोधून काढलीं असतीं. पण परमेश्वराच्या कृपेमुळें तो त्या पलीकडे पाहूं शकला. आणि हा पैलतीर अतिभव्य, अनंतपटींनीं उच्च आणि अनंतपटींनीं प्रसादयुक्त आहे. हा अध्यात्मांचा पैलतीर आत्मसात् केल्यानंतर, बापापासून मुलाकडे असें सहस्रों वर्षे होतां होतां, हा विचार म्हणजे आमच्या राष्ट्रीय स्वभावांतील महत्त्वपूर्ण गुणविशेष होऊन बसला. आमच्या रक्ताच्या कणां-कणांत याच कल्पना जाऊन बसल्या. इतक्या कीं, हिंदु आणि धर्म या दोन कल्पना शेवटीं अभिन्न ठरल्या.

(हिंदुत्वांतील समान भूमिका–पान ३७१)

## राष्ट्र कोणाचें

जोंपर्यंत आमचा हा स्वभाव आम्हीं संभाळून ठेवलेला आहे तोंपर्यंत आम्ही प्रल्हादाप्रमाणें अग्निदिव्यांतूनहि सुखरूप बाहेर येऊं. हिंदु हा जर आध्यात्मिक नसेल तर मी त्याला हिंदूच म्हणणार नाहीं. दुसऱ्या देशामध्यें मनुष्याचें राजकीय व्यक्तित्व हें प्रधान असतें, त्यानंतर पाहिजे असल्यास त्यानें धर्माचरण करावें. परंतु हिंदुस्थानांत प्रथम आणि सर्वांत महत्त्वाचें कार्य म्हणजे त्या व्यक्तीनें प्रथम धार्मिक असलें पाहिजे. नंतर लागल्यास अन्य गोष्टी थोड्याबहुत केल्यास चालेल......हिंदुस्थानांतील राष्ट्रीय ऐक्य म्हणजे इतस्ततः विखुरलेल्या आध्यात्मिक विचारशक्तीचें एकत्रीकरण आणि हिंदुस्थानामधील राष्ट्र म्हणजे ज्यांच्या अंतःकरणांत समान अध्यात्म-विचारांचे ध्वनि उठतात त्यांचें राष्ट्र.

(हिंदुत्वांतील समान भूमिका–पान ३७१)

## आमचें चिरंजीवित्व कशांत आहे ?

जसें व्यक्तीला व्यक्तिमत्व असतें तसें राष्ट्रालासुद्धां व्यक्तिमत्व असतें, प्रत्येक राष्ट्राचा कांहीं एक संदेश आहे; प्रत्येक राष्ट्राला कांहीं एक विशिष्ट कार्य साधावयाचें आहे. आपल्या वंशाचें, आपल्या राष्ट्राचें कार्य काय आहे हें आपण समजून घेतलें पाहिजे. आपण बाल असतांना गोष्टी ऐकल्या आहेत कीं, सापाच्या डोक्यावर जोंपर्यंत मणि आहे तोंपर्यंत साप मरत नाहीं.

राक्षसांच्या गोष्टी आपण ऐकल्या आहेत कीं, अमक्या राक्षसाचा प्राण अमक्या पक्ष्यांत असतो; कांहींहि करा तो पक्षी मेल्याशिवाय राक्षस मरत नाहीं. राष्ट्राचें तसेंच असतें. राष्ट्राच्या राष्ट्रीयत्वामध्यें असें क स्थान असतें कीं, त्याचा नाश झाल्याविना राष्ट्र मरणें शक्य नाहीं.

जगाच्या इतिहासांतील एका अद्‌भुत प्रकाराची मीमांसा वरील कल्पनेच्या आधारें आपण करूं शकूं. या आपल्या पवित्र भूमीवर अत्याचारी आक्रमकांच्या लाटांमागून लाटा आल्या. 'अल्ला हो अकबर' या आरोळचांनीं शेंकडों वर्षें आकाश कुंद होऊन गेलें होतें. आपलें आयुष्य कोणत्या क्षणीं संपेल याची शाश्वती कोण्या हिंदूला राहिली नव्हती! जगांतील सर्व इतिहासांत या भूमीइतकें दुःख आणि या भूमीला दास्यामध्यें जखडण्याकरितां केली गेली तितकी धडपड दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या अनुभवास आलेली नाहीं. पण तरीसुद्धां आज आपण जवळ जवळ जसेच्या तसे खडे आहोंत, इतकेंच नव्हे तर प्रसंग आल्यास पुन्हां तशा सर्व संकटांना परतवून लावण्यास सिद्ध आहोंत. त्याच्याहि पुढें आजचीं चिन्हें अशीं दिसत आहेत कीं हिंदुस्थानाबाहेरहि आम्ही जाऊं शकूं खरोखरीच बाहेर जाणें, वाढणें हेंच जिवंतपणाचें निदर्शक आहे.

(हिंदुत्वांतील समान भूमिका–पान ३६९–७०)

## समाजवादी कल्पना पसरविण्यापूर्वीं

एवढ्यासाठीं अन्य कोणत्याहि सुधारणा करण्यापूर्वीं हिंदुस्थानांत धर्मजागृति केली पाहिजे. समाजवादी अथवा अन्य राजकीय कल्पना हिंदुस्थानांत पसरविण्यापूर्वीं या भूमींत अध्यात्माचें पुरेसें सिंचन होऊं द्या.

(माझ्या कार्याची रूपरेखा–पान २२१)

## हिंदु हाच गौरव-शब्द

आपण हिंदु आहोंत. हिंदु ह्या शब्दांतून मला कोणताहि वाईट अर्थ ध्वनित करूं द्यावयाचा नाहीं. त्यामध्यें कांहीं वाईट अर्थ आहे याशीं मी सहमत नाहीं. भूतकाळामध्यें सिंधूच्या इकडच्या बाजूला राहणारे ते हिंदु इतकाच त्याचा अर्थ होता. आपला जे द्वेष करीत आले त्यांनीं या शब्दाला वाईट अर्थ चिकटविला असेल पण त्याचें काय? हिंदु या शब्दानें जें उज्ज्वल आहे, जें आध्यात्मिक आहे त्याचा निर्देश होतो अथवा जें लज्जास्पद आहे,

जें पायतळीं तुडविलें गेलेलें आहे, जें भिकारडें आहे, त्याचा बोध होतो हें आम्हांवर अवलंबून आहे. आज हिंदु शब्दानें कांहीं वाईट अर्थ उत्पन्न होत असेल तरी हरकत नाहीं. कोणत्याहि भाषेंतील अधिकांत अधिक गौरवपूर्ण अर्थ आपल्या कृतींनीं या हिंदु शब्दाला आणून देण्यासाठीं आपण सिद्ध होऊंया. स्वतःच्या पूर्वजांची लाज न बाळगणें हें मी माझ्या आयुष्यांतील एक तत्त्व समजत आलों आहें. मी एक अत्यंत स्वाभिमानी मनुष्य आहें. पण हा स्वाभिमान मला पूर्वजांमुळें प्राप्त झाला. भूतकाळाचा जेवढा मी अधिक अभ्यास करतों तितका हा स्वाभिमान प्रदीप्त होतो. त्या स्वाभिमानानेंच सामर्थ्य-युक्त आणि धैर्यपूर्ण निष्ठा मला प्रदान करून धुळींतूनहि वर उचलून उभें केलें आहे, नि पूर्वजांच्या वशचैतन्यानें नियोजिलेल्या कार्याला प्रवृत्त केलें आहे ! अशा त्या पुरातन आर्यांच्या सुपुत्रांनों, तोच स्वाभिमान तुम्हांमध्यें अवतीर्ण होवो.

(हिंदुत्वांतील समान भूमिका—पान ३६८)

## हिंदुत्वाच्या मर्यादा

'प्रबुद्ध भारत' मासिकाच्या वार्ताहराला एप्रिल १८९९–मध्यें दिलेली मुलाखत.

'स्वामीजी, हिंदुधर्मांतून जे लोक बाटविले गेले त्यांना परत आपल्या धर्मांत घेण्याबद्दल आपलें काय मत आहे ? त्यांना घ्यावें का ?'

'घ्यावें म्हणजे ?' स्वामीजी उत्तरले, 'घेतलेंच पाहिजे.' ते किंचित् वेळ विचारमग्न मनःस्थितींत थांबले. क्षणभरानें ते पुढें बोलूं लागले, 'दुसरें असें कीं तसें न केल्यास आपली संख्या घटेल. सर्वांत जुना मुसलमान इतिहासकार फेरिस्ता याच्या मतानुरूप मुसलमान या प्रदेशांत प्रथम आले त्या वेळीं हिंदूंची लोकसंख्या साठ कोटि होती. सध्यां आपण सुमारें वीस कोटि आहोंत. पुन्हां असें कीं हिंदुत्वांतून पलीकडे जाणारा मनुष्य हिंदूंची संख्या केवळ एकानें घटवितो असें नाहीं तर शत्रूची एकानें वाढवितो.

'त्याविना मुसलमान किंवा ख्रिश्चन बाटग्यांतील बहुसंख्य तलवारीच्या जोरावर बाटलेले आहेत अथवा अशांचे वंशज तरी आहेत. अशांना दूर लोटणें हें केव्हांहि बरें होणार नाहीं. तुम्ही विचाराल जे निखालस परजातीचे, परधर्मांचे असतील त्यांचें काय ? भूतकालांत असे कित्येक परजातीय, हिंदु

धर्मांत स्वीकारले गेले आहेत. अजूनहि हा प्रघात चालूच आहे. आतांपर्यंत आपल्या सीमेवरच्या रानटी टोळ्यांना आपण आत्मसात् केलें तसेंच मुसलमानांपूर्वींच्या सर्व परकीय आक्रमकांनाहि आत्मसात् केलें आहे.

'जे स्वेच्छेनें परधर्मांत गेले ते परत स्वधर्मांत येऊं लागले तर त्यांना शुद्ध करावें हें ठीक आहे, पण काश्मीर आणि नेपाळमधल्याप्रमाणें जे परक्यांच्या स्वाऱ्यांत अत्याचारांमुळें विधर्मी झाले, अथवा जे रक्तानेंच परधर्मीय आहेत त्यांना हिंदुधर्मांत प्रवेश करतांना कोणतेंहि प्रायश्चित्त असूं नये.'

'पण यांची जात कोणती ?' वार्ताहरानें विचारलें.

'पूर्वी वाटलेले जेव्हां स्वधर्मांत येतील तेव्हां त्यांची पूर्वीची जात त्यांना मिळावी. हिंदुधर्मांत जे नव्यानें प्रवेश करतील त्या सर्वांची मिळून एक नवीनच जात घडवावी. वैष्णव पंथानें हेंच केलें. निरनिराळ्या जातींचे आणि परकी धर्मांचे लोकहि वैष्णवपंथांत आले. त्या साऱ्यांची मिळून एक जात झाली. ती जात सन्मान मिळवूं शकली. रामानुजाचार्यांपासून चैतन्यापर्यंत सर्व वैष्णवांनीं हेंच केलें.'

'यांची लग्नें कशी व्हावींत ?'

'या नव्या लोकांनीं परस्परांत लग्नें करावींत.'

'परधर्मांतून जे हिंदुधर्मांत येतात त्यांनीं आपली पूर्वींचीं नांवें बदललीं पाहिजेत ना ?' वार्ताहरानें विचारलें, 'त्यांना जातीचेंच नांव आडनांव म्हणून द्यावें काय ?'

'अगदीं बरोबर', स्वामीजीनीं विचारपूर्वक उत्तर दिलें. 'नांवांत मोठेंच सारगर्भ आहे!'

(Complete Works of : Vol : V Page 162, Edition III)

## पुनरपि हिंदुरूप दिलें

जगन्नाथपुरीचें मंदिर हें मुळांत बौद्ध-मंदिर होतें. तें आपण हातांत घेतलें आणि त्याला पुनरपि हिंदुरूप दिलें. यासारख्या अनेक गोष्टी आपणांस अजूनहि कराव्या लागतील.

(हिंदुस्थानांतील ऋषिमुनि–पान २६४)

## त्यागेनैके अमृतत्त्वमानशुः

वैराग्य अथवा संन्यास यानेंच धर्माचा प्रारंभ होतो. संन्यास आचरणाविना धर्म अथवा नीतिमत्ता कोठून येणार ?

न प्रजया, धनेन, त्यागेनैके अमृतत्वमानशुः ।

प्रजोत्पादनानें नव्हे, संपत्तीनें नव्हे. केवळ त्यागानेंच ब्रह्मपद मिळूं शकतें.

( वेदान्ताचा अंगोपांगासह विचार–पान ३४३ )

## हिंदुजीवनाचें ध्येय

हिंदु जीवनपद्धतीचें सन्यास हेंच ध्येय आहे. आपल्या शास्त्रानुसार प्रत्येकानें संन्यास घेतलाच पाहिजे. आयुष्यांतील सुखदुःखांचा अनुभव घेतल्यानंतर उत्तरार्धात प्रत्येकानें संन्यास घेतलाच पाहिजे. असें जो करणार नाहीं तो हिंदूच नव्हे. स्वतःला हिंदु म्हणवून घेण्याचा अधिकार त्या कोणालाहि नाहीं.

( रामनंद येथील मानपत्राला उत्तर–पान १५० )

## ब्राह्मण कोण ?

उच्च कुळाचा आपला आदर्श इतरांपेक्षां वेगळा आहे. अध्यात्म आणि संन्यास यांनीं युक्त असलेला ब्राह्मण हाच आपला आदर्श. 'ब्राह्मण्याचा आदर्श' असें म्हणण्यांत मला काय सांगावयाचें आहे ? जेथें संसारीवृत्तीचा पूर्ण लोप होऊन खऱ्या ज्ञानाचा गंगौघ अखंडित वाहत असतो त्यालाच मी ब्राह्मण म्हणतों. हिंदुजातीचा आदर्श हाच होय !

( वेदान्तप्रसाराचें कार्य–पान १९६ )

## शासनरहित समाज

**न राज्यं नैव राजाऽऽसीत् न दंड्यो न च दांडिकः ।**

**धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ।।**

ज्यांनीं 'स्व' चा संपूर्ण न्यास केलेला आहे, आणि ज्ञान मिळविण्यासाठीं, ज्ञान देण्यासाठीं, प्रमाचें सामर्थ्य संपादन करण्यासाठीं जो अविरत झटत आहे तोच ब्राह्मण ! जर एखादें राष्ट्र अशा ब्राह्मण स्त्रीपुरुषांनीं घडविलेलें असेल, त्यांतील सर्व घटक ब्राह्मणच असतील तर मग त्या देशांत अनुशासनाची आवश्यकता भासणार नाहीं यांत काय आश्चर्य ! तेथें त्यांच्या समाजव्यस्थेसाठीं दंडधारी आणि सैनिक यांची आवश्यकताच कोठें ? तेथें शासक तरी कां हवा आणि शासनसंस्थेची तरी नड कोठें ? ते थोर आणि गोड लोक देवाचे लोक होत ! त्यांना ब्राह्मण म्हणावयाचें !

( वेदान्तप्रसाराचें कार्य–पान १९७ )

## साहाय्यासाठीं हात पुढें करा !

आणि ब्राह्मणांना उद्देशून मला म्हणावेसें वाटतें, ' अहो, तुमचा उच्च कुलाबद्दलचा अभिमान व्यर्थ आहे ! तुम्ही इतके दिवस म्लेच्छ राजांच्या राज्यांत राहिल्यामुळें शास्त्राप्रमाणें तुमचें ब्राह्मणत्व नष्ट झालें आहे. शास्त्रावर तुमचा विश्वास असेल तर या पापाबद्दल कुमारिलभट्टाप्रमाणें अग्निकाष्ठें भक्षण करून प्राणत्याग करा. एवढें धैर्य तुमच्यांमध्यें नसेल तर आपलें दौर्बल्य मान्य करून दुसऱ्यांच्या साहाय्यासाठीं हात पुढें करा. ज्ञानाची कवाडें सर्वांना मोकळीं करा. पददलित जनसामान्यांना त्यांचे न्याय्य आणि इष्ट अधिकार पुनरपि द्या.

( आम्ही जन्म पावलों तो धर्म–पान ४६१ )

## खरें काय, द्वैत कीं अद्वैत ?

आमच्या पंडितांना वाटतें, आमच्यांतील नानापंथांपैकीं एक कोणता तरी खरा असणार ! बाकीचे खोटें असणार ! वास्तविक त्यांना श्रुतिवचन माहीत आहे. तें अद्भुत श्रुतिवचन भारतानें जगाला शिकविलें पाहिजे.

' एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति '

जें एकमेवाद्वितीय आहे त्यालाच विद्वान लोक नानाविध नांवांनीं संबोधितात. हें श्रुतिवचन आमचें बोधवाक्य आहे. आणि स्वतःच्या राष्ट्रीय जीवनांत या बोधवाक्याचें आचरण करणें हा आमचा छन्द आहे.

' एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति '–

( वेदान्ताचा अंगोपांगासह विचार–पान ३४८ )

## अद्वैती व्हा

आजच्या या सुधारणेच्या दिवसांत, वास्तववाद नि तर्क यांच्याबद्दलच्या गप्पांच्या सुकाळांत, तुम्हांमध्यें खरें धैर्य असेल तर तुम्ही सर्वच्या सर्व अद्वैती व्हाल. आणि भूतकाळांत बुद्धानें जगासमोर जाऊन, **बहुजनहिताय, बहुजनसुखाय**, ' समष्टीच्या हितासाठीं, समष्टीच्या सुखासाठीं. ' प्रचारकार्य केलें त्याप्रमाणें तुम्ही करावें असें मी अपेक्षितों. असें करणार नसाल तर तुम्ही भ्याड आहांत.

(वेदान्त–पान ४२३–२४ )

## धर्मनिष्ठेची कसोटी

जो म्हणतो, ' मी प्रथम खाईन, मला इतरांपेक्षां अधिक श्रीमंती हवी, मी प्रत्येक वस्तु मिळवीन, मी सर्वांआधीं स्वर्गांत जाईन, मी इतरांपूर्वी मोक्ष मिळवीन', तो मनुष्य स्वार्थी असतो. पण जो म्हणतो, ' मी अखेरीस जाईन, नव्हे मला स्वर्गसुख मिळणेंहि नको, माझ्या बंधूंना जर साहाय्य मिळणार असेल तर त्यासाठीं मी नरकांतहि जाईन,' त्याला निःस्वार्थी मनुष्य म्हणावें. निःस्वार्थवृत्ति हीच धर्मनिष्ठेची कसोटी आहे. जो अधिक निःस्वार्थी तो अधिक आध्यात्मिक, तोच शिवाला अधिक प्रिय !

(रामेश्वर मंदिरांतील भाषण—पान १४३)

## आमच्या धर्माचें वैशिष्ट्य

ख्रिश्चन धर्म ख्रिस्तावर आधारलेला आहे, मुहंमदी मुहंमदावर, बौद्ध बुद्धावर, जैन जिनावर असे हे धर्म व्यक्तींच्यावर आधारलेले आहेत. आपला धर्म व्यक्तींच्यावर आधारलेला नसून तत्त्वांवर उभा राहिलेला आहे. भगवान् कृष्ण हे कांहीं वेदांपेक्षां श्रेष्ठ नाहींत, श्रीकृष्णालाहि वेद श्रेष्ठ होते. श्रीकृष्णाचें देवत्व कशामध्यें तर तो वेदांचें सर्वोत्तम प्रकटीकरण करणारा झाला म्हणून !

(हिंदुस्थानांतील ऋषिमुनि—पान २४९)

## हें जग असें आहे

एखाद्या मनोहर मूर्तिरूपानें अथवा संकेतचिन्हाद्वारें परमेश्वराची पूजा केली तर ज्यूंच्या मतानें हा महा गाढवपणा होईल, तें पापच होईल. पण एखाद्या पेटीमध्यें परमेश्वर आहे, त्या पेटीच्या दोन्ही बाजूला दोन देवदूत बसलेले आहेत, वर ढग लोंबत आहेत, अशा स्वरूपांत परमेश्वराचें पूजन केलें तर तें त्याच्या मतें उत्तमांतील उत्तम, पवित्रांतील पवित्र ! परमेश्वर कबूतराच्या रूपांतून प्रतीत झाला तर तें खरें, पण तो जर गाईच्या रूपांतून प्रतीत होत असला तर मात्र अंधश्रद्धेचा, वेडगळ समजुतीचा कळस ! जग हें असें आहे.

(माझ्या कार्याची रूपरेखा—पान २१८)

## आजच्या अनवतीचें मूळ कोठें? बौद्धांनीं दिलेल्या वारशांत !

आज बुद्ध आणि बुद्धधर्म यांचा गौरव करीत राहण्याची टूम अनुभवास येत आहे. तथापि आपणामध्यें जी अवनति दृष्टोत्पत्तीस येते ती बुद्धधर्माचीच वारसपरंपरा आहे हें स्तुति करणाऱ्यांना क्वचितच माहीत असेल ! भगवान् गौतमबुद्धाच्या आश्चर्यकारक तत्त्वज्ञानानें आणि त्याहून आश्चर्यकारक अशा व्यक्तिमत्त्वानें बुद्धधर्माचा प्रसार झाला, असें ज्यांनीं बुद्धधर्माचा नीट अभ्यास केलेला नाहीं त्यांच्या पुस्तकांतून लिहिलेलें असतें. मला भगवान् बुद्धदेवांबद्दल अत्यंत आदर आहे. पण मला असें सांगावयाचें आहे कीं, बुद्धधर्माचा प्रसार यामुळें झालेला नाहीं. तीं भव्य देवालयें, त्यांतील मूर्ति, डोळे दिपविणारे तेथील पूजासमारंभ या गोष्टींमुळें बौद्धांचा प्रसार झाला. त्या देवळांइतकें आकर्षण घरांघरांतून चालणाऱ्या अग्निहोत्रांमध्यें नव्हतें. देवळांपुढें त्यांना टिकाव धरतां आला नाहीं. पण पुढें भयंकर अवनति झाली. समाजांत एवढी अनैतिकता शिरली कीं तिचा थड उच्चारहि मला तुम्हासमोर करतां येणार नाहीं. हा वारसा बुद्धधर्मानें आपणांसाठीं ठेविला !

(माझ्या कार्याची रूपरेखा–पान २१६)

## शंकराचार्यांचें कार्य

तार्तर, बलुची यांच्यासारख्या महाभयानक जाति हिंदुस्थानांत आल्या, बुद्ध धर्म त्यांनीं स्वीकारला आणि त्या आपल्यांत मिसळून गेल्या. त्यांनीं स्वतःबरोबर स्वतःच्या समजुती, कल्पना, नि रूढी भारतांत आणल्या. आणि त्यामुळें आपलें राष्ट्रीय जीवन नाना भीषण, पाशवी कल्पनांनीं, रूढींनीं बरबटून गेलें. शंकराचार्यांना या अवनतीचा वारसा मिळाला होता. वेदान्त तत्त्वज्ञानाच्या आधारानें या अवनतींतून शुद्धि करण्याचें कार्य त्यांनीं केलें. तें कार्य अजूनहि चालू आहे.

(हिंदुस्थानांतील ऋषिमुनि–पान ३६५)

## शारीरिक दौर्बल्य हेंच एकतृतीयांश दुःखाचें मूळ

आपल्या हिंदुस्थानांत आज सामर्थ्याची उणीव आहे. उपनिषदांतील विचार कितीहि थोर असोत, आमचे पूर्वज, ऋषिमुनि कितीही श्रेष्ठ असोत,

इतर देशांची तुलना करतां आपण अत्यंत दुर्बळ आहोंत हें मला सांगितलेंच पाहिजे. पहिलें दौर्बल्य आमच्या शरीरामध्यें आहे. शारीरिक दौर्बल्य हें आमच्या एक तृतीयांश दुःखाचें कारण आहे. आम्ही आळशी आहोंत; आम्ही काम करूं शकत नाहीं; आम्ही एकत्र येऊं शकत नाहीं; आम्ही एकमेकांवर प्रेम करत नाही; आम्ही पराकाष्ठेचे स्वार्थी आहोंत; परस्परांचा मत्सर केल्याशिवाय, एकमेकांचा द्वेष केल्याशिवाय आम्हांतील तिघे कोणतेंहि काम एकत्र करूं शकत नाहींत; ही आमची स्थिति आहे. भीषण अशा, असंघटित, स्वार्थांध, एकमेकांशीं भांडणें माजविणाऱ्या, लोळागोळा झालेल्या स्थितींत आम्ही आहोंत. कपाळावर गंध कसें लावावें यावर शतकानुशतकें आम्ही लढाया खेळल्या आहेत. अमक्या माणसाचा विटाळ झाला असतां माझें अन्न विटाळतें अशा गंभीर प्रश्नावर आम्हीं ग्रंथच्याग्रंथ लिहिले आहेत. हा प्रकार कित्येक शतकें चालू आहे. असल्या गूढ आणि विस्मयजनक प्रश्नांच्यावर आणि संशोधनावर आम्ही आमची सर्व बुद्धिमत्ता खर्च करीत असतांना ह्या जातीमधून कांहीं उन्नत विचार निर्माण होण्याची शक्यता तरी वाटते का ?

(वेदान्त आणि हिन्दुजीवन—पान २४१–२४२)

## नित्य टीका करीत गेल्यानें काय झालें ?

अति प्रखर टीकेची आवश्यकता आहे हें खरें. पण ती केवळ अल्पकाळापुरतीच. नित्याचा मार्ग म्हणजे प्रगतीचा, बांधणूक करीत जाण्याचा; तोडफोड करण्याचा अथवा टीकेचा नव्हे. पण गेलीं शंभर वर्षें या आपल्या देशामध्यें पाश्चात्य विज्ञानाचा झंजावात आमच्या दोषस्थळांवर सारखा प्रहार करीत आहे. त्याचा परिणाम असा झाला कीं, दोषस्थळाशिवाय आमच्या पाहण्यांत अन्य कांहीं येतच नाहीं. त्याचाच दुसरा परिणाम असा झाला कीं या आमच्या देशांत जे बुद्धिमान शहाणे लोक उत्पन्न झाले त्यांचें देशावर, या धर्मावर मनःपूर्वक प्रेम होतें—त्यांनीं स्वतःला जें चूक वाटलें त्यावर टीकास्त्र चालविलें. त्यांनीं पुष्कळ चांगलें कार्य केलें आहे. पण आतां त्यांना पुरे म्हणण्याची वेळ आली आहे. टीका फार झाली. दोषान्वेषण फार झालें. आतां पुनर्रचनेचा, घडवणुकीचा काळ आलेला आहे. आतां विस्कळित झालेल्या शक्ति एकत्रित, एककेंद्र करून या राष्ट्राचा अनेक शतकें रुतलेला

गाडा पुढें नेला पाहिजे. घर आतां स्वच्छ झालें आहे. त्यांत नव्यानें वस्ती केली पाहिजे. अहो, आर्यकुमारांनों, रस्ता आतां साफ झाला आहे. आतां पुढें प्रचलन करा.

(हिंदुत्वांतील समान भूमिका–पान ३६७)

## मत्सर संपलाच पाहिजे

तुम्ही खरोखरी स्वतःच्या धर्मावर प्रेम करीत असाल तर धर्मांतील गूढ तत्त्वें बाहेर काढून योग्य वारसदारांच्या तीं स्वाधीन करणे असें जें आपणां सर्वांचें अत्यावश्यक असें एकमेव कर्तव्य, तें करा ! याचेंहि आधीं आणिक एक गोष्ट आवश्यक आहे. गेलीं युगानुयुगें आम्ही परस्पर-मत्सराच्या काळो-खीनें माखून गेलों आहोंत ! त्या माणसाला मोठेपण कां मिळतें, त्याचे आधीं मला कां नाहीं, असला मत्सर संपलाच पाहिजे.

(वेदान्तज्ञान–पान १३४)

## श्रद्धेची नितांत आवश्यकता

आज आम्हांमध्यें श्रद्धा हवी आहे. दुर्दैवानें हिंदुस्थानांतून ती गुप्त होऊं पाहत आहे. आणि त्याचमुळें आम्ही या स्थितीला येऊन पोहोचलों आहोंत. माणसांमाणसांमध्यें कमी-अधिकपणा असतो तो या श्रद्धेमुळेंच ! एखादा मोठा असतो तर दुसरा दुबळा, हलका राहतो, याचें कारण श्रद्धाच ! ही श्रद्धा आपणांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे पाश्चात्य देशांत जी कांहीं भरभराट दृष्टीस पडते ती त्यांनीं आपल्या शरीरबलावर श्रद्धा ठेविल्यामुळेंच. तुम्हीं जर तुमच्या आत्म्यावर श्रद्धा ठेवली तर ! तर करतों त्यापेक्षां कितीतरी अधिक कार्य करतां येईल. त्या अमित-शक्तिधारी आत्म्यावर श्रद्धा ठेवा. त्या आत्मतत्त्वाचा कोणीहि नाश करूं शकणार नाहीं. त्यामध्यें विश्वसामर्थ्य भरलेलें आहे. केवळ तुमच्या आवाहनाची तें वाट पाहात आहे. तुम्ही द्वैती असा, विशिष्टाद्वैती असा, अथवा अद्वैती असा, सर्व पंथांचा आत्मतत्त्वावर अढळ विश्वास आहे. आत्म्याचा आविष्कार केल्यानेंच सर्व कांहीं साध्य होणार आहे यावर श्रद्धा असूं द्या.

ही श्रद्धा संपादन करण्यासाठीं मनामध्यें स्वतःबद्दल विश्वास बाळगा. कोणत्यांहि गोष्टीचा उपहास करण्याचा, गांभीर्याचा अभाव असण्याचा दोष

आमच्या राष्ट्राच्या रक्तांत शिरूं पाहत आहे. या रोगाचा त्याग करा. दृढप्रतिज्ञ व्हा. श्रद्धा बाळगा. मग बाकीच्या सर्व गोष्टी आपोआप मिळतील.

(कलकत्याच्या मानपत्राला उत्तर पान ३२०)

## आवश्यकता आहे ती प्रबलतम इच्छाशक्तीची

मित्रहो ! द्वैतावर आधारलेल्या प्रेमभावयुक्त पूजनामध्यें, भक्तीमध्यें केवढी गोडी आहे, आनंदाचा, तादात्म्यतेचा केवढा महासागर आहे, हें मी जाणतों. मी तें सर्व जाणतों ! पण आनंदपरमानंदासाठींहि अश्रु ढाळण्याची ही आतांची वेळ नव्हे ! मृदु होण्याचा हा काल नव्हे ! ही अंतःकरण-मृदुता इतकी परमावधीला गेलेली आहे कीं, आपण कापसाच्या ढिगासारखे मऊ नि निर्जीव होऊन गेलेलों आहोंत. आज आपल्या देशाला आवश्यकता आहे ती लोखंडी स्नायूंची, पोलादी प्रेरणेची, आणि कशाचाहि भेद करील, विश्वातील सर्व गूढ प्रमेयें जी तत्काळ छेदील, आणि इष्ट कार्य संपादन करण्यासाठीं महासागराच्याहि तळाशीं जाऊन अथवा मृत्यूला समोरासमोर तोंड देऊन अथवा अन्य कोणत्याहि उपायानें पण अडचणींवर मात करून यश मिळवील अशा प्रबल इच्छाशक्तीची ! सर्व वस्तुमात्रांत एक आत्मा भरलेला आहे हें अद्वैताचें तत्त्व समजून आल्यानेंच ही इच्छाशक्ति प्राप्त होणारी आहे.

(वेदान्तप्रसाराचें कार्य–पान १८९)

## आत्मविश्वास हवा

इंग्लंड, अमेरिकेसंबंधीं मला अनुभव आला कीं, त्यांच्या अंतःकरणांत स्वतःबद्दल पुरेपूर विश्वास दाटलेला असतो. एखादें इंग्लिश पोरहि म्हणेल, मी इंग्लिश आहें, मी काय हवें तें संपादन करूं शकेन. अमेरिकन मुलगा तुम्हांला तेंच सांगेल. कोणीहि युरोपियन मुलगा तुम्हांला हेंच म्हणेल. आमचीं मुलें असेंच म्हणतील का ?

(वेदान्तप्रसाराचें कार्य–पान १९१)

## उठा जागे व्हा, निर्भय, व्हा

'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत।' उठा जागे व्हा, आणि ध्येय-शिखरीं पोहोंचल्याविना थांबू नका. कलकत्त्यांतील तरुणांनों, खरोखरीच

उठा, जागे व्हा, हीच वेळ योग्य आहे; पराक्रमी व्हा, निर्भय व्हा. श्रुतीमध्यें परमेश्वराला विशेषण लावलें आहे, अभिः अभिः (निर्भय). आपणहि अभिः निर्भय झालें पाहिजे.

(कलकत्त्यांतील मानपत्राला उत्तर–पान ३१८)

## उठा, कामाला लागा

बंधुजनहो, चला, आपण सर्व पराकाष्ठेनें काम करूं लागूं या ! झोप घेण्याची ही वेळ नाहीं. आपल्या कामावर हिंदुस्थानचा भविष्यकाळ अवलंबून आहे. ही मातृभूमी आपली प्रतीक्षा करून आहे. ही केवळ मोहावस्थेंत आहे. उठा, जागे व्हा. तिला पुनः जीवित करून, भूतकाळापेक्षाहि वैभवसंपन्न करून, चिरंतन अशा सिंहासनावर तिची स्थापना करा !

(रामनद येथील मानपत्राला उत्तर–पान १५४)

## देशभक्त होण्यांतील पहिला धडा

एक शब्द आणखी अन् मी भाषण संपवितों. लोक देशभक्तीबद्दल बोलतात. मलाहि देशभक्ति आवडते. देशभक्तीबद्दल माझी एक कल्पना आहे कीं, ती अंतःकरणांतून आली पाहिजे. बुद्धि अथवा विचारशक्ति यांचा उपयोग किती ? त्या दोन पावलें टाकूं शकतात अन् मग थांबतात. पण अंतःकरणांतून स्फूर्ति, उत्कटता उगम पावते. प्रेमानें अशक्य तेंहि शक्य होतें ! प्रेम हीच विश्वरहस्यांची गुरुकिल्ली आहे. म्हणून अहो भावी सुधारकांनों, भावी देशभक्तांनों, तुमचें हृदय द्रवूं द्या ! तुमचें अंतःकरण ओघळूं द्या ! भुकेनें तडफडणाऱ्या तुमच्या कोटयवधी बांधवांबद्दल तुमच्या हृदयांत भावनांचे कढ येतात का ? त्यामुळें तुम्ही अस्वस्थचित्त झालां आहांत काय ? देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे.

(माझ्या कार्याची रूपरेखा–पान २२५)

## आम्ही काय शिकलें पाहिजे

आम्हीं जगाला अध्यात्म शिकविलें पाहिजे. पण जगापासून आम्हांस कांहीं शिकणें आहे कीं नाहीं ? आधिभौतिक ज्ञानाची आमच्यांत भर पडली पाहिजे. संघटन-कुशलता, मोठमोठीं सामर्थ्यें एककेंद्र करणें, तीं नीट रीतीनें हाताळणें, लहानलहान शक्तींच्या उपयोगांतून अधिकाधिक उत्पादन करणें अशा गोष्टी कदाचित् आम्हीं पश्चिमेपासून शिकल्या पाहिजेत.

पण एखादा मनुष्य हिंदुस्थानांत येऊन खाना, पीना और नाचरंग उडाना, एवढेंच माणसाचें काम आहे असें सांगूं लागला, तर जाणा कीं तो मनुष्य खोटा आहे. तथापि आमच्यांतील जे अंतिम सत्याचें धारण करण्यास पुरेसे अनुभवसिद्ध झालेले नाहींत, त्यांच्यासाठीं आमच्या प्रकृतिधर्मानुसार सौम्य केलेला कांहीं स्वरूपाचा जडवाद आम्हांला उपयोगी आहे.

(रामनद येथील मानपत्रास उत्तर–पान १४९)

## राष्ट्रप्रगतिसाठीं सामर्थ्य

राष्ट्र कां प्रगत होत नाहीं ? अमुक-अमुक गोष्ट अन्यायाची आहे, दुःखाची आहे असें वाटणारे केवळ मूठभर लोक राष्ट्राला प्रगत करूं शकणार नाहींत. प्रथम देशाला शिक्षण द्या. तुमचें विधिमंडळ भक्कम करा. मग सुधारणांचे विधि होऊं शकतील. विधीच्या मागें अवश्य असणारें सामर्थ्य, सर्वमान्यत्व प्रथम मिळवा.

(माझ्या कार्याची रूपरेखा–पान २१६)

## असाच उत्साह हवा

मनुष्य योजतो पण देव फिसकटवितो ! आज येथील भाषणें आणि समारोप आंत सभागृहांत इंग्रजी पद्धतीनुसार व्हावेत असें योजिण्यांत आलें होतें; पण परमेश्वरानें तें फिसकटविलें आणि तुम्हांसमोर, दूरवर पसरलेल्या या श्रोतृ-सागरासमोर भगवद्गीताप्रसंगाप्रमाणें, रथामध्यें उभा राहून मी बोलत आहे. हें असें घडलें याबद्दल आपण सर्व त्याचे कृतज्ञ राहूं या.

(यानंतर स्वामीजींनीं एका मद्रासी बगीच्या टपावर उभे राहून भाषण करण्यास प्रारंभ केला. पण पुढें गर्दी इतकी वाढली कीं श्रोत्यांना भाषण ऐकू जाईना. त्यामुळें सभेंत शांतता राहीना म्हणून स्वामीजींनीं बोलणें आवरतें घेतलें. )

मित्रहो ! तुमचा उत्साह पाहून मला आनंद होतो. हा उत्साह अवर्णनीय आहे. मी या प्रकारानें रागावलों असें तुम्ही समजूं नका, उलट तुमच्या उत्साहानें मला आनंदाचें भरतें आलें आहे. उत्साहच आपणांस हवा आहे. मात्र हाच उत्साह नेहमीं असूं द्या. नेहमींच असे उत्साही रहा. आपणास हिंदुस्थानामध्यें फार मोठमोठ्या गोष्टी घडवावयाच्या आहेत ! त्यासाठीं असाच उत्साह हवा !

(मद्रास येथील मानपत्राला उत्तर–पान २०५)

## परमेश्वराला कोणता भक्त प्रिय आहे ?

एका श्रीमंताच्या उद्यानांत दोन माळी आहेत. एक पराकाष्ठेचा आळशी आणि कामचुकार आहे. मात्र उद्यानाचा स्वामी जेव्हां येतो त्या वेळीं पुढें होऊन, 'अहो स्वामी, आपला चेहरा किती सुंदर आहे.' इत्यादि स्तुति तो करतो. दुसरा माळी अशी स्तुति न करितां श्रमपूर्वक उद्यान फुलवितो. त्या दोघांमधील कोणता माळी त्या उद्यानाच्या स्वामीला आवडेल?

या विश्वोद्यानाचा स्वामी जो शिव त्याचे बाबतींत असेंच आहे. जो आळशी असा स्तुतिपाठक भक्त आहे तो त्याला आवडेल कीं जो मुलांबाळांची, गोरगरिबांची, शिवोत्पन्न सृष्टीची काळजी करतो तो त्याला आवडेल ! !

(रामेश्वर–मंदिरांतील भाषण–पान १४२)

## हिंदु हें नांव सार्थ होईल

आपल्या अंत:करणांतून केवळ प्रेमाचेच शब्द येऊं द्यात. असें जर झालें तरच सर्व पंथांमधलीं भांडणें मिटतील. हिंदु या शब्दावर आणि हिंदु हें नांव धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर आत्यंतिक प्रेम करावयास आपण शिकूं या. कुठल्याहि प्रान्तांतला, कुठलीहि भाषा बोलणारा हिन्दु, ओळख झाल्या-क्षणींच ज्या वेळेला अत्यंत जवळचा आणि प्रियतम असा वाटेल त्याच वेळीं तुम्हांला खरोखर हिंदु म्हणावयाचें. हिन्दु नांव धारण करणारा कोणीहि जर दु:खांत असेल तर त्या वेळेला हा माझा मुलगाच दु:खांत आहे, अशी भावना निर्माण झाली तरच तुम्हांला हिंदु असें म्हणता येईल. गुरु गोविंदसिंहाप्रमाणें त्याच्यासाठीं सर्व आपत्ति सहन करण्यास ज्या वेळीं तुम्ही सिद्ध व्हाल, त्या वेळीं तुम्हांला हिंदु म्हणतां येईल. त्या थोर पुरुषाचा उल्लेख व्याख्यानाच्या आरंभीं मी केला. हिंदु-धर्माच्या रक्षणाकरितां, शत्रूविरुद्ध लढत लढत स्वत:चें रक्त सांडीत असतांना, या पंजाब प्रान्तांतून त्याला निघून जावें लागलें. आपली मुलें रणांगणावर ठार झालेलींसुद्धां त्यानें पाहिलीं. ज्यांच्याकरितां स्वत:चें रक्त आणि स्वत:ला प्रिय असलेल्या आप्तजनांचें रक्त त्यानें सांडलें, ते सर्व आपल्या थोर गुरूला सोडून निघून गेले. अन्तीं एखाद्या जखमी सिंहाप्रमाणें गुरु गोविंदसिंहांना दक्षिणेंत येऊन मरावें लागलें. परंतु ज्यांनीं कृतघ्नपणें गुरूचा त्याग केला, त्यांच्याविरुद्ध त्यांच्या तोंडांतून एक ब्रहि निघाला नाहीं,

मग शापवाणी कोठून निघणार ? लक्षांत ठेवा, तुम्हांला या देशाचें भलें करावयाचें असेल तर तुम्हांपैकीं प्रत्येकाला गुरु गोविंदसिंह झालें पाहिजे. तुमच्या देशबांधवांमध्यें तुम्हांला अनेक दोष दिसतील परंतु ते हिंदु रक्ताचे आहेत हें ध्यानांत घ्या. ज्या परमेश्वराची तुम्हीं प्रथम पूजा केली पाहिजे, असे परमेश्वर तेच आहेत, हें लक्षांत घ्या. यांपैकीं प्रत्येकानें तुम्हांला शाप दिला तरी तुमच्या तोंडावाटें प्रेमाचेच पाझर फुटूं देत. त्यांनीं तुम्हांला हांकलून दिलें तरी गुरु गोविंदसिंहाप्रमाणें निवृत्तस्थितीमध्यें मृत्यूला शांतपणें कवटाळा. असें वागणारा जो मनुष्य असेल त्यालाच हिंदु हें नांव शोभून दिसतें.

(हिंदुत्वांतील समान भूमिका पान २७९–८०)

## हिंदुधर्म नौकेंतील प्रवाशांनों !

आपल्या देशांतील सुधारणावाद्यांना स्वतःचा असा पंथ निर्माण करावासा वाटतो. त्यांनीं आतांपर्यंत पुष्कळ चांगलें कार्य केलें आहे त्यावद्दल त्यांना धन्यवाद असोत. पण आपणां सर्वांना कवटाळणारें जें हिंदुत्व त्यांतून बाहेर जाण्याची बुद्धि तुम्हां हिंदूंना कां व्हावी ? हिंदु या शब्दाची तुम्हांला लाज कां वाटावी ? अहो अमृतपुत्रांनों ! माझ्या देशबांधवांनों ! ह्या आपल्या राष्ट्रीय जीवननौकेनें युगानुयुगें सर्व जगाला संस्कृतीच्या पैलतीराला नेत तेथील वैभवपूर्ण रत्नांनीं श्रीमंत केलें आहे. जीवनाच्या महासागरावर गेलीं कित्येक वर्षें ही जीवननौका तळपत आहे. लाखों जीवांना दुःखांतून सोडवून तिनें मुक्तीचा मार्ग दाखविला आहे. पण आज त्या नौकेमध्यें आमच्याच कांहीं दोषांनीं अथवा अन्य कशानें तरी दोन भोकें पडलीं. अशा स्थितीत त्या नौकेंतून प्रवास करणारे जे आपण ते हीं भोकें पडलीं याबद्दल शिव्याशाप देत, परस्परांशीं भांडत राहणार कीं एकत्र होऊन भगीरथ प्रयत्न करून तीं भोकें बुजवून टाकणार ? आपल्या हृदयांतील रक्ताचें अर्घ्य आनंदानें देऊन हीं भोकें आपण बुजवून टाकूं. यांत अपयश येणार असेल तर कुणालाहि शाप न देतां सर्वच्या सर्व एकत्र परस्परांना धन्यवाद देत मृत्यु स्वीकारूं.

(आम्ही जन्म पावलों तो धर्म–पान ४६१)

## सर्वांत मोठा दोष

आम्हां हिंदूंचा सर्वांत मोठा दोष असा आहे कीं, आम्ही चिरस्थाई

संघटना करूं शकत नाहीं. त्याचें कारण हें कीं, आपल्या हातांतील सत्तेमध्यें दुसऱ्याला भागीदार करण्याची आमची तयारी नसते; नि आपण स्वतः जगांतून गेल्यावर मागें काय घडेल याचा विचार नसतो !

(Vol- VIII pp. 464–65)

## संघटना स्वभावाची उणीव आहे

केवळ इच्छाशक्तीनें सर्व कार्यें घडून येतील...अशी एक संस्था स्थापन करा कीं, जेथें नित्यनेमानें एकत्र यावें लागेल...असत्याबद्दल सावध राहा-पुढें व्हा, माझ्या सन्मित्रांनों, तेज तुमच्या पाठोपाठ येईल ! संघटन-स्वभावाची आमच्यांत संपूर्ण उणीव आहे, तथापि तो स्वभाव कमावला पाहिजे, मत्सर-रहितता हें मुख्य सूत्र आहे. सहकाऱ्यांच्या विचारांशीं स्वतः सहमत होणें, आणि इतरांना सहमत करून घेणें यांत खरें रहस्य आहे....सर्वांना प्रेमानें जिंका ! कामांत प्रगति करा ! वाढणें आणि गतिशील असणें हीच जिवंतपणाची खूण आहे.

(Vol. V pp. 30–31 Edi. III)

## संघटना हवी

आपणां हिंदूंना परस्परांचें गुणग्रहण करून, एकमेकांना साहाय्य करण्यास शिकवणारी संघटना आवश्यक आहे. माझ्या सन्मान-सभांना सहस्रावधि लोक आले म्हणतां; ठीक ! पण तुम्हीं त्यांना प्रत्येकीं एक आणा द्या म्हणून म्हटलेंत तर ते देतील का ? सर्व राष्ट्रच पोरकट दुबळ्या वृत्तीचें झालें आहे......

(Vol. V pp. 52 Edi. III)

## बहुमतानिर्णय आणि चालकानुवर्तित्व

निरनिराळ्या देशांतून मी केलेल्या प्रवासावरून माझी अशी ठाम खात्री झाली आहे कीं, संघटनेशिवाय कोणतेंहि श्रेष्ठ आणि चिरस्थायी कार्य करतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील सध्यांची स्थिति पाहतां लोकशाही तत्त्वांवर अधिष्ठित, प्रत्येक सभासदाला स्वतःचें मत प्रतिपादन करण्याचा समान अधिकार ज्यांत आहे, ज्या ठिकाणचे निर्णय बहुमतावर आधारलेले असतात अशा तऱ्हेची संघटना उभी करावी, असें मला वाटत नाहीं. पाश्चात्य देशांतील गोष्ट वेगळी आहे....

शिक्षणाचा प्रसार होऊन त्याग-भावना अंगीं रुजल्यावर, व्यक्तिगत स्वार्थाच्या आणि लोभाच्या पलीकडे जाऊन सामाजिक अथवा राष्ट्रीय उत्कर्षच आम्हांला मूल्यवान वाटूं लागल्यावर, आपणामध्येंसुद्धां लोकशाही तत्त्वांचा अंगीकार करून कार्य करतां येईल. या गोष्टींचा विचार करून तूर्त कोणातरी सर्वाधिकाऱ्याचे नेतृत्वाखालीं कार्य करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. त्याच्या आज्ञा सर्वजण मानतील. योग्य अवधीनंतर सभासदांच्या विचारानें आणि संमतीनें कार्याची दिशा ठरविली जाईल.

( Life of Swami Vivekananda pp. 601–02. Edi. III )

## चारित्र्याचे आधारस्तंभ हवेत

आपण पृथ्वीच्या पाठीवर असलेल्या अन्य जातींच्या बरोबर मिसळलें पाहिजे......... पाश्चिमात्य देशांनीं राष्ट्रचेतनेचें जें आश्चर्यकारक जीवन उभें केलें आहे, त्याचे आधाराला चारित्र्यसंपन्न पुरुष उभे आहेत. आमच्यांत असे आधारस्तंभ निर्माण झाल्याविना या अथवा त्या आक्रमकाविरुद्ध वैताग करणें व्यर्थ आहे.

( Vol. IV pp. 311 Edi. III )

## थोर पुरुषांचें दुर्भिक्ष्य !

पूर्व आणि पश्चिम यांमधील भेद हाच आहे कीं ते लोक ‘ राष्ट्र ’ आहेत; आम्ही लोक ‘ राष्ट्र ’ नाहींत.

......इंग्रजांना हिंदुस्थान जिंकणें इतकें सोपें कां गेलें ? कारण ते राष्ट्र आहेत. आम्ही राष्ट्र नाहीं. आमच्यांतील एखादा थोर पुरुष जेव्हां मरतो तेव्हां दुसऱ्याची वाट पाहत आम्हांस शतकानुशतकें थांबावें लागतें. त्यांच्याकडे एक मेला, दुसरा तयार असतो... असें कां ? त्यांच्याकडे माणसें निवडावयाचें क्षेत्र अत्यंत व्यापक आहें, आमचें अत्यंत लहान आहे. ३० कोटींच्या देशांमध्यें थोर पुरुष निवडण्याचें क्षेत्र लहान आणि ३ कोटी, ४ कोटी, ६ कोटींच्या देशांत अशा निवडीचें क्षेत्र मोठें हें कसें ? कारण एवढेंच त्या देशांतून शिकलेल्या स्त्री-पुरुषांची संख्या अत्यंत मोठीं आहे.

( Vol. VIII pp. 314, 15. Edi- I )

## कार्यकर्त्याला आवश्यक असे गुण

ज्यांचा स्वतःचे ठायीं पुरेपूर विश्वास होता, अशा कांहीं व्यक्तींच्या

इतिहासांनीं विश्वाचा इतिहास तयार झालेला आहे. आत्मविश्वास अंतःकरणांतल्या चैतन्याला प्रेरणा करतो. तुम्हीं कांहींहि करूं शकाल; अंतःप्रेरणा पूर्णपणें प्रकट करण्याचा प्रयत्न न केल्यामुळें तुम्ही अयशस्वी होता. ज्या क्षणीं स्वतःमधील विश्वास पूर्णपणें संपतो, त्याक्षणीं मृत्यु येतो.

यासाठीं आधीं स्वतःवर विश्वास ठेवा, मग परमेश्वरावर ! मूठभर धैर्यशील व्यक्ति सर्व जगताला हालवून सोडतील. आम्हांला भावनोत्कट अंतःकरण, संशोधन करणारी बुद्धि आणि काम करणारें मजबूत मनगट यांची आवश्यकता आहे. कार्यकर्त्याला आवश्यक असे गुण तुम्ही संपादन करा. पण हेंहि ध्यानांत ठेवा कीं, कार्य करणारे तुम्ही नसून कार्य करविता तो परमेश्वर आहे !

( Life of Swami Vivekananda pp. 758 Edi. III )

## तडजोड वृत्ति नको

तडजोड वृत्ति नको, सारवासारव नको. तडजोडीचे हे असले प्रयत्न केवळ भ्याडपणांतून उद्भवतात. धीट व्हा. माझीं मुलें सर्वांचे आधीं अत्यंत धैर्यशील असलीं पाहिजेत. कोणत्याहि कारणासाठीं किंचितहि तडजोड-वृत्ति उपयोगी नाहीं. उघडपणें उच्च तत्त्वांचा प्रसार करा. आपली प्रतिष्ठा कमी होईल, अथवा धकाधकीचे प्रसंग सोसावे लागतील याला घाबरतां कामा नये. असत्य मोह घालीत असतांना. सत्याचाच पथ तुम्ही धरला, तर तुम्ही ईश्वरी सामर्थ्य मिळवूं शकाल, आणि त्या सामर्थ्यासमोर तुम्हांला असत्य वाटणाऱ्या गोष्टी बोलण्याची लोकांची छाती होणार नाहीं.

( Life of Swami Vivekananda pp. 758 Edi. III )

## हिंदुस्थानांतील कार्य

'हिंदुस्थानच्या दृष्टीनें तुमच्या या चळवळींत काय कार्य असणार ?' वार्ताहरानें विचारलें.

'हिंदुत्वांतील सर्वांना समान असलेली भूमिका शोधणें.' स्वामीजी उत्तरले, 'आणि आपणांतील राष्ट्रीयत्वाची जाणीव जागृत करणें, हें काम आहे. 'हिंदु' या नांवाखालीं सध्यां हिंदुस्थानांतील तीन प्रकारचे लोक येतात. एक म्हणजे सनातनी, दोन म्हणजे मुसलमानी अंमलांत उत्पन्न झालेले पंथ ( वैष्णव, कबीर, नानक इत्यादि ) आणि तीन म्हणजे सध्यांच्या काळांत

उत्पन्न झालेले पंथ (ब्राह्मो, आर्यसमाज, प्रार्थनासमाज इत्यादि). उत्तरे-पासून दक्षिणेपर्यंत सर्व हिंदूंचें तूर्त एका प्रश्नावर एकमत आहे; तें म्हणजे गोमांस न भक्षिणें!'

(Vol. V. p. 155–56 Edi. 111)

## भाषा संस्कृत : वंश आर्य

(९) सर्वांना जुळणारी भाषा असती, तर फार उपयुक्त झालें असतें. पण अशी भाषा आली कीं सध्यांच्या विविध भाषांची हानि होणें अपरिहार्य होय, ही आपत्ति पदरीं येते.

(१०) तथापि आतांच्या भाषा ज्या एका भाषची उपांगें आहेत अशी भाषा शोधतां आली तर प्रश्न सुटूं शकेल. अशी भाषा म्हणजे संस्कृत भाषा.

(११) द्राविडभाषा मुळांत संकृतजन्य असतील वा नसतील; परंतु आजच्या व्यवहारांत त्या संस्कृतनिष्ठ आहेत. आणि येणाऱ्या प्रत्येक दिवसा-गणिक स्वत:चीं वैशिष्टयें राखीत असतांहि त्या अधिकाधिक संस्कृतमय होत आहेत.

(१२) (राष्ट्रीय एकतेसाठीं आवश्यक) वांशिक पार्श्वभूमिका 'आर्यत्वा'मध्यें सांपडते.

(१६) ऐतिहासिक तर्कजालाच्या नादीं न लागतां व्यवहाराच्या पातळी-वर आलें, तर जुन्यांत जुन्या पुराव्यावरून असें दिसतें कीं, आर्य हे तुर्कस्थान, पंजाब आणि नैऋत्य तिबेट या भूमीमध्यें राहत होते.

(Complete Works of : Vol. IV pp. 255 Edi. 111)

## मुसलमानी अत्याचारांच्या दिवसांत प्रश्न जगण्या–मरण्याचा होता

**हा माझा मार्ग आहे. हिंदूंना दाखवावयाचें कीं आपणांस कांहींह टाकावयाचें नसून, शेंकडों वर्षांच्या गुलामगिरीनें आलेली अनिच्छा नि अगति यांचा त्याग करून ऋषिमुनींनीं दाखविलेल्या रस्त्यानें केवळ पुढें जावयाचें आहे. मुसलमानी अत्याचारांच्या जुलमाच्या दिवसांत आपणास प्रगति करण्याऐवजीं थांबावें लागलें, कारण त्या वेळीं मुख्य प्रश्न जगण्या-मरण्याचा होता.**

आतां तो धोका गेलेला आहे. आतां आपण पाऊल पुढें टाकलें पाहिजे. पण कोणत्या रस्त्यानें ? तत्त्वभ्रष्टांनीं आणि मिशनऱ्यांनीं दाखविलेल्या संहाराच्या मार्गानें नव्हे; तर आपल्या, स्वत:च्या मार्गानें ! येथील बांधणूक ओंगळ दिसते आहे; कारण हा प्रासाद अजून पुरा व्हावयाचा आहे. शतकानुशतकांच्या जुलुमामुळें आपणांस थांबावें लागलें आहे. आतां हा प्रासाद पुरा करा आणि मग सर्व कांहीं सुंदर दिसेल.

(Complete works of : Vol. IV. 378 Edi. III)

## या देशाला पौरुषसंपन्न करा

ग्रीस, पोर्तुगाल, स्पेन इत्यादि लहानसहान देशांतील मुलांचा जन्म जर इंग्लंडमध्यें झाला असेल तर ते, 'आम्ही इंग्लिश आहोंत' असेंच सांगतात. उसन्या प्रकाशांत चमकण्याचा प्रयत्न करणें ही दुर्बलाची रीतच आहे. ज्या वेळीं हिंदूंना युरोपियन पद्धतीचा पोषाख आणि वेषभूषा करतांना मी पाहतों, तेव्हां मनांत येतें कीं, यांना 'हिंदुस्थानच्या कोटचवधि अजाण, निरक्षर, पददलित लोकांच्याचपैकीं मी एक आहें,' हें सांगण्याची लाज वाटत असावी. गेलीं चौदाशें वर्षे हिंदूंच्या रक्तावर पोसला गेलेला पार्शी समाज आज 'एतद्देशीय' नाहीं ! आतांच्या नव्या, जातिशून्य, जे स्वत: ब्राह्मण असल्याचें ढोंग करतात आणि त्याचा अभिमान मिरवितात अशा, पाश्चात्याळलेल्यांच्या अहंकारासमोर खऱ्या, पुरातन, शौर्यसंपन्न आणि कुलीन अशा ब्राह्मणत्वाचा पाडाव लागत नाहीं ! आतां तर पाश्चात्यांनीं आम्हांला शिकविलेंच आहे कीं, अर्धनग्न, अर्धपोटी असलेली कोटचवधि अशी हिंदुस्थानची जनता ही मुळीं अनार्य आहे ! त्यामुळें त्यांचा नि आपला (आर्यांचा) नात्यागोत्याचा असा कोणताच संबंध नाहीं !!!

हे भारता ! केवळ दुसऱ्याचे सूर ओढून, परक्याची भ्रष्ट नक्कल करून' तिऱ्हाइतावर अवलंबून राहून, या गुलामी वृत्तीनें, या नीच तिरस्कारार्ह क्रौर्यानें, या असल्या सामग्रीच्या बळावर, तूं संस्कृतीच्या आणि थोरवीच्या उच्च पदावर आरूढ होऊं शकशील का ? जें स्वातंत्र्य शूर आणि धीरच मिळवूं शकतात, तें अतिनिंद्य अशा भीरुतेच्या आधारें मिळूं शकेल, असें तुला वाटतें काय ?

अरे भारता ! तुझ्या स्त्रीत्वाचा आदर्श सीता, सावित्री, दमयन्ती यांचा

आहे-विसरूं नकोस हें !–ज्या देवाची तूं पूजा करतोस तो देव सर्वसंग-परित्यागी, वैराग्यशिरोमणि असा उमापति शंकर आहे ! विसरूं नकोस कीं तुझ्यामध्यें लग्न, संपत्ति, सर्व जीवन हीं विषयसुखासाठीं नसतात, केवळ व्यक्तिगत उपभोगासाठीं नसतात ! विसरूं नकोस कीं जगदंबेच्या चरणाशीं समर्पित होण्यासाठीं तुझा जन्म आहे ! विसरूं नकोस कीं तुझी समाजरचना म्हणजे विश्वशक्तीचें एक स्पंदन आहे ! विसरूं नकोस कीं हे शूद्रवर्णीय, अजाण, निरक्षर, गोरगरीब, हा कोळी, तो भंगी हे तुझ्याच हाडामांसाचे आहेत, तुझेच भाऊ आहेत. हे शूर पुरुषा, धैर्यशील हो. स्वतःच्या हिंदुत्वाचा अभिमान धर–आणि स्वाभिमानानें गर्जना कर— 'मी हिंदु आहें. प्रत्येक हिंदु माझा भाऊ आहे. अशिक्षित हिंदु, गरीब नि निराधार हिंदु, ब्राह्मण हिंदु नि अस्पृश्य हिंदु—प्रत्येक हिंदु माझा भाऊ आहे !' तुझ्या कंबरेला केवळ लंगोटी असली तरीहि गौरवानें उच्च स्वरांत घोषणा कर, 'हिंदुमात्र माझा भाऊ. हिंदुत्व हेंच माझें जीवन; हिंदुस्थानच्या देवदेवता त्याच माझ्याहि देवदेवता; हा विशाल समाज म्हणजेच माझा बालपणींचा हिंदोळा, तरुणपणांतील नंदनवन, आणि वृद्धावस्थेंतील वाराणशी !' ऊठ भाई, बोल ! 'हिंदुस्थानची धूलि म्हणजेच माझा इंद्रलोक, हिंदुस्थानचें सद्भाग्य तेंच माझें सद्भाग्य !' अरे भाई, दिवसरात्र याचाच जय जयकार कर. हीच प्रार्थना कर कीं, 'अहो उमेश ! हे जगज्जननी, मला पुरुषार्थ प्रदान कर; हे शक्तिदेवते, माझें दौर्बल्य विलयास ने, माझ्यांतील क्लैब्य नाहींसें कर आणि मला पौरुषसंपन्न कर ! !'

(Complete works of : Vol. IV pp. 412–13 Edi. III)

## आपणांस काय करावयाचें आहे ?

माझ्या सर्व जीवनाची आकांक्षा एकच आहे ! ती म्हणजे प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या दाराशीं उदात्त विचार नेऊन ठेवील अशी यंत्रणा उभी करणें ! जीवनाच्या गूढासंबंधीं आमच्या पूर्वजांनीं आणि अन्य देशांतील लोकांनीं काय म्हटलें आहे तें त्यांना कळूं दे !

......अत्यंत परिश्रम करा, कार्यांत स्थिर असा, आणि परमेश्वरावर निष्ठा असूं द्या ! ......धर्मविचारांना धक्का न लावतां जनसामान्यांची उन्नति करणें हें तुमचें ब्रीदवाक्य असूं द्या.

हा देश झोंपड्या–झोंपड्यांत विखुरलेला आहे याचें स्मरण असूं द्या. पण कोणीहि त्यांच्यासाठीं कांहीं केलेलें नाहीं ! केवढी ही दुःखाची गोष्ट ! आमचे आजचे सुधारक विधवा-विवाह चळवळींत गुंतलेले आहेत. सर्व समाज-सुधारणांचा मी भोक्ता आहें. तथापि कोण्या विधवेला किती पति मिळतात, यावर देशहित अवलंबून नसून, जनसामान्यांची परिस्थिति काय यावर अवलंबून आहे.....समता, स्वतंत्र बुद्धि, कार्योत्साह आणि कार्यकर्तृत्व या गुणांत पाश्चिमात्यांहून पाश्चिमात्य, पण त्याच वेळीं संस्कृति आणि धर्म-भावना या बाबतींत कट्टरांतील कट्टर असे हिंदु तुम्हीं होऊं शकाल काय ? हें आपणांस करावयाचें आहे आणि तें आपण करूंच करूं !

(Complete Work of: Vol. V pp. 25–26 Edi. III)

## प्रवर्तक केव्हां तयार होतो ?

प्रवर्तक हा कांहीं एकाच आयुष्यांत तयार होत नाहीं. त्यासाठीं त्याला अनेक जन्म घ्यावे लागतात. संघटनेचे मोठमोठे बेत आखणें, यांत मोठीशी अडचण आहे असें नाहीं; पण सर्व लोकांमध्यें आढळून येणाऱ्या आन्तरिक एकतेच्या जोरावर विविध आणि परस्पर भिन्न स्वभावांच्या लोकांना एकत्र गोंवतां येणें, यामध्यें प्रवर्तकाची खरी कसोटी आहे. आणि ही गोष्ट मुद्दाम करूं म्हटल्यानें होत नाही, सहजगत्याच साधूं शकते.'

(Life of Swami Vivekananda pp. 713, Edi. III )

## नचिकेत्याचा आदर्श

तुझ्यामध्यें आणि तुझ्या देशबांधवांमध्यें श्रद्धा निर्माण कर. सत्य शोधून काढण्यासाठीं, आत्मकल्याणासाठीं, जीवनमरणाचें गूढ उकलण्या-साठीं लागल्यास नचिकेत्याप्रमाणें यमाच्या राजसभेंतहि जा. मृत्यूच्या मुखीं जाऊन सत्याचा शोध लागणार असेल तर तें तूं निर्भयपणें कर. भीति हाच मृत्यु आहे. तुला त्याच्या पलीकडे गेलें पाहिजे. तसें करून वृत्रासुराला मारण्यासाठीं वज्र तयार करावें म्हणून पूर्वकालांत दधीचि ऋषींनीं ज्याप्रमाणें आपलें शरीर फेंकून दिलें, त्याप्रमाणें जगत्कल्याणाकरितां तुझें शरीर अर्पण कर !

( Life of Swami Vivekananda pp. 607, Edi. III )

## हिंदुस्थान विजेत्यांना जिंकेल

विचारांच्या क्षेत्रांत हिंदुस्थान आपल्या विजेत्यांना जिंकेल. आमच्या पूर्वींच्या मुसलमान विजेत्यांप्रमाणें इंग्लंडजवळ आज तलवार–जडशक्ति– आहे. पण अकबर जवळजवळ हिंदूच झाला. सुशिक्षित मुसलमानांना–सुफी- पंथीयांना–हिंदूंच्यापेक्षां निराळें काढणेंच कठीण आहे. ते गोमांस खात नाहींत. आणि अन्य अनेक बाबींत ते आमचें अनुसरण करतात. आमचे विचार त्यांच्यांत पुरतेपणीं भिनलेले आहेत.

(Complete Works of :Vol .V pp. 125. Edi. III)

## इंग्लंडहि जिंकलें जाईल

आणि इंग्लंडहि कालांतरानें जिकलें जाईल. तिच्या हातांतील तल– वारीचा वैचारिक क्षेत्रांत कांहींहि उपयोग नाहीं. शोपेनहौएर हिंदु विचार- पद्धतीबद्दल काय म्हणाला तुम्हांस माहीतच आहे. त्यानें भविष्य केलें आहे कीं, पूर्वी Dark Ages नंतर ज्याप्रमाणें ग्रीक नि लॅटिन संस्कृति सर्व युरोपभर पसरली; त्याचप्रमाणें हिंदुसंस्कृतीचें महत्त्व युरोपभर वाढीस लागेल.

(Complete Works of : Vol. V pp. 120 Edi. III)

## सोपें काय आहे ?

आतां आपणांस समजूं शकेल कीं, आमचा आत्मा कशांत आहे ! आमचा आत्मा आमच्या धर्मांत आहे. या आत्म्याचा कोणीहि नाश करूं शकलें नाहीं, म्हणून हा 'हिंदुदेश' अजून जिवंत आहे. (Because no one was able to destroy that therefore the 'HINDU NATION' is still living)आजच्या या हिंदु-राष्ट्रीय स्वभावाची (Hindu national character) घडण सहस्रों वर्षांच्या ओघांत घडून आलेली आहे. मी आपणांस अतिगंभीरपणें विचारतों, तुमचा तो बाहेरून चिकटविलेला कांहींशें वर्षांचा परकीय संस्कार टाकणें सोपें आहे कीं सहस्रों वर्षांच्या संस्कारानें घडलेला आजचा स्वभाव टाकणें सोपें आहे ?

(Complete Works of: Vol. V pp. 362 Edi. III)

## मृत्यूची पूजा करा

भीषणाची पूजा करा ! मृत्यूची पूजा करा ! बाकी सर्व व्यर्थ आहे-बाकीची धडपड सर्व व्यर्थ आहे. हाच अखेरचा धडा ! तथापि भित्र्याला वाटणारें हें मृत्यूचें प्रेम नव्हे, अथवा दुबळ्याला, आत्महत्या करणाऱ्याला वाटणारेंहि नव्हे. ज्यानें प्रत्येक गोष्टीचा थांग घेतला आहे आणि येथें अन्य उपाय नाहीं हें जो ओळखतो, अशा सामर्थ्यसंपन्न माणसानें मृत्यूचें केलेलें तें स्वागत आहे.

( Vol. VIII pp. 268 )

## एकच कल्पना : शक्तीची उपासना

आमच्या लोकांमध्यें भ्रान्त कल्पना निर्माण करूं इच्छिणाऱ्या लोकांशीं मी सहमत नाहीं. केवळ नैसर्गिक रीत्याच आणि प्रचलित युगाच्या गुण-विशेषांची जोड घेऊन हिंदुस्थानच्या अंगचे गुणविशेष विकसित व्हावेत, अशी माझी इच्छा आहे. नवीन रचना ही आंतून विकसित होत आली पाहिजे.

एवढ्यासाठीं मी केवळ उपनिषदांवर भर देतों. उपनिषदांशिवाय दुसऱ्या कोणत्याच ग्रंथांतील वचनें मी उद्‌धृत करीत नाहीं. उपनिषदांमधीलसुद्धां एकच कल्पना, ‘शक्तीची उपासना ! ! ’ वेद आणि वेदान्त या सर्वांचें रहस्य या दोन शब्दांमध्यें सांठवलेलें आहे. अप्रतिकार किंवा अहिंसा हा बुद्धाचा मार्ग, पण मला उपनिषदांचा मार्ग जास्त चांगला वाटतो. ......

( Vol. VIII pp. 268–69 )

## श्रीकृष्ण आणि बुद्ध

श्रीकृष्णाच्या सर्वसंग्राहकतेपुढें बुद्धाचा संन्यासधर्म दुर्बल वाटूं लागतो. गीता-ग्रंथ केवळ अद्‌भुत आहे ... त्याच्या शब्दाशब्दांत सामर्थ्य भरलेलें आहे. बौद्धांच्या लिखाणानंतर गीतावाचन करूं जातां त्या दोन्हीमधील अंतर लक्षांत येऊन मनाला केवढें समाधान वाटतें ! तत्त्वज्ञानाबरोबर गीतेमध्यें काव्यसौंदर्य आहे. ‘मी सर्वसामान्यांचेसाठीं आहें’ असें बुद्ध म्हणत असे; पण त्याचेनंतर त्याच्याच नांवाखालीं या लोकांनीं कलोपासना आणि ज्ञान यांचा चुराडा केला. जुन्याचा नाश करण्यामध्यें बौद्धांनीं भयंकर चूक केली.

बौद्धांचीं पुस्तकें वाचणें म्हणजे शिक्षा आहे. मोठ्या थोरल्या ग्रंथांत एक दोन मौलिक वाक्यें सांपडतात. तथापि ते ग्रंथ सर्वसामान्य अशिक्षित जानपदांसाठींच लिहिलेले आहेत. पुराणेंसुद्धां सर्वसामान्य जानपदांसाठींच लिहिलेलीं आहेत. स्त्री–शूद्रापावेतों सर्वांना ज्ञान मिळविण्याची आवश्यकता आपल्या दूरदृष्टीनें ज्यानें पाहिली, असें सामर्थ्यशाली मन सर्व हिंदुस्थानांत एका श्रीकृष्णाचेंच होतें. आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्वांमध्यें तो सर्वश्रेष्ठ पुरुष आहे. त्यानें सर्वसामान्य लोकांची, समाजाची नड ओळाखली; आणि हिंदुधर्मानें आजपर्यंत जें जें संपादन केलें आहे, तें तें समन्वयानें रक्षण करण्याची असलेली आवश्यकताहि त्याचे ध्यानीं आली. गोपींच्या कथा आणि गीतें यांमध्यें स्त्रिया आणि शूद्र यांचेबद्दल पुनः पुनः लिहिलें आहे. या कथांच्या आणि महाभारताच्या द्वारें समाजाच्या सामान्य थरापर्यंत विचारांचें लोण त्यानें नेऊन ठेविलें. सर्व महाभारत त्याचेंच आहे. त्याच्या भक्तांनीं तें सर्वांपर्यंत नेऊन ठेविलें आहे. या महाभारताचा प्रारंभ ‘ हा ग्रंथ सर्व लोकांचेसाठीं आहे ’ या प्रतिज्ञेनें झाला आहे.

(Life of Swami Vivekananda pp. 797 Edi. III)

## तरुण आणि चैतन्यसंपन्न हिंदुस्थान

माझे दृष्टीनें हिंदुस्थान हा तरुण आणि चैतन्यसंपन्न दिसतो. युरोपसुद्धां तरुण आणि चैतन्यसपन्न आहे. पण आपल्या विकसनाच्या मार्गांत कोणीहि एवढ्या परिपूर्णतेला गेलेला नाहीं कीं आपण त्याच्या सामाजिक नीतिनियमांवर टीका करूं शकूं. हे दोन मोठे प्रयोग आहेत. त्यांतला कोणताच पूर्णत्वास गेलेला नाहीं. हिंदुस्थानामध्यें आतां आपण हिंदु विचारांच्या प्रयोगास, तो आहे त्या स्वरूपांत, हातभार लावला पाहिजे. येथील निरनिराळ्या गोष्टी जशा स्वरूपांत आहेत तशा स्वरूपांत त्यांना ज्या चळवळी साहाय्य करीत नसतील त्या व्यर्थ आहेत.

(Vol. VIII pp. 270–71)

## शिक्षण ! शिक्षण ! शिक्षण !

गेल्या अर्ध शतकांत सुधारणांचा मोठा गाजावाजा करण्यांत येत आहे. ......पण अशी एकहि संस्था नाहीं कीं जिच्या प्रेरणेनें खरोखरीचे ‘सज्जन’ निर्माण होतात. मुसलमानांनीं येथें किती शिपाई आणले होते ?

आज इंग्रज किती आहेत ? सहा रुपडयांसाठीं आईबापांचे गळे कापण्यास जे लक्षावधि लोक तयार होतात ते हिंदुस्थानविना अन्यत्र कोठें सांपडणार ! ७०० वर्षांच्या मुसलमानी राज्यांत ६ कोटी मुसलमान झाले; १०० वर्षांच्या इंग्रजी राज्यांत २ कोटी ख्रिश्चन झाले; कशामुळें हें ? अभिजात प्रज्ञा-प्रतिभा-या देशाला सोडून निघून गेली काय ? युरोपियनांच्या चढाओढी-पुढें आमचे कसबी कामगार अस्तंगत होऊं लागले काय ? व्यापारामध्यें कित्येक शतकापासून इंग्रज मजुरानें पक्का रोंवलेला पाय जर्मन मजुरानें उखडून काढला तो कोणत्या जोरावर ?

शिक्षण ! शिक्षण ! शिक्षण ! केवळ शिक्षण !

(Vol. IV pp. 415, 16 Edi. III)

## आत्मजागृति आणि शिक्षण

आत्मजागृति प्रथम घडली पाहिजे. आत्मजागृति मिळवणें याचा अर्थ दंड-कमंडलु घेऊन गुहेंत जाणें हा नाहीं. जी आत्मजागृति मोक्षहि मिळवून देऊं शकते ती काय सामान्य भौतिक संपदा मिळवून देऊं शकणार नाहीं ? **स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्** ।। याबरोबरच शिक्षण दिलें पाहिजे. तूर्त हें शिक्षण संभाषणावाटेंच द्यावें लागणार. कारण प्रत्येक ठिकाणीं शाळा काढण्यासारखी परिस्थिति नाहीं. हळ-हळू शेती-शिक्षण, धंदे-शिक्षण द्यावें, कलोपासनाच्यासाठीं कलागृहें उघडावींत. यांत तयार झालेला माल इंग्लंड, अमेरिकेंत खपविण्यासाठीं विक्रयमंडळें लागतील. पुरुषांच्याच प्रमाणें स्त्रियांचींहि केन्द्रें उत्पन्न केलीं पाहिजेत. या कार्याला पैसा लागेल. तो पाश्चिमात्य देशांतूनच आला पाहिजे-सापानें आपलें विष ओढून घेतलें पाहिजे-हा माझा अगदीं ठाम विश्वास आहे.

(Vol. IV pp. 417-18 )

## रशियन आणि अमेरिकन भुतांची आवश्यकता नाहीं

या लेखकाच्या मताचा प्रश्न सोडून दिला, तरी हें निश्चित कीं, आजच्या कलियुगांतसुद्धां हिंदूंच्याजवळ धर्मविचार नि विचारी पुरुष पुष्कळ आहेत. रशियन आणि अमेरिकन भुतांची त्यांना कांहींच आवश्यकता नाहीं.

(Vol. IV pp. 264)

## निसर्गावर विजय मिळविणें यांतच मुक्ति

स्वातंत्र्य–मुक्ति–हें आपलें ध्येय आहे. निसर्गनियमांसमोर मान वांकवून राहणें म्हणजेच स्वातंत्र्य ही कल्पना मला मान्य नाहीं. निसर्गशक्तीला न जुमानण्यामध्यें मनुष्यमात्राची प्रगति झालेली आहे. असें कोणी म्हणूं शकेल कीं, निसर्गाच्याच उच्च तत्त्वांच्या–बंधनांच्या–साहाय्यानें निसर्गाचीं सामान्य बंधनें माणसानें तोडलीं–मुक्तता मिळवली. तथापि त्यानंतर विजिगीषु मनानें उच्च बंधनांनाहि जिंकण्याची ईर्षा धरली. थोडक्यांत मुक्ति हें ध्येय आहे. झाडें कांहीं निसर्गाची अवज्ञा करीत नाहींत; गाईनें चोरी केल्याचें मीं पाहिलेलें नाहीं. पण हीं कांहीं माणसांपेक्षां श्रेष्ठ नाहींत.

(Vol: VIII pp. 257–58 Edi I)

## स्त्रीशिक्षण कसें असावें ?

स्वतःचे प्रश्न त्या सोडवूं शकतील असें शिक्षण स्त्रियांना द्यावें. आतांपर्यन्त त्यांना दुबळेपणाचें, दुसऱ्यावर सर्वस्वानें अवलंबून राहण्याचें शिक्षण आम्हीं दिलें आहे. परिणाम असा कीं संकटाचा किंचित् वास आला असतां डोळ्यांतून टिपें गाळण्यापलीकडे त्या कांहीं करूं शकत नाहींत. इतर गोष्टींच्याबरोबर पराक्रमी, शौर्यशील होण्याचें शिक्षण त्यांना मिळावें. झांशीची राणी लक्ष्मीबाईचें उदाहरण किती उत्तम आहे !

(V ol. Vpp. 257–58)

## स्त्रियांनीं वेदान्ताचा प्रचार केला तर

पश्चिमेमध्यें स्त्रियांचें राज्य आहे. सर्व सामर्थ्य, प्रभाव त्यांचा आहे. वेदान्तांत उत्तम पारंगत अशा तुमच्यासारख्या स्त्रिया इंग्लंडमध्यें जाऊन प्रचार करतील तर भारतभूमीचा धर्म तिकडील शेकडों स्त्री-पुरुष स्वीकारतील! ... मैत्रियी, खन्ना, लीलावति, सावित्री, आणि उभयभारति यांच्या देशांत हें कार्य करणारी कोणीच पुढें येणार नाहीं काय ?

(Vol. IV pp. 418)

## आन्तर-जातीय विवाह

परधर्मियांशीं विवाह करावा असें मी सांगत नाहीं. अशा विवाहामुळें

समाज एकत्र ठेवणारे बंध तूर्त तरी निश्चितपणें ढिले पडतील आणि मोठा घोटाळा होईल.स्वधर्मियांमध्येंच आंतर–जातीय विवाह व्हावेत असें मी म्हणतों.

त्यासाठीं आज फार लांब जावयास नको. कामांत कमीतकमी अडथळे येतील अशा रीतीनें गेलें पाहिजे. एवढ्यासाठीं तूर्त पोटजातींत विवाह झाले तरी चालेल.

(Vol. Vpp. 254–55)

## शाकाहार कीं मांसाहार

शाकाहारासंबंधीं मला असें वाटतें. कीं, माझे गुरुदेव शाकाहारी होते; पण देवीला नैवेद्य दाखविलेलें मांस त्यांना कोणी दिलें, तर तें ते मस्तकीं धरीत असत. प्राणिहत्या पापमय आहे यांत शंकाच नाहीं. तथापि रसायन-शास्त्राचा उपयोग करूनहि जोपर्यंत शाकाहार मानवशरीरास उपयुक्त करतां येत नाहीं, तोंपर्यंत मांसाहाराविना अन्य उपाय नाहीं. माणसाला जोपर्यंत राजस–धकाधकीचें आयुष्य जगावयाचें आहे तोंपर्यंत मांसाहारांविना गत्यंतर नाहीं. तलवारीची धमकी देऊन सम्राट अशोकानें लक्षावधि प्राण्यांची हत्या वांचविली ! पण या हत्येपेक्षां आजची सहस्र वर्षांची दास्यता अधिक भयानक नाहीं का ? एका बाजूस कांहीं बकऱ्यांची हत्या आणि दुसऱ्या बाजूस स्वतःची स्त्री नि मुली यांच्या अब्रूचें रक्षण न करतां येणें, स्वतःच्या मुलांच्या हातांतील भाकरीचा चोरापासून बचाव न करतां येणें, या दोन्ही पैकीं अधिक पापकारक कोणतें ? जे शरीरश्रमावर आपली उपजीविका करीत नाहीत त्यांचें सोडून द्या, पण ज्यांना रात्रंदिन शरीरश्रम करून भाकरी मिळवावी लागते त्यांच्यावर शाकाहार लादला हें आमचें राष्ट्रीय स्वातंत्र्य आम्हीं कां गमावलें याचें एक कारण आहे. उत्तम पोषक अन्न काय करूं शकतें याचें जपान हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

(Vol. V pp. 419–20)

## संघाबद्दल निष्ठा हवी

तुम्ही आज्ञांकित असलें पाहिजे. 'नदींत उडी टाकून सुसरीला पकड,' अशी तुमच्या वरिष्ठानें आज्ञा केली तर ती तुम्हीं प्रथम पाळली पाहिजे. ती आज्ञा चूक असेल, तरी तिचें प्रथम पालन केले पाहिजे. मग लागल्यास तिचें खंडन करावें. आपल्या बंगालमध्यें कोणाचा पहिल्याशीं किंचित्‌हि मतभेद झाला कीं

तो नवीन पंथच चालू करतो. धीर धरणें त्याला माहीत नसतें. असें चालणार नाहीं. आपल्या संघाबद्दल तुम्हाला आत्यंतिक निष्ठा असली पाहिजे. येथें अवज्ञेला जागा नाहीं. अवज्ञेची दयामाया न करतां तिला चिरडून टाका. अवज्ञा करणारे सभासद येथें राहतां कामा नयेत. त्यांना हांकलून लावलें पाहिजे. आपल्यामध्यें कोणीहि विश्वासघातकी असतां कामा नये. तुम्ही आकाशासारखे विशाल आणि कुत्र्यासारखे आज्ञांकित राहावें.

(संन्यास, त्याचा आदर्श नि व्यवहार पान ४४७–४८)

## जडवाद् आणि पाश्चात्य संस्कृति

भला आपणांस स्पष्टपणें सांगूं दे कीं, जडवादामुळें पाश्चात्य संस्कृतीच्या पायास मोठा हादरा बसला आहे. वरून चांगली दिसणारी भलीभक्कम, उंच इमारत जडवादाच्या वाळूवर उभी असेल तर आज ना उद्यां ती कोसळणारच. जगाचा इतिहासच याला साक्ष आहे. राष्ट्रामागून राष्ट्रें आलीं. जडवादावर त्यांनीं आपलें वैभव आधारलें आणि तीं सर्व धुळीला मिळालीं.

(हिंदुत्वांतील समान भूमिका–पान ३८०)

## नक्कल करूं नका

निष्कारण घाई करण्यांत अर्थ नाहीं. कुणाची नक्कल करण्यामागें लागूं नका. सिंहाचें कातडें पांघरलेलें गाढव सिंह होऊं शकत नाहीं. नक्कल, भ्रष्ट अनुकरण यांनीं उन्नति होत नाहीं. मनुष्याच्या अधःपतनाची ती सर्वांत मोठी खूण आहे. मनुष्य स्वतःचाच तिरस्कार करूं लागेल तर ती अधःपतनाची अखेरची पायरीच आहे. मनुष्य आपल्या पूर्वजांबद्दल घृणा व्यक्त करूं लागेल त्या वेळेस समजावें कीं त्याचा आतां शेवट आला आला आहे... ...खरोखरीच नक्कल करूं नका. जेव्हां मनुष्य दुसऱ्याच्या मुठींत असल्यासारखा वागूं लागतो तेव्हां तो स्वतःचें स्वातंत्र्य गमावतो. आध्यात्मिक बाबींतसुद्धां दुसऱ्याच्याच आज्ञेवर तुम्ही काम करीत असाल तर हळूहळू तुमची विचारशक्ति संपुष्टांत येते. तुम्हांला जें हवें असेल तें तुम्ही स्वतःच्याच पराक्रमानें निर्माण करा. दुसऱ्यामध्यें जें चांगलें असेल तें स्वीकारा; पण नक्कल

करूं नका.......दुसऱ्यापासून सर्व चांगलें शिका; पण तें तुमच्या पद्धतीनें आत्मसात् करा. हिंदु-जीवन-पद्धतींतून बाहेर ओढले जाऊं नका.

(हिंदुत्वांतील समान भूमिका, पान ३८१–८२)

## काय केलें पाहिजे ?

हिंदुस्थानामध्यें धर्मभावना ही कित्येक दिवस गतिशून्य झाली आहे. तिला आपण गतिसंपन्न केलें पाहिजे. प्रत्येकाच्या आचारविचारांत, आयुष्यांत धर्म येईल असें मला करावयाचें आहे. भूतकाळांतल्याप्रमाणें आतांहि राजापासून भणंग भिकाऱ्यापर्यंत प्रत्येकाच्या घरांत धर्म नांदलाच पाहिजे.

(हिंदुत्वांतील समान भूमिका, पान ८३)

## प्रकाश आणा कीं अंधार गेलाच

एखाद्या खोलींत शतकानुशतकें अंधार असला आणि त्या खोलींत जाऊन 'अरेरे! किती अंधार! किती अंधार!!' असा आपण शोक करूं लागलों तर तथील अंधार जाईल का? तेथें प्रकाश आणा म्हणजे अंधकार तत्काळ विलय पावेल. लोकांना कसें सुधारावें याचें रहस्य यांत आहे. मानवासंबंधीं मनांत विश्वास धरा आणि त्याला उच्चतर मार्ग सुचवा.

(हिंदुत्वांतील समान भूमिका, पान ३८३)

## दीर्घतम रात्र संपत आली

दीर्घतम रात्र संपत आली. आंत रुतलेलें शल्य नाहीसें होत आलें. मृतप्राय पसरलेला देह जीवित होतो असें वाटूं लागलें. अगदी खोल, दूर, आंत आंत इतिहासाचाहि आरंभ जेथें सांपडत नाहीं, जेथील काळोखांत परंपरेला डोकावतां येत नाहीं, पार तेथून हा एक ध्वनि येत आहे. ज्ञान, भक्ति नि कर्म यांच्या हिमालयाच्या–या हिंदुस्थानाच्या, या मातृभूमीच्या–प्रत्येक शिखराशिखरांवरून प्रतिध्वनित होत होत, हा ध्वनि आम्हांपर्यंत येऊन पोहोंचत आहे. अत्यंत अस्पष्ट पण धीरगंभीर आणि अर्थपूर्ण असा हा निनाद येणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक स्पष्टतर होत आहे! आणि केवढें भाग्य! हा झोंपी गेलेला देश जागृत होऊं लागला आहे.

(रामनद येथील मानपत्राला उत्तर, पान १४७)

## भविष्यकाल उज्वल आहे

भूतकाळामध्यें आम्हीं अद्वितीय यश संपादन केलें. त्याचा विचार करीत असतांना माझें मन अभिमानानें भरून येतें. पण आजची अवनतावस्था पाहून मला निराशा वाटत नाहीं, कारण भविष्यकाळामध्यें काय घडणार आहे याचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर आहे. उज्वल भविष्यकाळ कशावरून म्हणतां ? बीज मातींत पडतें त्या वेळेला बाह्यत: त्याचा नाश झाल्यासारखें वाटतें, पण त्यांतच वृक्षाचा जन्म असतो. त्याप्रमाणेंच आतांच्या काळांत दिसून येणाऱ्या या अवनतीमध्येंच पूर्वापेक्षांहि दृढतर, शक्तिसंपन्न, आणि उज्वल असें आपल्या धर्माचें रूप विकसित होणार याचीं चिन्हें आहेत.

(आम्ही जन्म पावलों तो धर्म–४५४)

## आम्हीं जग जिंकलेंच पाहिजे

आपण सुचविल्याप्रमाणें खरोखरीच आम्हीं जग जिंकलेंच पाहिजे. माझें ध्येय हेंच आह. आम्ही एक तर विश्वविजय केला पाहिजे अथवा मेलें पाहिजे. तिसरा उपाय नाहीं. आपल्या या देशामध्यें असलेला हीन मत्सर आणि भांडणें सर्वांच्या परिचयाचींच आहेत. तथापि सर्व जगभर असलाच प्रकार आहे. पण बाकीच्या देशांना परराष्ट्रीय धोरणें असतात. घरचीं भांडणें फार वाढूं लागलीं म्हणजे ते बाहेरच्या कोणाशीं तरी भांडण उकरून काढतात आणि मग घरचीं भांडणें थांबतात. आमच्या घरीं भांडणें आहेत पण तीं थांबविण्यास आवश्यक असें परराष्ट्रीय धोरण आम्हांपाशीं नाहीं. जगांतील सर्व देशोदेशांना आपल्या शास्त्रांतील चिरंतन सत्यें शिकविणें हेंच आमचें नित्याचें परराष्ट्रीय धोरण असलें पाहिजे.

(कलकत्त्याच्या मानपत्राला उत्तर–पान ३१६)

* * ॐ * *

*

*

* * २ * *

*

*

# आम्हांसमोरील कार्य

आमच्या मार्गामध्यें अनेक अडचणी आहेत. त्यांत एक अडचण अशी आहे कीं, 'आम्हीच या जगांतले सर्वश्रेष्ठ लोक' अशी एक भ्रान्त कल्पना या ठिकाणीं आढळते. हिंदुस्थानबद्दल मला अतीव प्रेम आहे. परंतु मला हें स्पष्ट म्हटलें पाहिजे कीं, आम्हांला इतर राष्ट्रांचेपासून पुष्कळच शिकावयाचें आहे. आपण ध्यानात ठेवा कीं 'जो कोणी आपल्याला उपयुक्त विचार शिकवूं शकेल त्याच्या पायाशीं बसण्याची आपली तयारी असली पाहिजे. त्याच वेळीं आम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आम्हींसुद्धां आमच्याजवळचें ज्ञान जगाला दिलेंच पाहिजे. बाहेरच्या जगाविना आमचें चालणार नाहीं. बाहेरच्या जगाशीं आम्हीं संबंध ठेवला नाहीं त्याचें प्रायश्चित्त म्हणून एक हजार वर्षांची गुलामगिरी आम्हांला भोगावी लागली. आमच्या आसपास असणाऱ्या राष्ट्रांचें आम्हीं निरीक्षण केलें नाहीं, त्यांचेबरोबर आमची स्वतःची तुलना केली नाहीं, हें हिंदुमनाच्या अवनतीचें महत्त्वाचें कारण आहे.

त्यासाठीं आपण शिक्षाहि भोगलेली आहे. यापुढें ती चूक आतां नको. हिंदूंनीं हिंदुस्थानच्या बाहेर जाऊं नये असल्या सर्व कल्पना मूर्खपणाच्या आहेत. त्या तत्काळ ठोकरल्या पाहिजेत. जितके तुम्ही बाहेर जाल आणि जगांतील निरनिराळ्या देशांतून प्रवास कराल, तितकें तुम्हांला आणि तुमच्या देशाला उपयुक्त आहे. हें जर आपण शंभर वर्षांपूर्वींच केलें असतें तर येथें राज्य करणाऱ्या प्रत्येक परकीय देशाच्या पायाशीं बसण्याचा प्रसंग आम्हांवर ओढवताच कशाला ? विकास हाच जीवनाचा पहिला नियम आहे. तुम्हांस जगावयाचें असेल तर तुम्हांला वाढलें पाहिजे, पसरलें पाहिजे, मोठें झालें पाहिजे. ज्या क्षणीं तुम्ही तुमची वाढ थांबवतां त्या क्षणीं मृत्यु तुमच्याभोंवतीं घिरट्या घालूं लागतो. प्रचारकार्यार्थ हिंदुस्थानबाहेर जाणें ही कांहीं नवीन गोष्ट नाहीं. आपण हिंदुलोक सदान्कदा देशाच्या चार भिंतींच्या आंतच दडून बसलेलों आहोंत, अशी तुम्हांपैकीं जर कुणाची कल्पना असेल तर ती चूक आहे. स्वत: जगण्याकरतां प्रत्येक राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास कांहींना कांहीं तरी दिलेंच पाहिजे. आपण सहस्रों वर्षें जगत आहोंत याचाच अर्थ आपण दुसऱ्या लोकांना ज्ञान देत आलों आहोंत.

## भारतानें विश्वविजय केलाच पाहिजे

परंतु भारत विश्वाला काय देऊं शकेल ? भारताची विश्वाला मिळणारी देणगी म्हणजे धर्म, तत्त्वज्ञान, नि अध्यात्म ! बुद्धाच्याहि पूर्वी भारताचा वेदान्त चीनमध्यें, इराणमध्यें, ग्रीसमध्ये गेलेला होता. आणि ग्रीसमधून तो सर्व जगभर गेला. आजच्या सुधारणा युगाचा गर्व मानणारा ख्रिश्चनधर्म म्हणजे हिंदुधर्मांतील बारीकसारीक तुकड्यांचा मिळून केलेला सांगाडा आहे. बुद्धधर्म ही हिंदुधर्माची एक शाखा आणि या शाखेची ख्रिश्चनधर्म ही भ्रष्ट नक्कल आहे. आतां हें वर्तुळ पुन्हां पुरें केलें पाहिजे. पुन्हां एकवार सबंध जगाला येथून स्फूर्ति मिळाली पाहिजे. आतां केवळ आमचाच देश आम्हांला पुनरुज्जीवित करावयाचा असें नाहीं. तें एक अत्यल्प कार्य आहे. मी कांहींसा कालदर्शी मनुष्य आहें. मला वाटतें हिंदु जातीनें आतां विश्वविजय करणें हेंच आमचें कार्य आहे.

जगांमध्यें अनेक विजेत्या जाति आहेत. आम्ही सुद्धां विजेतेच आहोंत. आमच्या विजयाची कथा सम्राट अशोकानें लिहून ठेवलेली आहे. खरोखरी

हिंदुस्थाननें पुन्हां एकदां जग जिंकलेंच पाहिजे. ही माझ्या जीवनाची आकांक्षा आहे. तुमच्याहि प्रत्येकाच्या जीवनाची हीच आकांक्षा असली पाहिजे, आणि ती साध्य झाल्याशिवाय क्षणभरहि थांबलें न पाहिजे. लोक तुम्हांला सांगतील कीं, 'आपण आपलें घर प्रथम सुधारावें!' पण मी तुम्हांला स्पष्ट सांगतों कीं जेव्हां आपण दुसऱ्याकरतां काम करतों तेव्हांच उत्कृष्ट कार्य होतें. ज्या वेळेला या देशातील लोक समुद्रापलीकडे जाऊन परकीय भाषांतून आपल्या कल्पना प्रसृत करीत होते त्याच वेळेला ते आपल्या देशाची श्रेष्ठ सेवा करीत होते. इंग्लंड, अमेरिकेला मी गेल्यानें जो परिणाम झाला त्याच्या एक चतुर्थांशसुद्धां मी केवळ हिंदुस्थानांतच राहिलों असतों तर झाला नसता.

हें आपल्यासमोरचें परमध्येय आहे आणि प्रत्येकजण त्यासाठीं सिद्ध असला पाहिजे. विश्वविजय! त्यापेक्षां अन्य कमी कांहींहि नाहीं. पाश्चात्यांना खुशाल सैन्याच्या जोरावर धरित्री जिंकूं द्या! भारतानें अध्यात्माच्या बळावर विश्वविजय करावयाचा आहे. खरोखर याच भूमीवर हें प्रथम शिकविलें गेलें आहे–

**अक्रोधेन जयेत् क्रोधम् असाधुम् साधुना जयेत् ।**

जडवाद आणि जडवादांतून उत्पन्न होणारीं दुःखें हीं जडवादाच्याच जोरावर नाहींशी करतां येणार नाहींत. अध्यात्मानेंच पश्चिमेला जिंकलें पाहिजे. स्वतःचें राष्ट्र वांचविण्याचा एकच मार्ग म्हणजे अध्यात्माचा आश्रय करणें, हें त्यांच्या हळूहळू ध्यानांत येऊं लागलें आहें. आणि म्हणून त्याची ते वाटहि पाहत आहेत. पण हें अध्यात्म त्यांना कोठून मिळणार? जगताच्या कानाकोपऱ्यांमध्यें हा संदेश पोचवूं असें म्हणणारे धीर पुरुष कोठें निपजणार? म्हणून हे मद्रासमधील तरुणांनो, मी आपणांस सांगूं इच्छितों आपण बाहेर गेलेंच पाहिजे. आपण आपल्या अध्यात्मानें आणि तत्त्वज्ञानानें जगाला जिंकलेंच पाहिजे. याशिवाय मार्ग नाहीं. एक तर हें केलें पाहिजे अथवा मेलें पाहिजे. आपल्या देशांतील राष्ट्रीय चैतन्य जागृत असल्याचें आणि प्रफुल्लित असल्याचें लक्षण एकच कीं, हिंदु–विचार–संपदेच्या आधारानें आपण विश्वविजय करणें.

## भ्रांत कल्पनांना थारा देऊं नका

कृपा करून भ्रांत समजुतींना यत्किंचितहि थारा देऊं नका. पाश्चात्य

ज्ञानाचा प्याला प्यायलेल्या कित्येकांना सर्व हिंदुविचार म्हणजे आचरटपणाचा नमुना वाटतो; हिंदुतत्त्वज्ञान बाष्कळ, बालिश बडबड वाटते आणि धर्म म्हणजे मूर्ख लोकांचें कल्पनाजाल वाटतें. याच्या विरुद्ध असे कांहीं शिकलेलेच लोक आहेत कीं ज्यांच्या मतें प्रत्येक खेड्यापाड्यांत सांपडल्या जाणाऱ्या लोकभ्रमांना नि भ्रान्त स्वप्नाळू समजुतींना वेदामध्यें आधार सांपडतो. तुम्हीं या सर्व गोष्टींपासून दूर राहिलें पाहिजे. तुमच्यापैकीं प्रत्येकजण असल्या भ्रामक समजुतींना बळी पडण्याऐवजीं केवळ जडवादी झाला तरी मला चालेल; कारण जडवादी हा जिवंत असतो आणि तुम्ही त्याला कांही समजावून सांगूं शकतां; पण एकदांका मनुष्य भ्रान्त कल्पनांना चिकटला कीं बुद्धि गेलीच म्हणून समजा. हीं दोन्हीं टोंकें सोडून द्या. आपणांस आतां धैर्यशील, पराक्रमपूर्ण अशीं माणसें हवीं आहेत. रक्तामध्यें उत्साह, मनगटांत सामर्थ्य, पोलादाचे स्नायू, आणि पोलादाचें मन या गोष्टी हव्या आहेत. बावळट-सावळट, लिचपिच्या कल्पनांचा येथें कांहीं उपयोग नाही. सर्व गूढवाद सोडून द्या. धर्मामध्यें अथवा वेदांमध्यें कोठेंच गूढवादाला जागा नाहीं. जितक्या लवकर गूढवाद, असल्या भ्रामक कल्पना, आपल्या डोक्यांतून आम्ही काढून टाकूं तितक्या लवकर आपला धर्म, आपलें राष्ट्रीय जीवन, आपलें अध्यात्म शुद्धतर होणार आहे.

## हिन्दुधर्म हाच विश्वधर्म

★आज जगांतील प्रत्येक धर्म, मी विश्वधर्म आहें अशी घोषणा करतांना आढळतो. मला आपल्याला स्पष्टपणें सांगूं दे कीं एक तर विश्वधर्म म्हणून कोणतीहि चीज अस्तित्वांत येणारच नाहीं अथवा असा कांहीं विश्वधर्म असेल तर तो केवळ आपलाच असणार अन्य असणार नाहीं.★

कारण बाकीचे अन्य सर्व धर्म कोणत्या तरी व्यक्तीवर आधारलेले आहेत. आमचाच एक धर्म असा आहे कीं, जो व्यक्तीवर न आधारला जातां चिरंतन तत्त्वांवर आधारला आहे. हीं आमच्या धर्माचीं चिरंतन तत्त्वें आजवर सुरक्षित आहेत आणि येथून पुढें त्यांना सुरक्षित ठेवणें, आणि प्रभावी अशा कालौघांत त्यावर धूळ चढूं नये, कलंक उत्पन्न होऊं नये यासाठीं जपणें हेंच आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य आहे.

हिंदुजातीवर आलेल्या अनेक आपत्तींतूनहि वेदांताच्या तत्त्वांचें तेज कधीं कमी झालें नाहीं. हे वेदग्रंथ केवळ अद्वैतप्रतिपादक आहेत अथवा केवळ

द्वैतप्रतिपादक आहेत अशी त्यांची ओढाताण केली जात आहे. वास्तविक त्यांतील कांहीं भाग केवळ अद्वैतवादी आहे नि कांहीं भाग केवळ द्वैतवादी आहे. पण यामध्यें कोणतीच विसंगति नाहीं. कारण द्वैत आणि अद्वैत या दोन्हीहि एकाच ध्येयाकडे नेणाऱ्या, नियमानें येणाऱ्या पायऱ्या आहेत. अशा या पायऱ्यांच्याबद्दल आपण भांडत बसण्याचें कारण नाहीं. पूर्वींचे टीकाकार कदाचित् भांडत असले तरीसुद्धां आपण त्यांच्यापासून मुक्त असलें पाहिजे. कारण ज्ञानाला मर्यादा असूं शकत नाहीं.

## प्रत्येकानें मंत्रद्रष्टा झालें पाहिजे

पूर्वकाळांत व्यास, वाल्मीकि, शंकराचार्य होऊन गेले असतील तर आतांच्या काळांत तुमच्यामधून शंकराचार्य जन्माला कां येऊं नयेत ? पूर्वींच्या भारतांतील हे ऋषी म्हणजे मंत्रद्रष्टे होते. जे मंत्रद्रष्टे असतात त्यांनाच सत्य समजतें. जे केवळ बोलतात, जे केवळ पुस्तकांत बुडून राहिलेले आहेत, जे केवळ विद्वान् आहेत, जे केवळ शब्दशास्त्री आहेत त्यांना सत्य समजतें असें नाहीं. वेदांमध्यें असेंच आहे. 'खुद्द वेदांचा अभ्यास केल्यानेंहि आत्मप्राप्ति होणार नाहीं,' असें श्रुतींत म्हटलें आहे. त्यासाठीं आपलें अंतःकरण आपण उघडलें पाहिजे. अंतःकरणाचीं कवाडें उघडल्याखेरीज ईश्वरत्व कळणार नाहीं.

म्हणून ज्या कोणाला मुक्ति मिळवावयाची असेल त्या प्रत्येकानें मंत्रद्रष्टा झालें पाहिजे.

★ पूर्वकाळामध्यें मोठमोठे थोर पुरुष होऊन गेले; पण आपण त्यांपेक्षांहि थोर झालें पाहिजे. त्यांनीं भूतकाळांत फार मोठें कार्य केलें; आम्हीं त्यापेक्षांहि अधिक मोठें कार्य केलें पाहिजे. जुन्या भारतामध्यें शेंकडों ऋषि होते; आतांच्या आमच्या हिंदुस्थानामध्यें लक्षावधि ऋषि होतील !! यावर श्रद्धा ठेवा. जितक्या त्वरेनें तुम्ही श्रद्धा ठेवाल तितक्या लवकर हिंदुस्थानचें आणि जगाचें भलें होईल. जो जशी श्रद्धा ठेवतो तसा तो होतो. 'मी स्वतः धीट आहें' अशी तुम्हीं श्रद्धा ठेवलीत तर तुम्ही धीट व्हाल. 'आम्ही ऋषि आहोंत, अशी श्रद्धा केलीत कीं तुम्ही उद्यां ऋषि व्हाल. तुमच्या मार्गांत कोणताहि अडथळा येऊं शकणार नाहीं. ★

कारण सर्व प्रकारच्या परस्पर-विरोधी नि परस्पर-विसंगत वाटणाऱ्या पंथोपपंथांमध्यें हेंच एक तत्त्व मुळाशीं गोवलेलें आहे कीं, सर्व सामर्थ्य, सर्व शुद्धता, सर्व वैभव, हें आत्म्यामध्यें मूलतःच आहे. रामानुजाचार्यांच्या मताप्रमाणें हा आत्मा केव्हां केव्हां आकुंचित होतो, तर केव्हां केव्हां प्रगल्भ होतो, आणि शंकराचार्यांच्या मताप्रमाणें मायावरणानें केव्हां केव्हां तो केवळ झाकोळला जातो. पण या मतभेदाकडे तुम्ही लक्ष देऊं नका. सुप्त वा असुप्त सर्व शक्ति आत्म्यामध्येंच आहेत, यावर मात्र सर्वांचें एकमत आहे. यावर जेवढी तुम्ही श्रद्धा ठेवाल तितकें उत्तम. सर्व शक्ति तुम्हांमध्येंच आहे; तुम्ही काय हवें तें करूं शकतां; हा आत्मविश्वास असूं द्या. आम्ही दुबळे आहोंत, आम्ही अर्धवेडे आहोंत, असें आजकाल कित्येक समजतात, तसें समजूं नका. एकाद्याच्या मार्गदर्शनाविनासुद्धां तुम्हीं जें मनांत आणाल तें करूं शकाल. कारण सर्व शक्ति त्या ठिकाणीं आहे. उभे राहा आणि आपल्यांतील असलेलें ईश्वरत्व प्रकट करा !

(आम्हांसमोरील कार्य, पृष्ठें २६९ ते २८४)

*

*

* * ॐ * *

*

*

* * ३ * *

*

*

# हिंदुस्थानचा भविष्यकाळ

दुसऱ्या कोणत्याहि देशांत जाण्यापूर्वीं ज्या ठिकाणीं ज्ञानानें आपला निवास प्रथम केला, ज्याच्यामधील अध्यात्म सागरासारख्या सरितांमधून दृश्य होतें, एकावर एक कडी करणाऱ्या हिमशिखरांवरून स्वर्गीतल्या चमत्कारांचें अवलोकन करणारा चिरंजीव असा हिमाचल ज्या ठिकाणीं आहे असें स्थान, अशी भूमि म्हणजेच आमची थोर पुण्यभूमि.

अहो हिंदुराष्ट्र-संतान ! केवळ भूतकाळांतील स्मृति जागृत करून द्यावी एवढ्याचसाठीं मी आपल्यासमोर उभा नाहीं. तथापि भूतकाळांतून भविष्यकाळ बांधला जात असतो आणि म्हणून भूतकाळांत जितकें दूरवर पाहतां येईल तितकें पाहून, तेथील अमृत-निर्झरांचें आकण्ठ पान करून भविष्यकाळाकडे चालत जावयाचें असतें. आपणाला तर आपला हिंदुस्थान पूर्वी होता त्यापेक्षां अधिक तेजस्वी, अधिक उदात्त, अधिक थोर करावयाचा आहे.

## विविधतेंतील एकता

हिंदुस्थानचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आहेत. वंश, धर्म, भाषा आणि राज्यशासन मिळून राष्ट्र होतें. या ठिकाणीं जगांतील विविध वंश एकत्रित आलेले आहेत. विविध भाषांची एक रमणीय गुंफण झाली आहे. आचार, विचार आणि चालीरीति यांमध्यें प्रसंगीं पाश्चिमात्य आणि पौर्वात्य यांच्यांत जितकें अंतर सांपडणार नाहीं, तितकें अंतर भारतांतील दोन जातींत सांपडतें. तथापि या सर्वांमध्यें एक समान भूमिका आहे. ती म्हणज आमची पवित्र परंपरा, आमचा धर्म ! ही एवढीच भूमिका समान आहे आणि त्यावरच पुढची बांधणूक करावयाची आहे. युरोपमध्यें राजकीय विचारांतून राष्ट्रीय ऐक्य होतें. आशियामध्यें धार्मिक ध्येयकल्पना राष्ट्रीय ऐक्य निर्माण करतात. म्हणून भविष्यकालीन हिंदुस्थानांत या टोकापासून त्या टोकापर्यंत एकाच एक धर्माला मान्यता मिळावी अशी आवश्यकता आहे. धर्म या शब्दानें मी काय अर्थ व्यक्त करूं इच्छितों ? ख्रिश्चन, मुसलमान, अथवा बुद्ध हे लोक धर्म शब्दाचा जसा अर्थ समजतात तसा माझा अर्थ, नव्हे. आपणांस माहीत आहे कीं, आपल्या धर्मामध्यें सकृत्दर्शनीं स्वतंत्र भासणाऱ्या पंथोपपंथांना एकत्र करणारी अशी भूमिका आहे. ज्यांनीं विचार केलेला आहे त्यांना हें माहीत आहे कीं, आमच्या धर्मामध्यें जीवनदायी असलेलीं आणि सर्व पंथांना समान अशीं तत्त्वें आहेत. प्रत्येक स्त्री-पुरुषानें आणि बालकानें त्यांचें ज्ञान करून घेऊन तीं तत्त्वें आपल्या आयुष्यांत उतरविलीं पाहिजेत. हेंच आम्हां सर्वांपुढील पहिलें काम असलें पाहिजे.

## आम्हांस धर्माविना तरणोपाय नाहीं

धर्मानें दिग्दर्शित केलेलें ध्येय हेंच आम्हांमधील सर्वोत्कृष्ट ध्येय होय. कोणतेंहि कार्य करण्याचा तो एकच मार्ग आहे. हा मार्ग प्रथम परिपुष्ट केल्याविना दुसऱ्या कोणत्या मार्गानें काम करूं पाहणें धोक्याचें ठरेल. म्हणून भविष्यकालीन भारताच्या घडणीमधील पहिली गोष्ट अथवा पाया म्हणजे सर्व पंथोपपंथांना एकत्रित करणें हा होय. आम्ही द्वैती असूं वा अद्वैती असूं, शैव असूं अथवा वैष्णव असूं, आम्हां सर्वांना सामावून घेणारें कांहीं तरी आहे हें आम्हीं हिंदूंनीं शिकलें पाहिजे. आणि आपल्या जातीच्या उत्कर्षासाठीं आम्हांमधील हीं क्षुल्लक भांडणें आणि मतभेद सोडून दिले पाहिजेत.

हीं भांडणें सोडल्याबरोबर आमच्या समाजशरीरांतील रक्त सामर्थ्य-शाली होऊन त्या शरीरांतील रोगजंतूंचा विनाश करील. आमचें अध्यात्म हेंच आमच्या शरीरांतील रक्त आहे. या शरीरांतून शुद्धावस्थेत आणि शक्तिशालित्वानें तें वाहील तर सर्व कांहीं ठीक होईल. राजकीय, सामाजिक, अथवा भौतिक दोष आणि या भूमीचें दारिद्र्यसुद्धां हें रक्त शुद्ध होईल तर दूर होऊं शकेल.

★ आमचें सामर्थ्य, आमची शक्ति, इतकेंच काय पण आमचें सर्वच राष्ट्रीय जीवन आमच्या धर्मामध्यें आहे. हें योग्य अथवा अयोग्य आहे, हें उपकारक आहे अथवा अनुपकारक आहे, याची चर्चा करून उपयोग नाहीं. हें आहे हें आहे आणि यापासून तुम्हांला दूर जातां येणें शक्य नाहीं. तुम्ही यापासून दूर जाऊं पहाल तर तुमचे तुकडे तुकडे होतील. ★

शतकानुशतकें तुमच्यावर झालेल्या आक्रमणांना तुम्ही तोंड देऊं शकलांत याचें कारण इतकेंच कीं तुम्ही त्या चैतन्याची काळजी घेतलीत. त्याच्यासाठीं तुम्हीं त्याग केलात; तुमच्या पूर्वजांनीं असह्य अशा सर्व तऱ्हेच्या हालअपेष्टा सहन केल्या; प्रत्यक्ष मृत्युहि पत्करला; पण धर्मरक्षण केलें. परकीय विजेत्यांच्यापुढें देवळांमागून देवळें पडलीं. पण आक्रमणाची लाट ओसरल्या-बरोबर देवळांचे कळस आकाशांत पुन्हा उभे राहिले. या दक्षिण भारतांतील जुनीं देवालयें किंवा गुजराथेंतील सोमनाथाचें मंदिर हीं तुम्हांला अन्य कोणत्याहि पुस्तकापेक्षां अधिक मौलिक असें शहाणपण शिकवितील आणि या हिंदुजातीच्या इतिहासाकडे पाहाण्याची सखोल दृष्टि आणून देतील. त्या देवालयांचा संदेश हाच आपला राष्ट्रीय-जीवन-प्रवाह आहे. त्याचें अनुसरण करा, तो तुम्हांला यशाप्रत नेईल. त्याबद्दल उदासीन राहाल, तर मृत्यु हाच त्याचा परिणाम होईल. अन्य गोष्टी आवश्यक नाहींत, असें माझें म्हणणें नाहीं. राजकीय अथवा सामाजिक सुधारणा नकोत, असें मला म्हणावयाचें नाहीं. पण आपण लक्षांत ठेवा कीं, त्या गोष्टी दुय्यम आहेत व धर्म ही गोष्ट प्रधान आहे. दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीच्या पूर्वीं हिंदुमन हें धर्मशील आहे आणि म्हणून तें बळकट केलें पाहिजे. तें कसें करावें यासंबंधीं माझ्या कल्पना मी आपणांसमोर मांडतों.

## अध्यात्माचीं रत्नें सर्वांना उपलब्ध करा

पहिली गोष्ट अशी कीं, आमच्या ग्रंथांमध्यें सांठविलेलीं अध्यात्म-विचारांचीं

रत्नें आज केवळ कांहीं थोडया लोकांची संपत्ति झालीं आहेत. कोठें मठामधून, कोठें रानांतील आश्रमांतून तीं दडलेलीं आहेत. तीं तेथून बाहेर काढलीं पाहिजेत. हीं अध्यात्मविचारांचीं रत्नें विद्वान लोकांपासून घेऊन सर्वांना उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. एवढेंच नव्हे तर ज्या संस्कृत भाषेच्या तिजोरींत हीं रत्नें ठेवलेलीं आहेत तेथूनहि तीं बाहेर काढलीं पाहिजेत. अशीं हीं तत्त्वें बाहेर काढून तीं लोकांना प्रिय केलीं पाहिजेत. संस्कृत भाषा ही देववाणी आहे. परंतु ती कोणाला समजत नाहीं, ही मोठी अडचण आहे. प्राकृतामधून वेदान्ताचे विचार शिकवण्याची कांहीं जणांनीं खटपट केली. तथापि संस्कृतीनें उच्च असलेल्या, संस्कृत भाषा बोलणाऱ्यांची उंची इतरांना आली नाहीं. आतां सर्वांनींच संस्कृत शिकलें पाहिजे. कारण जातिभेद नष्ट होण्यासाठीं उच्चवर्णाची संस्कृति, त्यांचें शिक्षण, त्यांचे आचार विचार या सर्व गोष्टींत दलित वर्गानें त्यांची बरोबरी केल्याविना दलितवर्गाची उन्नति होणार नाहीं.

## द्रविड आणि शूद्र यांच्याबद्दलच्या भ्रामक समजुती

आणखी एका कल्पनेची चर्चा मला करावयाची आहे. उत्तरभारतांतील आर्य समजल्या जाणाऱ्या लोकांच्याहून संपूर्ण वेगळा 'द्रविड' म्हणून कोणी वंश दक्षिण भारतामध्यें आहे. दक्षिण भारतांतील ब्राह्मणच केवळ आर्य लोकांपैकीं आहेत, बाकीचे सर्व रक्त, वंश या दृष्टीनें पाहतां अगदीं वेगळे आहेत. अशा तऱ्हेचा विचारप्रवाह कांहीं युरोपियन शब्दशास्त्रवेत्ते मांडत असतात. पण हा संपूर्ण निराधार आहे. याला पुरावा एकच देतात तो म्हणजे उत्तरभारत आणि दक्षिणभारत यांमधील भाषाभेद. येथें आपण इतके सर्व जमलेले आहोंत पण यांतून अमुक आर्य, अमुक द्रविड असें कोणी निवडून काढूं शकेल काय? जर पूर्वीं या ठिकाणीं संस्कृत भाषा बोलणारे ब्राह्मण आले आणि त्यांनीं संस्कृत भाषा सोडून या द्रविड भाषांचा स्वीकार केला, असें भाषाशास्त्रज्ञ म्हणतात तर बाकीच्या वर्णांनींहि तसेंच केलें नाहीं कशावरून? हें शक्य आहे कीं कालांतरानें येथें एका निराळ्या भाषेचा उदय झाला. पण या ठिकाणीं आहेत ते सर्व आर्यच आहेत.

शूद्रजाति या वन्य लोकांपासून झाल्या असा दुसरा एक गैरसमज आहे. तेजस्वी असे आर्य कोठूनतरी उत्तर-आशियांतून आले आणि येथील

वन्यलोकांना त्यांनीं दास केलें, असें युरोपियन लोक स्वतःच्या उदाहरणावरून समजतात. आर्य कोठून आले याबद्दल अनेक विचार प्रचलित केलेले आहेत. कोणी म्हणतात ते उत्तर ध्रुवापासून आले. पण या सर्व कल्पनांत कांहीं तथ्य नाहीं. आर्य हिंदुस्थानाहेरून कोठूनतरी आले याला वेदांमध्यें यत्किंचितहि पुरावा मिळत नाहीं. आणि म्हणून शूद्र हे वन्य होत, त्यांना आर्यांनीं दास केलें, ही कल्पना चुकीची आहे. महाभारतांत म्हटल्या-प्रमाणें सत्ययुगाच्या सुरवातीला केवळ एकच वर्ण होता. तो म्हणजे ब्राह्मणवर्ण. याच ब्राह्मणवर्णाचे उद्योगधंद्यानुसार निरनिराळे भेद पडून बाकीचे वर्ण उत्पन्न झाले. आणि पुन्हा येणाऱ्या भविष्यकालीन सत्ययुगामध्यें या सर्व जाती परस्परांत विलीन होऊन पुन्हां एकदां एक वर्ण, ब्राह्मणवर्ण नांदूं लागेल. हिंदुस्थानांतील जातपातीच्या प्रश्नांना एवढेंच उत्तर ! ब्राह्मण वर्ण नष्ट करावयाचें नाहीं, तर बाकीच्या वर्णांना ब्राह्मण करावयाचें.

## जातिसंस्थेंतील प्रवाहत्व

या जातपातीमधील कलहामध्यें काय अर्थ आहे ? त्यांतून चांगलें काय निष्पन्न होईल ? त्यामुळें आपल्यांतील भेद मात्र अधिक तीव्र होतील. आपण अधिक दुर्बल होऊं. अधिक भ्रष्ट होऊं ! उच्च वर्णियांनीं जाणावें कीं आपल्या वर्णाची श्रेष्ठता आणि वर्णाचे विशिष्ट अधिकार गाजविण्याचे ते दिवस संपले. आपल्यांतील एकपंचमांश लोक मुसलमान नाहीं का झाले ? हें केवळ तलवारीनें झाले असें समजूं नका. हिंदुसमाजांतील दुसरे एकपंचमांश आणि अहो मद्रास प्रान्तियांनो, तुमच्यांतील एकद्वितीयांश लोक तुम्हीं काळजी घेतली नाहींत तर ख्रिश्चन होतील. मलबारमध्यें मी जें दृश्य पाहिलें तसें दुसरीकडे आढळून येईल का ? उच्चवर्णीय ज्या रस्त्यानें जातात, अस्पृश्याला त्याच रस्त्यानें जातां येत नाहीं ! हाच अस्पृश्य उद्यां इस्टुर फांकडा झाला अथवा सोम्यागोम्याखान झाला कीं सर्व व्यवस्थित होतें. यावरून तुम्ही काय तर्क काढाल ? एवढाच तर्क काढाल कीं हे मलबारी लोक वेडेपिसे असले पाहिजेत. स्वतःचीं च मुलेंबाळें भुकेनें तडफडूं मरूं देतात आणि त्यांनीं आपला धर्म बदलला कीं मात्र त्यांना पोटभर खायला घालावयास तयार होतात ! या वृत्तीचा धिःक्कार असो.

जातिसंस्था ही पक्की आणि खिळलेली आहे असें नाहीं. ब्राह्मणत्व हें एक टोंक आहे. चांडाळ हें दुसरें टोंक आहे. चांडाळत्वापासून ब्राह्मणत्वापर्यंत जातींचा प्रवास अव्याहत चालू असला पाहिजे. आहे तीच जात नित्य तशीच राहिली पाहिजे असें नाहीं. संक्रमणानें वरची जात स्वीकारतां येते. दुष्कृत्यांनीं जातीचें उच्चत्व नाहींसें होऊन नीचत्व येतें. कल्पना करा कीं एक १०००० लोकांची जात आहे. हे सर्व १०००० एक झाले आणि स्वतःला ब्राह्मण म्हणवूं लागले तर त्यांना तसें म्हणण्यापासून कोण थांबवूं शकेल ? मीं माझ्या डोळ्यांदेखत असे प्रकार पाहिले आहेत.

★ मागें शंकराचार्यादिकांनीं शेंकडों वलुच्यांना क्षत्रियत्व दिलें, शेंकडों कोळ्यांना ब्राह्मणत्व दिलें असें त्यांनीं केलें. कारण ते ऋषि होते. तुम्हीं सुद्धां ऋषि व्हा. आपल्यापैकीं प्रत्येकानें अंशमात्रानें का होईना पण ऋषि झालें पाहिजे. ऋषि म्हणजे काय ? ऋषि म्हणजे पावनपुरुष. स्वतः पावन व्हा, पवित्र व्हा. मग तुम्हांजवळ सामर्थ्य येईल. लोक तुमच्या पाठोपाठ येतील आणि स्वतःची इच्छा नसली तरी ते तुमचें ऐकतील. ★

**ब्राह्मणाला वृथा दोष कां ?**

याबद्दल इतर अनेक गोष्टी आहेत. पण या सर्वांना पूर्ण स्वरूप यावयास अनेक पिढ्या परिश्रम करावे लागतील. पण मार्ग हा आहे. जातिवैषम्य थांबलेंच पाहिजे. भारतांतील मानवाच्या सुखासाठीं प्रयत्न करणें हें ब्राह्मणाचें काम आहे. हें जोंपर्यंत तो करतो आहे तोंपर्यंत तो ब्राह्मण आहे. अशाच ाह्मणाला तुम्ही मदत करा. हें खरेंच आहे कीं ब्राह्मण हा भूतकाळांत सर्व वर्णांचा गुरु होता. हें पद प्राप्त करून घेण्यासाठीं त्यानेंच प्रथम संन्यास पत्करला. ब्राह्मणवर्ण हा इतर वर्णांच्या पुढें गेला हा त्याचा दोष नाहीं. बाकीच्या वर्णांच्या हें कां लक्षांत आलें नाहीं ? ते आळशीपणानें स्वस्थ कां बसले ? उगाच ब्राह्मणाला दोष देऊं नका. तुम्ही अध्यात्माकडे दुर्लक्ष कां केलेंत ? आणि संस्कृत भाषेचा अभ्यास कां सोडून दिलात ? आतां दुसऱ्यांना अधिक बुद्धि आहे. त्यांना अधिक कळतें अशा तक्रारी करण्यांत काय अर्थ आहे ? वृत्तपत्रांतून अशा तक्रारी करून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणें, घरांघरांतून हीच भांडणें चालविणें, असल्या गोष्टींत वेळ घालविण्याऐवजीं ब्राह्मणांनीं जी संस्कृति संपादन केली तीच तुम्हींहि संपादन केलीत तर प्रश्न नाहीं का सुटणार ? तुम्ही स्वतः संस्कृत भाषा कां शिकत

नाहीं ? हिंदुस्थानांतील इतर जातींना संस्कृत शिकविण्यासाठीं लाखों रुपये खर्च कां करीत नाहीं ? हा खरा प्रश्न आहे. ज्या क्षणीं तुम्ही हें कराल, त्या क्षणीं तुम्ही ब्राह्मणांच्या समान व्हाल ! संस्कृत भाषेचें ज्ञान आणि सांस्कृतिक उच्चता या गोष्टी हिंदुस्थानांत बरोबरीनें जात असतात. हिंदुस्थानांतील सामर्थ्यसंपादनाचें हेंच रहस्य आहे.

## संघटना पाहिजे : संघटना पाहिजे

आम्हांमध्यें संघटना पाहिजे. चार कोटी इंग्लिश लोक येथील ३० कोटी लोकांच्यावर राज्य करूं शकतात, याचें मानसशास्त्र दृष्टचा काय उत्तर येतें ? चार कोटी लोकांनीं आपल्या इच्छाशक्ति एकत्रित केल्या आहेत. त्यामुळें त्यांच्यांत प्रचंड शक्ति निर्माण झाली आहे. आणि आम्हां ३० कोटी लोकांपैकीं प्रत्येकाची इच्छाशक्ति स्वतंत्र आहे. हिंदुस्थान हा वैभवशाली करावयाचा असेल तर संघटना करणें, शक्तिसंपादन करणें, आणि सर्वांच्या इच्छाशक्ति एकत्रित करणें हीच गुरुकिल्ली आहे. अथर्ववेदांत म्हटलेलें नाहीं का—

**सं जानीध्वं सं पृच्छध्वं सं वो मनांसि जानताम्**
**देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ।।**

(अथर्ववेद ६–६४–१)

( तुम्ही एकहृदय व्हा, तुम्ही एक विचारी व्हा. कारण पूर्वकालांत देव एकहृदय झाले म्हणून त्यांना यज्ञीय हविर्भाग मिळतो. )

एवढ्यासाठीं एकहृदय व्हा. द्रविड आणि आर्य, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असल्या क्षुल्लक गोष्टीवर आम्ही जितके भांडत बसूं, तितके आम्ही सामर्थ्यापासून दूर जाऊं. इच्छाशक्तींचें एकत्रीकरण, सहकार्य, सर्वांचीं मनें एककेंद्र करणें यांतच खरें रहस्य आहे.

## देश बायकी झाला आहे

शेंकडों वर्षांच्या गुलामगिरीनें हा देश बायकी झाला आहे. मातांनो, मी बायकी असा शब्द वापरून दोष देतों याबद्दल मला क्षमा करा. पण जगभर कोठेंहि जा, बायका त्या बायकाच. दहा बायका एकत्र आल्या आणि त्यांच्यांतीलच एखादी बाई पुढारी म्हणून काम करूं म्हणेल तर टीकेनें त्या तिला फाडून खातील, तिला खालीं बसवतील. पण एखादा

पुरुष आला, तो त्यांच्याशीं कठोरपणें वागूं लागला, त्यांना टाकून बोलूं लागला, कीं त्या सुतासारख्या सरळ होऊन नीट वागूं लागतात. तीच गोष्ट आमच्या देशाची झाली आहे. आमच्यांतील कोणी देशबान्धव उभा राहून मी मोठा होतों म्हणेल तर सर्वजण त्याचे पाय ओढतील. त्याला चिरडून टाकतील. पण एखादा परकीय, परदेशी मनुष्य येऊन आम्हांला लाथा मारूं लागला म्हणजे आम्हांला गोड लागतें, आम्ही त्याचें पूर्ण ऐकूं लागतों. ही आम्हांला संवयच पडली आहे. दास ! आम्ही दास झालेले आहोंत ! पण आतां आपण स्वामी झालें पाहिजे.

## यापुढें दैवत एकच–मातृभूमि

या येत्या पन्नास वर्षांमध्यें ही आपली मायभूमि, थोरली आई, हिंदुभूमि हीच आपणां सर्वांची देवता असूं द्या. बाकीचे निरर्थक देव आमच्या मनांतून जाऊं देत. हेंच एक दैवत खरोखरी जागृत आहे. आमचें हिंदुराष्ट्र! सर्वत्र त्याचेच हात, सर्वत्र त्याचेच पाय, सर्वत्र त्याचेच डोळे ! तोच सर्वत्र व्यापून उरला आहे. बाकीचे देव सारे झोपलेले आहेत. आमच्या सभोंवतीं व्यापून उरलेल्या या विराट पुरुषाला विसरून दुसऱ्या कोण्या देवाचें पूजन करणें शक्य कसें आहे ? भूतकाळांत असें याचें पूजन करण्याऐवजीं परस्परां-विषयीं मत्सरग्रस्त होऊन आम्हीं एकमेकांशीं भांडलों. त्या भयंकर पाप-कर्माची फेड करणें वर्तमानकाळांत आमच्या नशिबीं आलें आहे.

## जीवनदायी शिक्षण दिलें पाहिजे

★ह्या देशांतील आध्यात्मिक आणि आधिभौतिक शिक्षण हें आपल्या हातांत असलें पाहिजे. आजचें सर्व शिक्षण सर्वस्वीं अभावात्मक, नकारात्मक आहे. मूल शाळेंत जातें. पहिल्या दिवशीं तें शिकतें कीं, स्वतःचा बाप मूर्ख आहे. दुसऱ्या दिवशीं त्याला समजतें कीं, स्वतःचा आजा वेडा आहे. पुढें कळतें कीं स्वतःचे गुरुजन भोंदू आहेत, आपले पवित्र ग्रंथ असत्यांनीं भरलेले आहेत. सोळा वर्षांचा होईपर्यंत तो हें सर्व चैतन्य-शून्य आणि अश्रद्धा निर्माण करणाऱ्या नकारांचे ढीग गोळा करतो.★

गेल्या पन्नास वर्षांत एकहि मनुष्य स्वयंभू, प्रज्ञावान् असा होऊन उदय पावला नाहीं. जीं थोर माणसें जन्माला आलीं त्यांनीं या शिक्षणापेक्षां अन्य ठिकाणीं संस्कार ग्रहण केले होते. चारित्र्य निर्माण करणारे, जीवनदायी

असें शिक्षण आम्ही देऊं शकलों पाहिजे. पण हें कसें कराल ? 'त्यासाठीं प्रथम एक मंदिर बांधा. कारण आपणा हिंदूंच्यामध्यें सर्व कार्याची सुरवात धर्मांतूनच होत असते. या मंदिरांत केवळ ॐ चीच स्थापना करा. ॐ वर विश्वास न ठेवणारा तो हिंदूच नव्हे. बाहेर ज्यानें त्यानें हिंदुत्वांतील हव्या त्या मतांचा पुरस्कार करावा. पण या देवळांत आल्यानंतर मात्र कोणालाहि कोणाशीं भांडतां येणार नाहीं. कारण तेथें सर्व मतांना आणि सर्व पंथांना एकच असणारी जी विशाल भूमिका तिचेंच शिक्षण दिलें जाईल.

## सर्व हिंदुस्थान प्रचारकांनीं व्यापून टाका

या मंदिराबरोबरच प्रचारक निर्माण करणारी एक संस्था पाहिजे. या प्रचारकांनीं धर्मप्रचार आणि भौतिक शिक्षणाचा प्रसार या दोन्हीं गोष्टी एकदमच कराव्यात. हळूहळू अशा रीतीनें सर्व हिंदुस्थान अशा मंदिरांनीं आणि प्रचारकांनीं आपण व्यापून टाकूं. माझी योजना ही अशी आहे. ही योजना तुम्हांला आकाशासारखी अनंत वाटेल परंतु हिची आवश्यकता अत्यंत अत्यंत आहे. तुम्ही विचाराल याला लागणारा पैसा कोठें आहे ? पण पैशाची आवश्यकता नाहीं. पैसा म्हणजे कःपदार्थ आहे. गेल्या बारा वर्षांत माझें पुढचें जेवण कोठून मिळेल, हेंसुद्धां मला माहीत नसे. परंतु पैसा आणि ज्या अन्य गोष्टी मला हव्या आहेत त्या आल्याच पाहिजेत, कारण मी त्यांचा दास नसून, त्याच माझ्या दास आहेत, पैसा आणि साधनें मिळालींच पाहिजेत अशी माझी दृढ श्रद्धा होती. पण माणसें कोठें आहेत ? मुख्य प्रश्न तो आहे. मद्रासमधील तरुणांनो, तुम्ही माझें आशास्थान आहांत. आपल्या देशाच्या या हांकेला तुम्ही ओ देणार कीं नाहीं ? माझ्यावर विश्वास ठेवा. तुम्हांपैकीं प्रत्येकाचें भविष्य अत्यंत उज्जल आहे. स्वतःसंबंधीं मनामध्यें विलक्षण श्रद्धा असूं द्या. बालपणीं प्राप्त झालेल्या अशाच श्रद्धेमुळें माझ्या हातून काम घडत आहे. अत्यंत अपार श्रद्धा, माझ्या आत्म्यामध्यें तीच अनंतशक्ति वास करत आहे अशी अपार निष्ठा तुम्हांमध्यें जागृत असूं द्या, सर्व हिंदुस्थान तुम्हीं चैतन्यपूर्ण कराल. मला अशीं तरुण माणसें हवीं आहेत.

★ जें सुकुमार आहे, शक्तिपूर्ण, आरोग्यपूर्ण आणि कुशाग्रबुद्धियुक्त आहे तेंच परमेश्वराजवळ जातें, असें श्रुतिवचन आहे. म्हणून उठा ! स्वत:चें भवितव्य ठरविण्याचा क्षण हाच आहे. जोंपर्यंत तुम्हांमध्यें तारुण्याची तडफ आहे, जोंपर्यंत तुम्ही थकलेभागलेले, फिकटलेले, गळालेलें झालेला नाहींत, उलट तारुण्याच्या उत्साहानें आणि टवटवीनें मुसमुसलेले आहात तोंपर्यंतच निश्चय करा ! उठा काम करा ! नुकतेंच फुललेलें, न हाताळलेलें, न वास घेतलेलें, पुष्प देवाच्या चरणीं अर्पण करावयाचें असतें, तें स्वहस्तानें ईश्वरार्पण करा ! ★

मी तुम्हांस मनापासून सांगतों, वकील व्हावयाचें आणि तमके व्हावयाचें असल्या आकांक्षा बाळगण्यापेक्षां फार मोठमोठीं कार्यें करण्यासारखीं आहेत. आपल्याच राष्ट्राच्या सुखासाठीं नव्हे, सर्व मानव्याच्या हितासाठीं सर्वस्व त्याग करणें हें फार मोठें कार्य आहे. आयुष्यांत यापेक्षां उदात्त असे अन्य काय असूं शकेल? तुम्ही हिंदु आहांत. आपणा हिंदूंचा विश्वास आहे कीं आत्मा अमर आहे आणि म्हणून आयुष्य अल्प असलें तरीसुद्धां सर्व आयुष्य त्याकरितां समर्पण करा ; हाच आपणां सर्वांचा निश्चय असूं द्या.

'**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे**' असें गीतेंत म्हणणारा तो श्रीकृष्ण आपणांस आशीर्वाद देवो, आपणा सर्वांच्या आकांक्षा पुऱ्या करो !

(हिंदुस्थानचा भविष्यकाल पानें २८५ ते ३०४)

(आतांप'त दिलेले उतारे Complete works of Swami Vivekananda Vol. 3–4–5–8; Edition III यांमधून प्रसंगीं संक्षिप्त करून घेतलेले आहेत. ज्या ठिकाणीं खंडाचा उल्लेख नाहीं तेथें खंड तिसरा आहे असें समजावें. आठव्या खंडाची आवृत्ति पहिली आहे. बाकीच्या ठिकाणीं तिसऱ्या आवृत्तीचा उपयोग केलेला आहे.)

ॐ

# हिंदुराष्ट्र-विवेचन

*

*

## वंदना के इन स्वरों में
## एक स्वर मेरा मिला लो

स्वामी विवेकानंद यांचे हिंदुत्वासंबंधींचे विचार वाचकांनीं आतां वाचलेले आहेत. त्या थोर पुरुषानें जें जें प्रतिपादन केलें, जें जीवन प्रत्यक्ष जगून दाखविलें त्याचा अंशमात्र या उताऱ्यांतून प्रसंगीं सांपडेल, अथवा तितकाहि सांपडणार नाहीं. पाण्याच्या एखाद्या बिंदूवरून सिंधूची कल्पना करावयास सांगण्यासारखाच कांहींसा प्रकार येथें घडलेला आहे. त्यामुळें या लहान लहान उताऱ्यांचें वाचन वाचकाला कदाचित् असमाधान देईल आणि स्वामीजींचे ग्रंथ मुळांतूनच वाचले पाहिजेत अशी इच्छा उत्पन्न करील. तसें झालें तर उत्तमच. कारण संध्येच्या पळीनें आचमनें करीत बसण्यापेक्षां अमृताचा कुंभच तोंडाला लावलेला केव्हांहि चांगलाच !

## ' Hindu Nation ' हा स्पष्ट प्रयोग

या लहानशा चरित्रामध्यें अधून-मधून येणारा 'हिंदुराष्ट्र' हा शब्द कांहीं वाचकांना खटकेल. ते म्हणतील कीं, लेखकानें स्वतःचेच विचार श्रीविवेकानंद यांचे माथीं मारलेले असावेत. तथापि तसें नाहीं. मराठीमध्यें १९१२-सालीं मुंबईच्या कर्नाटक मुद्रणालयानें स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ प्रकाशित करण्यास प्रारंभ केला. त्याच्या पहिल्या नि नंतरच्या खंडांतहि 'हिंदुराष्ट्र' हाच शब्दप्रयोग करण्यांत आलेला आहे. बंगालीमध्यें स्वामीजींचें चरित्र श्री. सत्येंद्रनाथ मुजुमदार यांनीं लिहिलें आहे. त्याचें अविकृत हिंदी भाषांतर श्रीरामकृष्ण आश्रमाच्या नागपूर शाखेनें प्रसिद्ध केलेलें आहे. या भाषांतरांत ३४० व्या पानावर १५ व्या ओळीमध्यें 'हिंदुराष्ट्र' असा शब्दप्रयोग स्पष्टपणें केलेला आढळतो. स्वामीजींच्या मागें भगिनी निवेदिता यांनीं हिंदुधर्म, हिंदुसमाज यांच्यासंबंधीं अनेक लेख लिहिले. त्यांत हिंदुधर्म हाच राष्ट्रधर्म, हिंदुसमाज हेंच राष्ट्र या अर्थाचें प्रतिपादन केलेलें आहे. भगिनी निवेदिता यांच्या निवडक लेखांचें कै. साने गुरुजी यांनीं १९४०-सालीं मराठी रूपांतर केलें. त्यांनासुद्धां या रूपांतराला 'राष्ट्रीय हिंदुधर्म' याविना दुसरें नांव देतां आलें. नाहीं. स्वामीजींच्या भाषणांतून Hindu Nation असा शब्दप्रयोग स्पष्टपणें झालेला आहे. 'Sages of India.' या विषयावर त्यांनीं मद्रासमध्यें व्याख्यान दिलें. त्यांत ते म्हणतात—

The Sages of India have been almost innumerable,- for, what has the HINDU NATION been doing for thou sands of years except producing sages? (Complete works of Swami Vivekananda, Vol. III Third edition, page 248.)

न्यूयॉर्कमध्यें 'माझें सद्गुरु' या विषयावर व्याख्यान देतांना स्वामीजी म्हणाले :—

The HINDUS are perhaps the most exclusive NATION in the world. They have the same great steadiness as the English, but much more amplified.

(Vol. IV pp. 157, Edi. III)

स्वामीजींनीं थिऑसॉफीसंबंधीं एक लहान लेख लिहिला होता. त्यांत ते म्हणतात :—

We cannot attribute a knowledge of all this to the writer of the articles in the ' Advocate, ' but he must not

confound himself and his Theosophists, with the great HINDU NATION, the majority of whom have clearly seen through the Theosophical phenomena from the start.

( Vol. IV pp. 264, Edi. III )

खेत्रीच्या महाराजांनीं १८९५-मध्यें पाठविलेल्या मानपत्राला उत्तर लिहितांना स्वामीजी लिहितात:––

It is said that so much looking back to the past is the cause of all India's woes. To me, on the contrary, it seems that the opposite is true. So long as they forgot the past, the HINDU NATION remained in state of stupor; and as soon as they have begun to look into their past, there is on every side a fresh manifestation of life.

( Vol. IV pp. 270, Edi. III )

मद्रास शहरानें पाठविलेल्या मानपत्राला अमेरिकेंतून उत्तर लिहितांना स्वामीजी लिहितात :––

Young men of Bengal, to you I especially appeal. Brethren, we know to our shame, that most of the real evils for which the foreign races abuse the HINDU NATION, are only owing to us.

( Vol. IV pp. 296, Edi. III )

१८९९-मध्यें अमेरिकेस दुसऱ्यांदा जात असतांना पूर्व आणि पश्चिम या शीर्षकाखालीं लिहिलेल्या लेखांत स्वामीजी लिहितात :––

Now you understand clearly where the soul of this ogress is ! It is in religion. Because no one was able to destroy that, therefore the HINDU NATION is still living.

( Vol. V pp. 362, Edi. III )

अन्यत्रहि असेच उद्गार आढळतात. स्वामीजींच्या लेखनाचा वरवर अभ्यास करणाऱ्यासहि हें पटेल कीं, स्वामीजींनीं इंग्रजी भाषेच्या मोडणीप्रमाणें केलेल्या Indian Nation या शब्दाचें अर्थदृष्टीनें सहजस्फुरित नि सुयोग्य भाषांतर 'हिंदुराष्ट्र' याच प्रतिशब्दानें होऊं शकेल.

२

पण हिंदुराष्ट्र म्हणजे काय? हिंदुधर्माचें राष्ट्र ते हिंदुराष्ट्र, असाच त्याचा अर्थ कीं अन्य कांहीं ? आणि हिंदुधर्म म्हणजे तरी काय ? असे प्रश्न आज अनेकांच्या मनांत उभे राहातात. स्वामी विवेकानंद यांनीं या प्रश्नांना फारच समर्पक अशीं उत्तरें दिलीं आहेत. त्यांच्या वेळीं हिंदुराष्ट्र हा विचार चर्चेचा, संशयाचा अथवा कलहाचा नव्हता. म्हणून त्यांचे या प्रश्नांवर असलेले विचार अमुक एकाच ठिकाणीं असे न सांपडतां त्यांच्या सर्व ग्रंथांत विखुरलेले आढळतात.

गेलीं सहस्रों वर्षें हिंदुस्थानांत एक समाज नांदत आहे. त्यानें निर्माण केलेली संस्कृति, वेद-उपनिषदें यांतील तत्त्वज्ञान, श्रीराम-श्रीकृष्ण यांसारखे मानवाचे आदर्श या गोष्टी अद्वितीय आहेत. आरंभीं या समाजाला आर्य म्हटलें जात असे, म्हणून राष्ट्राचें नांव आर्यावर्त असें होतें. कालांतरानें भरत राजाचें राष्ट्र तें 'भारत,' अशा नांवानें तें संबोधिलें जाऊं लागलें. पण या दोन्ही नांवांबरोबरच सिंधु नदीच्या दोन्ही कांठांवर दूरपर्यंत पसरलेले ते सप्तसिंधु लोक, अथवा सप्तहिंदु लोक अथवा नुसतेच हिंदु लोक, असेंहि नांव या समाजास पडलें; आणि हिंदुसमाजाचें घर तें हिंदुस्थान असें नांव राष्ट्राला पडलें.

या आर्य अथवा सप्तसिंधु लोकांनीं सृष्टीचा शोध केला. तपोधन अशा ऋषींनीं, 'ज्या वेळीं असत्‌हि नव्हतें, सत्‌हि नव्हतें त्या वेळीं काय होतें बरें ?' अशा स्वरूपाचा आदिकारणाचा शोध अत्यंत धैर्यपूर्वक नि गंभीरपणें केला. जीव, जगत् आणि आदिकारण यांच्या शोधाच्या आत्यंतिक तीव्रतेंत त्यांना तत्-संबंधीं विचार ऐकूं आले. हे विचार आपले स्वतःचे नव्हेत हें त्यांना समजले; ते आसमंतांतून श्रवणीं पडले हेंहि त्यांनीं अनुभविलें; म्हणून त्या संकलित विचारांना त्यांनीं श्रुति (= ऐकलेलें)अथवा वेद (=जाणलेलें) असें नांव दिलें. सृष्टिरहस्य जाणीत असतांना व्यक्तीचें ध्येय काय, तें ध्येय पूर्ण होण्याच्या दृष्टिनें समाज-बंधनाची आवश्यकता काय, हेंहि विचार त्यांच्या मनांत आले. सृष्टि-रहस्याच्या प्रकाशांत व्यक्ति आणि समाज यांबद्दलचे नीतिनियम त्या मंत्रद्रष्टया ऋषींनीं प्रत्यक्ष पाहिले. या सृष्टि-

रहस्यानुसार व्यक्ति नि समाज यांना एकत्र बांधणारे, एका ध्येयास नेणारे जे नीतिनियम त्यांना त्यांनीं 'धर्म' ही संज्ञा दिली. धर्माची त्यांनीं व्याख्या केली—

धारणाद्धर्मए इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः ।
यत् स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥

(महाभारत, शान्ति १०९–१२ )

(धर्म हा शब्द 'धृ' म्हणजे धारण करणें, या धातूपासून निघाला असून धर्मानेंच प्रजा बद्ध झालेली आहे. ज्यानें (सर्व प्रजेचें) धारण होतें तोच धर्म हा निश्चय होय.)

या धर्मालाच आर्यधर्म, हिंदुधर्म अशीं नांवें पडलीं. या धर्मविचारांत शाश्वत अशा निष्ठेवर व्यक्तिजीवन नि समाजजीवन यांची रचना करण्यांत आली. या शाश्वत आधारानंतर त्या त्या युगाला अथवा काळाला अनुरूप असे आचार, विधि आणि समाजसंस्था अस्तित्वांत याव्यात असें म्हटलें गेलें. त्या अनुसार प्रत्येक बदलल्या काळात त्या त्या काळाला अनुरूप असे स्मृतिग्रंथ अस्तित्वांत आले. व्यक्तीला ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन आकांक्षा असतात. ऐहिकतेमध्यें कुटुंबजीवन सुखी व्हावें, स्वाभिमानयुक्त असावें, ऐहिक संपत्तीनें भरलेलें असावें अशी इच्छा असते; तर पारमार्थिक आयुष्यांत मृत्यूनंतरचें आयुष्य काय आहे तें कळावें, सद्गति लाभावी विश्वशक्तीशीं एकरूप पावावे अशासारख्या आकांक्षा असतात. याच दोन प्रकारच्या आकांक्षांना अनुक्रमें अभ्युदय आणि निःश्रेयस असें म्हणतात. व्यक्तीच्या या आकांक्षा तिला एकाकीं राहून पुऱ्या करिता येत नाहींत. त्यासाठीं तिला समाजाचा आश्रय करावा लागतो. त्यामुळें एकूण समाजाचा परिपोष ज्यामुळें होईल त्या रीतीनें स्वतःच्या आकांक्षा साधाव्यात असें बंधन व्यक्तीवर येऊन पडतें. येणेंप्रमाणें विचार केला असतां, समाजाच्या आश्रयानें राहाणाऱ्या या व्यक्तीच्या वरील दोन्ही आकांक्षा ज्यांत फलद्रूप तो धर्म, अशीहि धर्माची व्याख्या होऊं लागली.

'यतः अभ्युदयनिःश्रेयससिद्धिः सः धर्मः।–कणादसूत्र

(ज्यानें अभ्युदय आणि निःश्रेयस साधतात, तो धर्म.)

या दोन्ही व्याख्या वस्तुतः एकच आहेत. पहिलीमध्यें समाजधारणा

व्हावी असें म्हटलें, दुसरीमध्ये समाज-धारणा म्हणजे ज्यात अभ्युदय आणि निःश्रेयस साधतें ती स्थिति, असे सांगण्यात आलें. या व्याख्येप्रमाणें धर्म-कल्पनेंत व्यक्तीचे आणि समाजाचे एकूण-एक व्यवहार सामावले गेले.

त्यामुळें मनुष्यप्राण्यानें जन्माला आल्यापासून मृत्युपर्यंत सर्व गोष्टी धर्मानुकूल म्हणजेच समाजधारणेला अनुकूल कराव्यात असें ठरविण्यांत आलें. षोडश संस्कारांची कल्पना आचरणांत आली. लग्न हा सुद्धां समाज-हितार्थ केलेला सस्कार मानण्यांत आला. संतानोत्पत्ति हें समाजकर्तव्य ठरविण्यांत आलें. याविना दैनंदिन आचार, वर्णव्यवस्था, आश्रमधर्म, राज-धर्म इत्यादि व्यवस्था व्यक्तीच्या नि समाजाच्या अभ्युदयार्थ योजण्यांत आल्या. निःश्रेयसासाठीं प्रत्येक व्यक्तीनें कोणतेंहि उपास्य दैवत निवडावें, कोणतेंहि साधन योजावें, त्या बाबतींत तिला पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें. प्रतीक पूजेपासून अद्वैतापर्यंत सर्वचे सर्व धर्मपंथ हे ब्रह्मप्राप्तीच्या ध्येयास नेणारे मार्ग आहेत. एखादा लांबचा असेल तर दुसरा जवळचा असेल, पण प्रत्येक धर्मपंथ सत्यच आहे. आजच्या जन्मीचा नास्तिकसुद्धां कालां-तरानें ब्रह्माप्रत जाऊन पोहोंचणार, असें या धर्मानें ठरविलें. किंबहुना परमेश्वरार्पण बुद्धीनें समाजधारणेला अनुकूल असा आयुष्यक्रम आंखणें हेंच निःश्रेयसासाठीं पुरेसें साधन आहे असेंहि मत प्रचलित झालें. एवढें स्वातंत्र्य निःश्रेयसाबद्दल ठेविलें, तरी सृष्टीमध्ये जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं एकच आत्मतत्त्व भरलेलें आहे, आत्मा आणि परमात्मा एकच आहे, त्या आत्म्याचें प्रकटीकरण करावें; भौतिक सुखें हीं क्षणभंगुर, अनित्य आहेत, आत्मसुख हें मात्र चिरंतन, नित्य असल्यानें भौतिक सुखलालसेपासून निवृत्त होऊन माणसानें आत्मसुखाकडे वळावें, असें या हिंदुधर्माचें कळकळीचें सांगणें आहे. यम-नियमांनीं अंन्तःसृष्टीवर विजय मिळवावा हें हिंदुधर्माचें अथवा हिंदुसंस्कृतीचें प्रधान लक्षण आहे. या आत्मतत्त्वाचा आविष्कार अधिकाधिक करीत व्यक्तीनें नि समाजानें उन्नत होत स्वतःमधील देवत्व पूर्णपणें प्रकट करावें, हें ध्येय या पुरातन समाजानें स्वतःसाठीं नियुक्त केलें. या ध्ययानुरूप व्यक्तीसाठीं व्यक्तिधर्म, समाजासाठीं समाजधर्म यांची योजना करण्यांत आली. मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं पाहिलेला धर्म आणि त्यावर रचली गलेली समाजरचना यांची गुंफण कालांतरानें इतकी एकरूप होऊन गेली कीं पहिलें

काय आणि दुसरें काय हें जाणणेंसुद्धां शक्य राहिलेलें नाहीं. या रचनेंतून समाज उत्कर्षाला जाऊं लागला. तेथें कला उदयाला आल्या, काव्याचा गुंजारव ऐकूं येऊं लागला, शास्त्रें प्रकाशूं लागलीं, शौर्य-धैर्यादि पौरुषाचे गुण उंचावूं लागले, सत्यप्रीति सामान्य व्यक्तीपर्यंत पोहोंचली, राजवैभवांत वावरणारा जनक राजा आणि लंगोटी लावून फिरणारा शुकदेव यांच्या अंत:करणांत एकच समाधान–सच्चिदानंद–विलसूं लागलें, हिंदुधर्माचें सत्यत्व संपूर्णपणें प्रकट झालें. अन् अशा प्रकारें अभ्युदय आणि नि:श्रेयस या एकाच ध्येयाच्या दोन अंगांनीं हें राष्ट्र विकसित झालें.

## ३

अशा रीतीनें विकसित होत असतां अनेकसहस्र वर्षांचा काल गेला' या धर्मबंधनांतील रहस्य लोक विसरले. त्यांतील समतोलपणा गेला. त्यामुळें अभ्युदयाऐवजीं अवनतीला सुरुवात झाली. समाजांतील एक-जीवपणा विसरला गेला; तेथें व्यक्तीची, राज्याची, राजाची प्रतिष्ठा वाढली; आणि विस्तृत अशा भरतभूमीमध्यें लहान लहान राज्यांचीं डबकीं निर्माण झालीं. त्यांतच परकीय स्वाऱ्या आल्या. पारतंत्र्य आलें. गेलीं सहस्र वर्षें या पारतंत्र्याशीं हा समाज झगडत आला आहे. या झगड्यांत आत्म-विस्मृति होण्याचेंहि प्रसंग आले, समाजोपयोगी सद्‌गुण कमी झाले, दारिद्र्य आलें, असें होतां होतां आजची स्थिति प्राप्त झाली. आतां आज जो प्रश्न आहे तो असा कीं, या विशाल आणि पुरातन समाजाचें दैन्य व अज्ञान दूर करून त्याला पुनरपि उन्नत कसें करावें? या तीस कोटि मानवसमूहाला सुखी कसें करावें? जगांतील यच्चयावत् मानवाला जसा सुखी होण्याचा, वैभवशाली होण्याचा, नवविचारधारा निर्माण करण्याचा अधिकार आहे, तितकाच अधिकार हिंदुसमाज या अभिमानानें युक्त असलेल्या चाळीस कोटि मानवांनाहि आहेच. म्हणजे हिंदुसमाजास उन्नत करण्याचा हा प्रश्न एका धर्मानें दुसऱ्या धर्मावर कुरघोडी करण्याचा, अथवा Theocratic, पथा-धिष्ठित, संकुचित, जातीय स्वरूपाचा नसून हा प्रश्न समाज-उत्थानाचा, मानवविकासाचा अतएव मानव्याचा असा आहे.

अशा या हिंदुसमाजाची उन्नति त्याला पूर्वपरंपरा विसरण्यास लाविल्यानें होईल का? क्षणाक्षणाच्या व्यवहारांत, उठण्या-बसण्यांत, राजकाजांत

धर्माला जें स्थान दिलेलें आहे तें नष्ट केल्यानें होईल का ? दुसऱ्या कोणत्या तरी मानवसमाजाबरोबर एकी करण्यासाठीं स्वतःचें नांवहि विसरण्यास उद्युक्त केल्यानें होईल का ? स्वामी विवेकानंद यांचें याला स्पष्ट उत्तर असें आहे कीं, 'हें शक्य नाहीं. असल्या गोष्टीमुळें उन्नति होणें दूरच राहिलें; पण या विस्मृतिमुळें समाजाचा संपूर्ण नाश मात्र झाल्याविना राहणार नाहीं.'

हिंदुसमाजाचा विकास हिंदु म्हणून-म्हणवून घेतल्यानें, पूर्वपरंपरा सांभाळल्यानें, किंबहुना पूर्वपरंपरा शुद्ध करून त्यांतून नवविचार निर्माण केल्यानें होणार असेल, तर आज हिंदु कोणास म्हणावें, हिंदुसमाज म्हटला म्हणजे नेमके कोणकोणते लोक त्यांत येतात, या प्रश्नांना निश्चित उत्तर देण्याची आवश्यकता उत्पन्न होते. 'हिंदु' याची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेकांनीं केलेला आहे. 'जो हिंसा करीत नाहीं तो हिंदु, अशी व्याख्या गत आठ-दहा वर्षींतील अहिंसाव्रळाच्या दिवसांत झाली असल्याचें आढळलेलें आहे. जो स्वतःला हिंदु म्हणवून घेतो तो हिंदु, अशीहि दुसरी व्याख्या आहे. या व्याख्या समर्पक नाहींत हें निराळें सांगावयास नको.

तिसरी उपलब्ध व्याख्या खालीलप्रमाणें आहे--

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानाम् अनेकता ।**
**उपास्यानाम् अनियमः एतद् धर्मस्य लक्षणम् ॥**

'उपासना कोणाचीहि कोणत्याहि साधनानें केली तरी वेद हेच अंतिम प्रमाण असणें हें धर्माचें लक्षण आहे.' ही व्याख्या कै. लोकमान्य टिळक यांनीं केलेली आहे. ही व्याख्या अर्थातच सनातन धर्माची आहे. ती मान्य करणारा तो हिंदु असें म्हटलें तर वेदप्रामाण्य मान्य न करणाऱ्या बौद्ध-जैनादि व्यक्तींचा अंतर्भाव असण्याच्या दृष्टीनें ती कशी अपुरी पडते, तें स्वातंत्र्यवीर वंदनीय सावरकर यांनीं 'हिंदुत्व' या प्रबंधांत लोकमान्यांचें ऋण मान्य करून उत्तम रीतीनें दर्शविलेलें आहे.

समर्पक आणि वस्तुस्थितिनिदर्शक व्याख्या व्हावी म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं १९२४-सालीं 'हिंदुत्व' हा प्रबंध लिहिला. त्यामध्यें त्यांनीं तर्कशुद्ध अशी चर्चा करून, मूलभूत गोष्टींचा विचार करून व्याख्या रचली ती अशी--

... ठाणे. ...
... १६,८३ ... दि: ...१०/४/६...

आसिन्धु सिन्धुपर्यन्ता यस्य भारतभूमिका।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिन्दुरिति स्मृतः ॥

'उत्तरेंतील सिधुनदापासून दक्षिण-सिंधु जो हिंदुमहासागर येथपर्यन्त विस्तीर्ण पसरलेली भूमि–ही भारत-भू–माझी पितृभू आहे, म्हणजे माझ्या वाडवडिलांची आहे, कीं ज्यांचें रक्त माझ्यामध्यें खेळत आहे; ही माझी पुण्यभू आहे, म्हणजेच येथें माझी संस्कृति वाढली, कीं जिच्या स्फूर्तीनें माझें जीवन चालतें, असें जो जो म्हणतो तो तो हिन्दु.'

ही व्याख्या ज्या प्रबंधांत आलेली आहे तो 'हिंदुत्व' हा ग्रंथ परिपूर्ण आहे. त्यांतील विश्लेषण, त्यांतील तर्कशुद्धता, त्यांतील मार्मिकता, प्रश्नाचें साकल्यानें केलेलें विवेचन, त्यांतील भावनोत्कटता, हिंदुत्वाबद्दलचें अपरंपार प्रेम, भाषेची गोडी, प्रतिपादनांतील ओज या अनेकविध गुणांनीं हा प्रबंध अद्वितीय झालेला आहे. गेल्या तीस वर्षांतील हिंदुसमाजसंघटनेच्या सर्व चळवळींचें उगमस्थान याच प्रबंधांत आहे. दुर्दैव असें कीं या प्रबंधाचा साऱ्या देशभर अभ्यास व्हावयास हवा होता तो झाला नाहीं. हिंदुत्वाच्या चळवळी करणाऱ्या लोकांनींहि या प्रबंधाचा सखोल अभ्यास केला नाहीं. वर उद्धृत केलेली व्याख्या ते वरवर मान्य करीत गेले; पण त्या व्याख्येमागील मार्मिकता-समर्पकता कित्येकांच्या ध्यानांत येऊं शकली नाहीं.

या व्याख्येमुळें वेद हे प्रमाण असण्याची आवश्यकता उरली नाहीं. ही विस्तीर्ण भूमि माझ्या वाडवडिलांची आहे, मला जीवन देणारी संस्कृति येथेंच वाढली, माझें राष्ट्र येथेंच भरभराटलें असें प्रेमानें जो जो म्हणेल तो तो हिंदु असा व्यापक विचार यांत झाला. या व्यापक मांडणीमुळें बौद्ध, जैन हिंदु नाहींत असा आक्षेप पहिल्या व्याख्येनें येत होता, तो दूर झाला. स्वतःला हिंदु म्हणवून न घेणारे आर्यसमाजीहि हिंदुच ठरले. शीख, लिंगायत हेहि हिंदुत्वांतच सामावले.

या व्याख्येनें अत्यंत मोठें कार्य केलें असलें तरी तीवर अधिक संशोधन होणें अवश्य आहे. वीस वीस वर्षें हिंदुत्वाचा विचार करणारे हिंदुत्वाभिमानी, 'आतां पाकिस्तान झालें, आतां हिंदु हिंदु काय घेऊन बसलांत; आतां जे आपण शिल्लक आहोंत ते सगळे हिंदूच आहोंत, त्रास देणारे मुसलमान निघून गेले, राहिलेले आपण घटनेनें भारतीय झालों आहोंत,

आतां स्वतंत्र मतदार संघ नाहींत, हिंदु अथवा मुसलमान कोणालाच निराळे अधिकार मिळावयाचे नाहींत, म्हणून हिंदुपुरतें कार्य करणारे पक्ष काढणें चूक आहे; अशांत हिंदुराष्ट्र-हिंदुराष्ट्र अशा जातीय घोषणा म्हणत बसण्याचें कारण नाहीं, आतां उरलेले आपण सर्व एक म्हणजे भारतीय' असें जेव्हां म्हणूं लागतात तेव्हां मनामध्यें आश्चर्य, दुःख आणि शोक अशा विविध भावना उभ्या राहतात. जणुं काय हिंदुराष्ट्र ही कल्पना केवळ स्वतंत्र मतदारसंघ अथवा चार अधिकार अथवा राजकीय पक्ष असल्या तात्कालिक राजकीय कल्पनांपुरतीच मर्यादित आहे ! जणूं काय तुम्ही आम्ही एक म्हटलें कीं आम्ही एक झालोंच ! एवढ्या एकीविना अन्य ध्येय यथें जणूं उरलेलेंच नाहीं !

हें असें कां होतें ? अनेक कारणांपैकीं एक कारण असें दिसतें कीं, प्रादेशिक राष्ट्रवादाच्या कल्पना आमच्या डोक्यामध्यें फार खिळून बसलेल्या आहेत; आणि त्यामुळें हिंदुराष्ट्राचा मूलभूत अर्थ आम्हांला प्रतीतच होत नसावा. असें पुनः पुनः होऊं नये एवढ्यासाठीं प्रादेशिक राष्ट्रवाद मुळांतच खुडून काढला पाहिजे. आणि हिंदुत्वाचा व्यापक विचार मनांत ठसविला पाहिजे.

वंदनीय सावरकरजी यांच्या हिंदुत्वावरील या महाभाष्यांत प्रादेशिक राष्ट्रवादाला जागा कोठेंच नाहीं. तथापि त्यांनीं केलेल्या या अनुष्टुप्श्लोक-बद्ध सुंदर व्याख्येंत मात्र अहेतुकपणें प्रादेशिक-राष्ट्र-वादी भूमिका शिरलेली आहे. व्याख्येंत प्रथम भारताच्या भौगोलिक मर्यादा दिग्दर्शित करून नंतर ही भूमि पितृभू आहे, पुण्यभू आहे हें सांगितलें. म्हणजे व्याख्येंत सर्वत्र भूमि-संबंधींच विवेचन झालें. या भूमीला दिव्यत्व आणून देणारे जे लोक, जो समाज, त्याला व्याख्येच्या शब्दयोजनेंत प्राधान्य नाहीं. त्याचा नुसता उल्लेखहि यांत झालेला नाहीं. भूमि आणि समाज यांमध्यें प्राधान्य समाजाला आहे, भूमीला नाहीं; समाजासाठीं भूमीला महत्त्व आहे, भूमीमुळें समाज महत्त्वाचा ठरत नाहीं. हिंदुसमाजानें येथें थोर संस्कृति निर्माण केली म्हणून ही भूपुण्यभू झाली. याविरुद्ध या भूमींत ख्रिश्चन राहतात, यहुदी राहतात, मुसलमान राहतात. या भूमींत ते राहतात म्हणून ते समाज मोठे अथवा महत्त्वपूर्ण नाहींत हें उघड आहे.

या व्याख्येंत दुसरी एक संदिग्धता त्याच अहेतुक प्रादेशिकतेमुळें उत्पन्न झाली आहे. या व्याख्येची फोड करतांना सावरकरजी म्हणतात, ' बोहेरी लोक तसेच मुसलमानी किंवा ख्रिश्चन लोक त्यांच्याजवळ 'हिंदुत्वाचीं इतर सर्व लक्षणें आहेत. परंतु एक लक्षण मात्र नाहीं व तें लक्षण म्हणजे हें कीं, ते "हिंदुस्थान"ला "पुण्यभू" म्हणून मानीत नाहींत.' ( हिंदुत्व, द्वितीयावृत्ति पान १०१ ) मुळांत 'आसिंधु सिंधुपर्यंता ' भूमीला पितृभू मानणें; एक रक्ताचे, एक वंशाचे असणें, हीं कांहीं हिंदुत्वाचीं प्रमुख लक्षणें होऊं शकत नाहींत. तथापि तीं होतात असें म्हटलें, आणि उद्यां जर मुसलमान लोक याच विस्तृत भूमीला पुण्यभू म्हणूं लागले, तर मग काय त्यांना हिंदु समजावयाचें ? युरोपांतील राष्ट्रांनी धर्माबाबतींत आपआपल्या प्रजाजनांत असलेली पोपबद्दलची भक्ति उखडून काढली. फ्रेंच समाज हाच माझ्या भक्तीचें पहिलें आणि शेवटचें स्थान, फ्रान्स हीच माझी पितृभू आणि पुण्यभू अशी वृत्ति फ्रेंचांत उत्पन्न झाली. तीच इंग्लंडमध्यें त्याआधीं उत्पन्न झाली. आणि कमी अधिक प्रमाणात इतर राष्ट्रांत तदनंतर निर्माण झाली. उद्यां पाकिस्तानांतील मुसलमानांमध्यें पाकसंबंधींची राष्ट्रीय वृत्ति बळावूं लागल्यावर, धर्मक्षेत्रांच्या बाबतींत असलेली Extra-territorial affinity म्हणजेच बाह्यभूमिनिष्ठा नाहींशी होऊन, अरबस्थानाशीं मला कर्तव्य नाहीं, तुर्कस्थानचा खलिफा माझा कोणी नव्हे, आसिंधुसिंधुपर्यंता भूमी हीच माझी पितृभू, ताजमहाल हीच माझी मक्का, औरंगजेबाची कबर हीच माझी मदिना, अजमीरचा पीर हेंच माझें पुण्यक्षेत्र, याच भूमींत मुसलमीन संस्कृति आम्हीं निर्माण केली, ' इत्यादि वृत्ति निर्माण होण्याची शक्यता फारच जवळ आहे. तसें झालें म्हणजे त्यांना हिंदु कां समजावयाचें ? पण अहेतुकपणें का होईना प्रादेशिकतेवर–भूमिनिष्ठेवर आधारल्या गेलेल्या व्याख्येनें तशी आपत्ति येते. आणि याच प्रादेशिक राष्ट्रवादामुळें हिंदुत्व या प्रबंधाचा खोलवर अभ्यास न करणाऱ्यांच्या मनांत हिंदुराष्ट्र हा जातीय विचार आहे असल्या कल्पना येऊं शकतात.

हिंदु आणि मुसलमान या प्रश्नाचें स्वरूप स्पष्टपणें ध्यानांत घेतलें पाहिजे. हा प्रश्न केवळ पूजापद्धतीसंबंधींचा आहे, हा प्रश्न केवळ धार्मिक समतेचा आहे, हा प्रश्न आर्थिक आहे, इत्यादि व्यर्थ, निरर्थक घोषणा दूर ठेवून रोखठोकपणें या प्रश्नाचें स्वरूप ध्यानांत घेतलें पाहिजे. गेलीं ८००

ते ११०० वर्षें मुसलमान या देशांत आहेत. पण येथें त्यांनीं केवळ राज्य केलें नाहीं. मुसलमान समाज वाढवावा, हिंदु लोक बाटवून त्यांना मुसलमान करावें, हिंदुत्व नष्ट करावें, आणि हिंदु समाजाच्या भूमीमध्यें मुसलमान राष्ट्र निर्माण करावें हाच त्यांचा प्रयत्न अव्याहतपणें गेलीं ८०० ते ११०० वर्षें चालू आहे. पाकिस्तानसारख्या स्वतंत्र मुसलमानी राष्ट्राची हिंदुस्थानच्या–हिंदुसमाजाच्या भूमीवर निर्मिति होणें हा त्याच १०००वर्षांच्या युद्धांतील एक प्रसंग आहे. इंग्रज येथें आले, त्यांनीं हिंदुसमाजाला कांहीं काळ केवळ परतंत्र केलें. हिंदु समाजानें इंग्रजांना हांकलून लावलें. ते गेलेहि. पण त्यांनीं या देशांत इंग्लिश राष्ट्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाहीं. मुसलमानी आक्रमण हें हिंदुसमाजाला परतंत्र करीत स्वतंत्र राष्ट्र निर्माण करणारे होतें. मुसलमान समाजाची उन्नति ती हिंदुसमाजाची अवनति, हिंदुसमाजाची उन्नति ती मुसलमान समाजाची अवनति, एकाचें खाद्य तें दुसऱ्याचें विष या स्वरूपांत हें युद्ध गेलीं सहस्र वर्षें चालत आलेलें आहे. आणि सध्यां तरी या युद्धामध्यें हिंदुसमाज गांधार, निम्मा पंजाब, सिंध आणि निम्मा बंगाल इतकी भूमि गमावून बसला आहे. यापेक्षां पुष्कळच भूमि हिंदुसमाजाच्या हातून गेलेली होती. पण हिंदुसमाजानें भीम पराक्रम करून ही भूमि त्यांचेपासून परत जिंकून घेतली. अशा स्थितींत हिंदुस्थानच्या भूमींत जें मुसलमानी राष्ट्र तूर्त स्थापन झालेलें आहे, त्यांतले मुसलमान इतर मुसलमानी राष्ट्रांपासून स्वतःचें वेगळें राष्ट्रीयत्व प्रस्थापित करतील, ते अफगणिस्थानशी लढतील, ईजिप्तशींहि लढतील, हीच भूमि माझी पितृभू, पुण्यभू म्हणून प्रेमभरानें म्हणतील. तिच्यासाठीं रक्तहि सांडतील. म्हणजे भूमिनिष्ठा एवढ्याच दृष्टिकोनांतून पहावयाचें झालें तर त्यांच्यांत कोणतेंच न्यून आढळणार नाहीं. पण या भूमिनिष्ठेच्या आधीं ते मुसलमानी-समाजनिष्ठ आहेत ही गोष्ट सदैव ध्यांनात ठेविली पाहिजे. आणि त्याचमुळें त्यांना हिंदु कधींहि म्हणतां येणार नाहीं.

वंदनीय सावरकरजी यांच्या विवेचनांत प्रादेशिक राष्ट्रवादाला कोठेंहि जागा नाहीं हें वर म्हटलेंच आहे. 'हिंदुत्व' या ग्रंथांतील 'आसिन्धु सिन्धु-पर्यन्ता' इत्यादि व्याख्येपूर्वींचीं नि नंतरची पांच–सहा पानें (द्वितीयावृत्ति पानें १२१ ते १२५) वाचलीं तर हिंदु या शब्दाचा अर्थ नव्यानें

करण्याचें कारणच राहत नाहीं. पुण्यभू या शब्दानें हिंदुसंस्कृतीशीं अव्यभिचारित्वानें एकरूप होणें एवढाच अर्थ त्यांना व्यक्त करावयाचा आहे. पण पुण्यभू शब्दांतून हा अर्थ निःसंदिग्धपणें निघत नाहीं. "आसिन्धु सिन्धूपर्यन्ता" ही व्याख्याच केवळ पाहिली तर त्या व्याख्येंतून भूमिनिष्ठेविरहित अन्य कोणतीहि निष्ठा ध्यानांत येऊं शकत नाहीं. एवढ्यासाठीं त्यांनीं व्यक्त केलेला अर्थच, ज्यांत प्रादेशिक राष्ट्रवाद आडूनहि डोकावूं शकणार नाहीं, अशा रीतीनें प्रकट करतां आल्यास पाहावें याची आवश्यकता वाटूं लागते.

४

तेव्हां भूमिनिष्ठा ही कांहीं हिंदुत्वाचें गमक होऊं शकणार नाहीं. हिंदुत्वाची व्याख्या समाजतादात्म्यावर उभारली पाहिजे. थोडक्यांत म्हणजे हिंदुत्वाची व्याख्या वेदप्रामाण्यावर असूं शकणार नाहीं, विशिष्ट उपासनेवर नाहीं, अथवा साधनपद्धतीवर नाहीं. ती समाजनिष्ठेवर आधारलेली असली पाहिजे.

मग हिंदुत्वाची समर्पक व्याख्या कोणती? हिंदुपणाचें अचूक लक्षण कोणतें? तर–

स हिन्दुः वेदसंभूता रामकृष्णादिवर्धिता ।
आत्मा परम्परा यस्य तं जनं यः प्रमाणयेत् ।।१।।

वेदामध्यें मूळ असलेली, व्यास, वाल्मीकि, मनु, महावीर, बुद्ध, शंकराचार्य, रामानुज, चैतन्य, बसव, तुलसीदास, कबीर आदि संतांनीं आणि प्रभु रामचंद्रापासून शिवछत्रपति-आदि कालपर्यंत झालेल्या महापुरुषांनीं जिचें संवर्धन केलें, अशी परंपरा ज्या समाजाचा आत्मा आहे, तो समाज अथवा ते लोकच जो प्रमाण मानतो तो हिंदु.

लोक अथवा समाज प्रमाण मानणें याचा अर्थ काय? वेद म्हणतील तें शिरसावंद्य करणें आणि त्याच्या अनुरोधानें जीवनयात्रा पूर्ण करणें हा जसा वेदप्रामाण्याचा अर्थ आहे तसाच समाजाला प्रमाण मानणें याचा अर्थ आहे. त्याची फोड पुढीलप्रमाणें होऊं शकेल–

तस्योत्कर्षे स्व उत्कर्षः गौरवे गौरवं तथा।
व्यत्यये व्यत्ययश्चेति धीः प्रामाण्यमुदाहृतम् ॥ २॥

या समाजाच्या उत्कर्षांत माझा उत्कर्ष, त्याच्या गौरवांत माझा गौरव, याच्याविरुद्ध 'व्यत्यये व्यत्ययः' म्हणजे त्याच्या अवनतींत माझी अवनीति, त्याच्या अपमानांत माझा अपमान, हें तत्त्व शिरसावंद्य करून जीवनयात्रा चालविणें याचें नांव समाजप्रामाण्यबुद्धि. वर उल्लेखिलेल्या श्रीरामकृष्णादिकांच्या परंपरेनें युक्त असलेल्या समाजाबद्दल ही प्रामाण्यबुद्धि ज्याला आहे तो हिंदु, या व्याख्येनें हिंदुत्व हें विशिष्ट आचार वा विचारपद्धतीवर अवलंबून न राहतां अथवा भूमिनिष्ठेवर आधारलें न जातां समाजप्रामाण्याशीं निगडित झालें.

वेदमूला अशी परंपरा ज्या समाजाचा आत्मा आहे, त्या समाजाला प्रमाण मानणारा तो हिंदु हें झालें. पण या परंपरेचें अधिक स्पष्टीकरण काय? तर—

उपास्यानाम् अनियमः साधनानाम् अनेकता।
बाह्यसृष्टिजिगीषा च यद्यपीदं भवेत् त्रयम् ॥ ३ ॥

उपास्य दैवत कोणतेहि असावें हें पहिलें वैशिष्टय, साधन—वैपुल्य हें दुसरें वैशिष्टय आणि बाह्य दृष्टीला गोचर होणाऱ्या सृष्टीवर विजय मिळविण्याची आकांक्षा असावी हें तिसरें; या तिन्ही गोष्टी असल्या तरी—

अन्तःसृष्टिं वशीकृत्य साक्षात्कारोऽन्तरात्मनः।
प्रधानं लक्षण यस्याः ताम् आहुः हिन्दुसंस्कृतिम् ॥ ४ ॥

अन्तःसृष्टीवर विजय मिळवून अन्तरात्म्याचा साक्षात्कार करून घेणें हें जिचें मुख्य लक्षण आहे तिला हिंदु संस्कृति म्हणतात.

पहिल्या श्लोकामध्यें वेदांपासून आतांपर्यंत एक समाज अविच्छिन्नपणें चालत आलेला आहे हें गृहीत आहे. हें गृहीत डोळ्यासमोर प्रत्यक्षच असल्यामुळें कोणासहि नाकारतां येणार नाहीं. दुसरें असें कीं या समाजाच्या परंपरेला वेदसंभूता असें विशेषण लावलें, या विशेषणावरून जे अवैदिक आहेत ते या परंपरेंत येतात अथवा नाहीं अशी शंका उत्पन्न होईल.

याबद्दल असें वाटतें कीं, बौद्ध, जैन, शीख, आदि अवैदिकांना वेद-प्रामाण्य मान्य नसेल पण म्हणून बौद्ध, जैन, शीख वा लिंगायत आदि मतांच्या उगमस्थानी प्रथम वैदिक परंपरा आहे, त्या परंपरेच्या उगमस्थानीं वेद आहेत, हें ते अमान्य करूं शकत नाहींत. करीतहि नाहींत. वेदमूला अशा परंपरेंतून जैन, बौद्ध आदि प्रवाह नव्यानें उत्पन्न झाले. त्यामुळें परंपरेचा मुख्य धागा या नवप्रवाहांनींहि सोडलेला नाहीं. मनुष्यमात्राची इच्छा सुख मिळावें अशी असते. हें सुख बाह्य विषयांत नसून अथवा सुखोपभोगांच्या साधनांत नसून उपभोग घेणाऱ्यामध्यें आहे. अंतःस्थांत आहे, हाच याहि नवप्रवाहाचा संदेश आहे. ऐहिक ऐश्वर्यामागें धावण्याऐवजीं मनाचें नियमन करावें, हृदयाचा विकास करावा, तृप्ति मिळवावी, थोडक्यांत ऐहितेकडून, जडाकडून आध्यात्मिकाकडे, चैतन्याकडे वळावें हाच याहि नवप्रवाहांचा आग्रह आहे. आणि म्हणून शैव, वैष्णव, बौद्ध, जैन, शीख, द्वैती, अद्वैती अशा विविध प्रवाहांनीं युक्त असलेली ही विशाल हिंदु संस्कृति नि परंपरा बाह्यतः विभिन्न वाटली तरी मूलतः एकच आहे.

अशा रीतीनें वर दिलेल्या चार श्लोकांत मिळून हिंदुत्वाची व्याख्या परिपूर्ण झाली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. पहिल्यांत वेदमूला परंपरेनें युक्त अशा समाजाबद्दल प्रामाण्यबुद्धि असली पाहिजे म्हटलें, दुसऱ्यांत ही प्रामाण्य बुद्धि म्हणजे काय याचें विश्लेषण झालें, तिसऱ्यामध्यें ही परंपरा अथवा संस्कृति यांमधील उदार बुद्धिस्वातंत्र्य नि विजिगीषा सांगितली आणि चौथ्यामध्यें संस्कृतीचें प्रधान लक्षण मांडलें.

म्हणजे हिंदुसमाजप्रामाण्यबुद्धि हेंच हिंदुत्वाचें एकमेव लक्षण झालें. हिंदुसंस्कृतींतील सर्वच्या सर्व विचार प्रसंगीं मान्य असतील असेंहि नाहीं. पण 'साधनानाम् अनेकता,' 'उपास्यानाम् अनियमः' ही उदारबुद्धि, हें बुद्धिस्वातंत्र्य मात्र प्रत्येकानें दुसऱ्याला दिलेंच पाहिजे. प्रसंगीं एखादा चार्वाक उभा राहिला नि म्हणूं लागला कीं, 'मी आत्माच मानीत नाहीं, तर आत्माविष्कार कोठून करूं शकणार!' असा अपवादरूप चार्वाक जर हिंदु समाज प्रामाण्य मानीत असेल तर तो हिंदुच. मात्र असा भिन्न मार्ग स्वीकारणाऱ्यानें, 'माझा मार्ग तेवढाच खरा, माझ्याशिवाय बाकीचे नरकांत जातील, त्यांना उन्नत

व्हावयाचा, जगावयाचा अधिकारच नाहीं, ते काफीर आहेत, त्यांना नष्ट केलें पाहिजे, असें मनांतहि आणतां कामा नये.

प्रारंभीं हिंदुधर्माची केलेली फोड लक्ष्यांत घेतली तर येथें केलेली हिंदुपणाची व्याख्या हिंदुधर्माच्या कल्पनेशीं सुसंगत आहे, जुळती आहे, हें आढळून येईल. पारमार्थिक विचारांत स्वातंत्र्य पण आचारधर्मांत म्हणजे समाजविषयक कर्तव्यांत एकवाक्यता, हेंच हिंदुधर्माचें लक्षण सांगितलेलें आहे. आजच्या भाषेंत ज्याला हिंदु-समाज-प्रामाण्य म्हणून संबोधिलें, त्यापेक्षां आचारधर्म कांहीं वेगळा नाहीं, हें उघड आहे.

या विवेचनावरून स्पष्ट होईल कीं हिंदुत्व हें केवळ जन्मानेंच उपलब्ध होऊं शकेल असें नाहीं. जो जो जन्मानें हिंदु तो तो स्वाभाविकच, कळत वा न कळत, हिंदु समाजाशीं तादात्म्य पावलेला आहे. पण जे कोणी परकीय रक्तानें, देशानें, परंपरेनें विजातीय आहेत, त्यांनीं जर हिंदुसमाज-प्रामाण्य स्वीकारलें तर तेहि हिंदु होऊं शकतात. हिंदु-समाज-प्रामाण्य त्यांनीं स्वीकारलें याचाच अर्थ त्यांनीं हिंदुधर्माचा पूर्णांशानें खराखुरा स्वीकार केला. हिंदु-समाज-प्रामाण्य मान्य न करितां हिंदुधर्मांतील वेदान्ताचा अथवा वैष्णव पंथाचा अथवा योगमार्गाचा जे स्वीकार करतील, त्यांना फार तर वेदान्तपंथी, वैष्णवपंथी, योगमार्गी असें संबोधितां येईल. अमेरिकेंत असे कांहीं लोक आहेत, त्यांनीं वेदान्त-मताचा मनःपूर्वक स्वीकार केलेला आहे. तथापि त्याची समाजनिष्ठा अमेरिकेंतील लोकांबद्दल असल्यामुळें, त्यांना यथार्थानें हिंदुधर्मिय म्हणतां येणार नाहीं हें उघड आहे. हिंदुस्थानांतील लोकांसंबंधीं विचार करावयाचा झाला तर जैन, बौद्ध, शीख इत्यादींबद्दल प्रश्न काढणेंच चूक आहे. पण उद्यां पारशी लोकसुद्धां स्वतःची सूर्योपासना, पूजापद्धति, जन्ममृत्यु आदि संस्कारपद्धति आज आहे तशीच स्थिर ठेवूनहि हिंदु होऊं शकतात; मात्र त्यांनीं हिंदु-समाजाशीं एकरस झालें पाहिजे. हिंदु-समाज-प्रामाण्य स्वतःच्या जीवनांत प्रत्यक्ष उतरविलें पाहिजे.

वास्तविक पारशी समाज हिंदुसमाजांत यापूर्वींच तादात्म्य पावून जावयास हवा होता. एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत इंग्लंडमध्यें हॉलंड देशांतील विणकर आले. आतां त्यांच्या वंशजांना आपले पूर्वज हॉलंडमधून आले होते याची कल्पनाहि नसेल. हें कार्य राजसत्तेनें केलें. संजाणा बंदरांत ज्या वेळीं

पारसीक येऊन उतरले, त्या वेळीं तेथील हिंदु राजानें त्याच्यावर निर्बंध घातले कीं पारशांनीं येथील भाषा स्वीकारावी, पारशांनीं येथील लोकांचा पोषाख करावा; भाषा आणि पोषाख याचबरोबर येथील परंपरा पारशांनीं स्वीकारली असती अथवा त्यांना स्वीकारण्यास सांगण्यांत आलें असतें, निराळ्या शब्दांत त्या काळच्या पद्धतीप्रमाणें पारशांना चातुर्वर्ण्यांत कांहीं तरी स्थान दिलें असतें तर पारशांचें वैशिष्टच राहूनहि वेगळेपणा राहिला नसता. हिंदु समाजाची परंपरा ज्यांच्यामुळें स्मरणांत राहते, तीं राम, कृष्ण गोविंद, गजानन, मधुकर, प्रफुल्लचन्द्र यांसारखीं हिंदूंचीं नांवें पारशांनीं स्वीकारलीं असतीं म्हणजे हें तादात्म्य पक्कें, चिरंतन झालें असतें. नांवांत काय आहे? नांवांत फार आहे. नांवांत स्मृति सांठविलेली असते. एवढ्या-साठीं पारशांना हिंदु नांवांचा स्वीकार करावयास सांगणें अवश्य होतें. पारशी हिंदुसमाजाशीं तादात्म्य पावले नाहींत यास राजसत्तेचें दुर्लक्ष्य हेंच कारण झालें राजसत्तेनें लक्ष न दिल्यास असे तटस्थ समाज आपण होऊन मूळ समाजांत विलीन होतीलच असें नाहीं. त्यासाठीं त्यांना प्रयत्नपूर्वक विलीन करून घेतलें पाहिजे.

जी शक्यता पारशांच्याबद्दल तीच शक्यता हिंदुस्थानांत असलेले ख्रिश्चन आणि मुसलमान यांच्याबद्दल. ख्रिश्चनांनीं आणि मुसलमानांनीं खऱ्या अर्थानें हिंदु-समाज-प्रामाण्य स्वीकारलें, तर ते केवळ चर्चमध्यें जाऊन ख्रिस्ताचे पूजन करतात, किंवा मशिदींत जाऊन अल्लाचें स्मरण करतात यामुळें त्यांचें हिंदुत्व कमी होण्याचें कारण नाहीं. मात्र दोन बाबतींत स्पष्टता असली पाहिजे. एक तर जें पारमार्थिक विचारस्वातंत्र्य हिंदुसमाजांत विलीन होतांना त्यांना मिळालें आहे, तेंच दुसऱ्यांनाहि आहे हें त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. दुसरें असें कीं, वास्को-दि-गामा, सेंट झेवियर, अल्बुकर्क, महमद गजनी, घोरी, बाबर, औरंगजेब ते थेट महमदअल्ली जीना यांच्यापर्यंत ज्या कोणीं हिंदुसमाजावर आक्रमणें केलीं, हिंदुसमाजाचीं ऊकलें उडविण्याचे यत्न केले, त्यांना राष्ट्रपुरुष म्हणून ते मानणार असतील तर हिंदुत्वाचा वासहि त्यांना येणार नाहीं हें उघड आहे. हिंदुसमाजाचे जे शत्रु, ते माझेहि शत्रु. श्रीराम, श्रीकृष्ण, प्रताप, शिवाजीमहाराज, व्यास, वाल्मीकि, तुळशीदास, तुकाराम आदि हिंदुमनाचे जे स्फूर्तिदाते तेच माझेहि स्फूर्तिदाते अशी दुहेरी भावना जर मनोमन उत्पन्न होणार नसेल. तर तेथें हिंदुत्वाचा उदय कोठून होणार ?

पण वर उल्लेखिलेली भावना मुसलमान आणि ख्रिश्चन यांच्या मनांमध्ये भविष्यकाळांत उत्पन्न होण्याची शक्यता आहे. भविष्यकालीं हा शब्दप्रयोग बुद्ध्याच केलेला आहे. पारशी समाज आश्रयार्थी या नात्यानें हिंदुस्थानांत आला. हिंदुसमाजाशीं त्याचें वैर नव्हतें, आजहि नाहीं. त्याला हिंदुत्वांत आतांसुद्धां गोंवता येईल. पण मुसलमान येथें आक्रमक या नात्यानें आले; हिंदुसमाज नष्ट करून येथें स्वतःचें राष्ट्र निर्माण करावें असा प्रयत्न त्यांनीं केला. अजूनहि तें तसा प्रयत्न करीत आहेत हें विसरतां येणार नाही. हिंदुसमाजांत असें विचारण्याची एक पद्धत पडून गेली आहे कीं, भूतकाळामध्यें ग्रीक, शक, हूण, इत्यादि यवनांना हिंदुसमाजानें आत्मसात करून घेतलें, तसेंच ख्रिचन, मुसलमान, आदि वर्तमानकालीन यवनांना आत्मसात कां करून घेऊं नये ? आम्हीं त्यांना पोटांत कां पचवूं नये ? या सूचनेचें उत्तर 'अवश्यमेव करावें,' असेंच येणार. पण आत्मसात करावें या शब्दप्रयोगाचा अर्थ नीटपणें लक्ष्यांत घेतला पाहिजे. आत्मसात करणें एवढाच शब्द सार्थ आहे; तेथें कोणतीहि तडजोडीची भावना उपयोगी नाहीं. पचवूं कोण शकतो ? ज्याच्या हातापायांच्या काडया झालेल्या आहेत, पोटाचा नगारा झालेला आहे, तो पचवूं शकतो का? मुळींच नाहीं, उलट ज्याचें मनगट जाडें-जुडें आहे, ज्याच्या सर्वांगांतून तेज ओसंडत आहे, तोच खाल्लेलें पचवूं शकतो, दगड खाऊनहि ढेकर देऊं शकतो. शक, हूण वा ग्रीक याच तऱ्हेनें आत्मसात केले गेले. जोंपर्यंत हिंदुसमाजावर विजय मिळविणारे आक्रमक या नात्यानें ते मिरवीत होते, तोंपर्यंत ते वेगळेच राहिले. पण जेव्हां हिंदुसमाजानें त्यांचा निर्णायक पराभव केला, जेव्हां दुसरी-तिसरीकडून त्यांना मदत येण्याची शक्यता नाहींशी केली, तेव्हांच हिंदुभूमीत परकीय या भूमिकेंत राहण्यापेक्षां या उदारचरित संस्कृतीशीं तादात्म्य पावण्याचा मार्ग शकहुणादिकांनीं पसत केला. अशा रीतीनें हतबल झालेल्या शत्रूला श्रीमत्-आद्यशंकराचार्यांसारख्या थोर पुरुषांनीं ब्राह्मण्य, क्षात्र, वैश्य आदि वर्णधर्म देऊन हिंदुसमाजाच्या पोटांत घेतलें. आणि थोडक्याच दिवसांत शक हे शक राहिले नाहींत, हूण हे हूण राहिले नाहीत, ग्रीक हे ग्रीक राहिले नाहींत; ते सर्व विशाल अशा हिंदुसमाजाशीं एकरूप झाले. ख्रिचन आणि मुसलमान आक्रमकांच्या बाबतीत हेंच होणें अवश्य नाहीं का ? एरवीं ते हिंदुसमाजाशीं तादात्म्य कोठून पावणार ?

भगिनी निवेदिता यांनीं आपल्या पूर्वपरंपरेचा त्याग केला. पूर्वीचा समाज, पूर्वीची भूमि नित्यासाठी सोडून त्या हिंदुस्थानांत आल्या. इतकेंच नव्हे तर हिंदुसंस्कृतीबद्दल अपरंपार प्रेम, अपरंपार श्रद्धा त्यांनीं धारण केली. बिंदु जसा सिंधूशीं एकरूप होतो, तशा त्या हिंदुसमाजाशीं एकरूप झाल्या. हिंदूंचे आचार त्यांनीं स्वीकारले, हिंदूंचा पोशाख स्वीकारला, हिंदूंचीं दुःखें आपलींशीं मानलीं, हिंदूंच्यावरील संकटें सहन केलीं, हिंदूंच्यावर राज्य करणारी आपल्या पूर्वीच्या मायदेशाचीं, ब्रिटिशांची सत्ता त्यांनीं परकी मानिली, शत्रुवत् लेखिली; आत्मतत्त्वाचा विकास करण्याचा हिंदुसंस्कृतीचा संदेश शिरोधार्य केला; सर्व जीवन त्या संदेशानुसार वैराग्यांत, सततोद्योगांत, रस्ते झाडण्यापासून तों शिक्षण देणें आणि राजकारण करणें येथपर्यंतच्या समाज-सेवेंत व्यतीत केलें. त्यांचें हिंदुत्व कोणाला तरी नाकारतां येईल काय? ती गार्गी, मैत्रेयी यांसारखी विदुषी आणि अहल्याबाई, मिराबाई यांच्या-सारखी पवित्र पुण्य-स्त्री ख्रिस्ताचेंहि स्मरण करीत असे; पण तेवढ्यानें तिचें हिंदुत्व कमी होऊं शकेल का ? समाजांत विलीन होणें म्हणजे काय याचें हें जागतें उदाहरण आहे.

५

आतांपर्यंत हिंदुत्वाचें लक्षण भूमिनिष्ठा नसून हिंदु-समाज-प्रामाण्य आहे याचें प्रतिपादन झालें. मग भूमिनिष्ठेला महत्त्व नाहीं, भूमिविचाराला कोठेंच स्थान नाहीं, असा त्याचा अर्थ करायचा काय ? तसा अर्थ नाहीं. भूमीला राष्ट्रकल्पनेमध्ये महत्त्वाचें स्थान आहे. भूमीविना राष्ट्रच होऊं शकत नाहीं इतकें तें स्थान अढळ आहे. राष्ट्र या शब्दाची व्याख्या अनेक राज्य-शास्त्रज्ञ विद्वानांनीं केलेली आहे. त्यासंबंधीचा ऊहापोह पूजनीय माधव-रावजी गोळवलकर यांच्या 'आम्ही कोण ?' या पुस्तकांत उत्तम रीतीनें केलेला आहे. आणि श्री. ज. द. जोगळेकर यांच्या १९५०-मध्यें प्रसिद्ध झालेल्या 'हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व' या पुस्तकांतहि त्याचा परामर्श चांगला घेतला आहे. या लहानशा लिखाणांत राष्ट्र-कल्पनेची परिपूर्ण छाननी करणें शक्य होणार नाहीं. तथापि राष्ट्र हें मोठें कुटुंब आहे. व्यवहारांत आपण कुटुंब कशाला म्हणतों ? जेथें अनेक व्यक्ति रक्ताच्या नात्यामुळें एकत्रित राहतात, राहण्याचें नित्याचें असें तेंच ठिकाण ज्यांच्या बाबतीं सुनिश्चित असें आहे, त्याना कुटुंब म्हणतात. घराणें या शब्दाचा प्रयोग होतो

तो असाच आहे. 'घर' अधिक त्या ठिकाणीं वंशपरंपरेनें एकत्र राहणारे 'लोक' म्हणजे 'घराणें' होतें. राष्ट्र याची सर्वांत सोपी व्याख्या कुटुंब अथवा घराणें या शब्दानुसार करतां येईल. एकात्म असलेला, ज्यांतील घटकांचा अभ्युदय आणि निःश्रेयस् हीं परपस्परांवर अवलंबून आहेत असा समाज आणि त्याची वंशपरंपरेनें चालू राहणारी स्वामित्वाची भूमि या दोहोंनीं मिळून राष्ट्र होतें. श्लोकबद्ध स्वरूपांत ही व्याख्या मांडावयाची झाली तर—

जनःपरम्परापूर्वः तस्य वंशक्रमान्विता ।
स्वाम्ये स्थिता च भूः एतद् उभयं राष्ट्रमुच्यते ॥ ५ ॥

परंपरायुक्त व म्हणून एकात्म असलेला समाज आणि त्याची वंशपरंपरेनें स्वामित्वाची भूमि मिळून राष्ट्र होतें, दोन्हीपैकीं एक आहे, दुसरें नाहीं, असें असेल तर राष्ट्र घडणार नाहीं. नुसता समाज आहे, त्याला स्वतःची अशी भूमिच नाहीं, तोहि राष्ट्र होऊं शकणार नाहीं. भारतांत पारशी समाज आहे; पण त्याच्याच केवळ स्वामित्वाची अशी भूमि त्या समाजाजवळ नसल्यानें पारसीक नांवाचें राष्ट्र अस्तित्वांत नाहीं. पॅलेस्टाईनमध्यें अनेक शतकांपूर्वीं ज्यूंचें राष्ट्र होतें. तेथून जेव्हां मुसलमानी आक्रमकांनीं त्यांना हांकललें, त्या वेळीं त्यांचें राष्ट्रत्व अस्तंगत झालं. तथापि ज्यू समाज पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र हिंडूनहि, अन्य भाषा स्वीकृत करूनहि, अन्य रक्ताची भेसळ होऊनहि एकात्म राहिला, स्वतःच्या पराक्रमानें त्यानें आपली पूर्वापार भूमि पुनरपि जिंकली. समाज अधिक भूमि हे दोन घटक एकत्र आल्याबरोबर 'इस्रायल' हें पुरातन राष्ट्र नव्यानें उदयाला आलें. दुसऱ्या पक्षीं नुसती भूमि आहे, लोक नाहींत, तेथें राष्ट्र नाहीं हें उघडच आहे.

समाजाची एकात्मता ही परस्परांबद्दलच्या प्रेमावर अवलंबून असते. दुसऱ्याला झालेलें दुःख तें माझें दुःख, त्याला मिळालेलें सुख तेंच माझेंहि सुख, अशी आत्मीयता वाटत असेल, ती अंतःकरणांतून उमटत असेल तर ही आत्मीयता वाढण्यास मदत होते. मात्र एक-भाषा, एक-इतिहास आदि असूनहि खरी आत्मीयता नसेल तर समाज विस्कळितच राहतो. उलट एक भाषा, एक संस्कृति आदि बाह्य कारणें नसतांना सुद्धां खरीखुरी

आत्मीयता असेल तर समाजाच्या एकरसत्वाला न्यून येतें असें नाहीं. तथापि सामान्यें करून एक-भाषा, एक-इतिहास आदि घटकांमुळें आत्मीयता प्रकट होण्यास अथवा दृढ होण्यास सुकर जातें यांत शंका नाहीं.

'एकात्म समाज अधिक वंशपरंपरेनें चालू राहणारी त्याची भूमि म्हणजे राष्ट्र' ही व्याख्या ध्यानांत घेतली म्हणजे या भूमींतील प्रान्त केवळ त्या प्रान्तीय लोकांचाच नाहीं,–उदाहरणार्थ कुरुक्षेत्र केवळ पंजाब्यांचें नाहीं, तें अखिल हिंदूंचें आहे, हें सांगणें नलगे. मग ज्या भूमीवर केवळ त्यांचा स्वतःचाच अधिकार नाहीं, त्या भूमीला इच्छेनें, अनिच्छेनें वा सार्वमतानें दुसऱ्याच्या हवालीं करण्याचा अधिकार तरी या प्रान्तीय घटकांना कोठून येणार? दुसऱ्याच्या हवालीं करणें तर सोडून द्या, पण माझी भूमि घेऊन मी वेगळा होतों, असें सुद्धां कोणालाहि म्हणतां यावयाचें नाहीं. कारण ती भूमि त्याची एकट्याची नाहींच, सर्व हिंदुसमाजाची आहे, तेथें त्याला दूर जातांच येणार ना ीं. इतकेंच काय, पण सर्व हिंदुसमाजानें उद्यां एकमतानें ठरविलें कीं अमुक भूमि तिसऱ्याला द्यावयाची, तरी त्याला तसें करतां येणार नाहीं. कारण, ही भूमि वडिलोपार्जित आहे. ती वाढवून अथवा कमींत कमी तशीच्या तशीच आपल्या पुत्रपौत्रांना द्यावयाची आहे. तसें न करतां ही भूमि आम्ही जुगारांत फुंकून टाकणार, विकणार वा दुसऱ्याला बक्षीस देणार असें एकादी नादान पिढी म्हणूं लागली, तर तिला तसें करण्याचा नैतिक अधिकार नाहीं. कारण भावी पिढीच्या मतेची विल्हेवाट कोणी करतों म्हटलें, तरी कशी करतां येईल? कदाचित् कोणीं अशी विल्हेवाट लावलीच तरी पुत्रपौत्र ती मानतील कशी? व त्याबद्दलचे झालेले कागदाचे कपटे केराच्या-टोपलींत जातील आणि 'मेरी भूमि नहीं दूंगी' या तेजस्वी शब्दांनीं पुढील पिढींतील ललनाहि उठतील आणि तुटलेली पुण्यभूमि परत मिळवितील.

एकात्म समाज अधिक त्याची वंशपरंपरेनें स्वामित्वाची भूमि म्हणजे राष्ट्र होतें ही व्याख्यासुद्धां तार्किक झाली. पण हिंदु मनाला या तार्किकतेंत समाधान नाहीं. तें तर्काच्याहि पुढें धांव घेत असतें. 'या भूमीचा मी स्वामी' अशी भावना हिंदूच्या मनांत येणेंच शक्य नाहीं. जी भूमि मला धारण करते, जी माझें पोषण करते, जिथें मला सुखानें झोंप येते, जिथें माझ्या वाडवडिलांची

रक्षा पडली, जिथें माझीहि रक्षा पडणार आहे, ती वसुधा, ती धरित्री, तिचा मी स्वामी नाहीं; ती माझी माता, मी तिचा पुत्र; आम्हां सर्वांची ती माता, आम्ही सर्व तिचे पुत्र, ती देवता, आम्ही तिचे भक्त, ती साक्षात् प्रेमास्वरूप, मंगलमय जगदंबा, आम्ही तिचीं आवडतीं सद्गुणी संतानें, अशा अति पवित्र नि उदात्त भावनेनें त्याचें अंतःकरण भरून येतें. आणि या भावनेस अनुसरून घरोघरीं पूर्वकाळांत नि अजूनहि कित्येक ठिकाणीं पहांटे जागृतीनंतर या मातृस्वरूप भूदेवीला पादस्पर्श करण्यापूर्वी मातृभक्त हिंदु मित्र भावानें क्षमायाचना करीत असे नि असतो—

**समुद्रवसने देवि, पर्वतस्तनमण्डले ।**
**विष्णुपत्नि नमस्तुभ्यं, पादस्पर्श क्षमस्व मे ॥**

(पर्वतरूपी उन्नतवक्ष असलेल्या, समुद्ररूपी वस्त्र
धारण करणाऱ्या देवी, हे जगज्जनक-सहचरी जगदंबे,
तुला माझ्या पायाचा स्पर्श होतो याची क्षमा कर.)

आणि पूर्वकालाप्रमाणें आजच्याहि कालांतील हिंदुमन मातृप्रेमानें गातांना आढळतें—

**वंदे त्वां भूदेवीम् आर्यमातरम् ।**
**जयतु जयतु पद-युगलं ते निरन्तरम् ! ॥**

(हे आर्यांचे आई, भू-देवते, मी तुला नित्य वंदन करतों.
तुझ्या चरणकमलांचा जयजयकार असो, जयजयकार असो !)

## ६

**एकात्म** समाज आणि अविच्छिन्नपणें त्याच्या स्वामित्वाची भूमि मिळून राष्ट्र होतें. हा खरा राष्ट्रवाद याच्याविरुद्ध लोक एकात्म नसतांहि एक आहेत मानणें; निराळ्या शब्दांत विशिष्ट भूभागांत राहणारे यच्चयावत् लोक म्हणजे राष्ट्र, हा झाला प्रादेशिक राष्ट्रवाद. हा प्रादेशिक राष्ट्रवाद (Territorial Nationalism) जगांत कोठेंहि अस्तित्वांत नाहीं. आयर्लंड हा निश्चित मर्यादा असलेला भूभाग आहे. प्रादेशिक राष्ट्रविचारानुरूप आयर्लंडमध्यें राहणारे ते सर्व एक, एक-राष्ट्रीयत्वाचे असावयास पाहिजेत. पण तसें तेथें नाहीं. कारण मूळचा आयरिश लोकांचा समाज आणि त्यांना अल्स्टरमधून

हाकलून तेथें वसाहत करणारे इंग्लिश वसाहतवाले यांचा समाज हे दोन अगदीं वेगळे आहेत. प्रत्येक समाजाचीं परंपरा, स्फूर्तिस्थानें आणि म्हणून समाजोन्नतीचीं साधनें भिन्न भिन्न आहेत. यामुळें एकाच भू-भागांत अंशत: आयरिश राष्ट्र आणि अंशभागानें इंग्लिश राष्ट्र अशीं दोन राष्ट्रें राहतात. उद्यां राजकारणाकरितां अल्स्टर आयरिश राष्ट्राला मिळेलहि. पण तसें झालें तर इंग्लिश वसाहतवाल्यांना एक तर इंग्लंडमध्यें जाऊन राहावें लागेल अथवा इंग्लिशपण विसरून आयरिश समाजाशीं तादात्म्य पावावें लागेल. रशिया हें प्रादेशिक राष्ट्रवादाचें उदाहरण म्हणून दाखविण्यांत येतें. वस्तुत: पूर्वीं रशियाचें साम्राज्य होतें. आजहि तें Soviet Union आहे. म्हणजे सोव्हियट राष्ट्रसमूह आहे. पण हा समूह सुद्धां स्वेच्छेने एकत्र आलेला नसून दंडशक्तीमुळें एकत्र आलेला आहे. सर्कशींत वाघ, सिंह, शेळी, मेंढी, घोडा इत्यादि जनावरें चाबूकधाऱ्याच्या धाकानें एकत्र येतात, तोच प्रकार रशियांत आहे. युनायटेड स्टेट्स्मध्येंहि अनेक राष्ट्रांतील लोक एकत्र झाले आहेत; पण या नवोदित देशाची गोष्ट वेगळी आहे. तेथें जो जो येतो, तो तो स्वत:च्या राष्ट्राचा त्याग करून परागंदा होऊन येतो, आणि न्यूयॉर्कला आल्या दिवसापासून या नवराष्ट्राशीं तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करतो. स्वित्झर्लंड, बेल्जम आणि कानडा या देशांत विविध भाषा बोलणारे लोक आहेत, तथापि तेथें एक राष्ट्र आहे, याचें कारण एवढेंच कीं, भाषाभिन्नत्वामुळें समाजांतील एकात्मभाव बिघडतोच असें नाहीं. मुख्य मुद्दा समाजांतील एकात्मभावाचा आहे. स्वित्झर्लंड अथवा बेल्जममधील लोक भाषेनें नसले तरी अन्य कारणांनीं एकरस झालेले आहेत. केवळ एका विशिष्ट भूभागांत राहतात म्हणून सर्व एक असा अर्थ तेथें झालेला नाहीं. जपानमध्यें धर्मभिन्नता आहे; कित्येक शितो आहेत, कित्येक बुद्धधर्मीय आहेत; तथापि पूर्वपरंपरा कोणींच सोडलेली नाहीं. समाजरूपानें ते एकात्मच आहेत.

एवंच प्रादेशिक राष्ट्रवाद मुळांतच चुकीचा आहे. हिंदुस्थानला तर प्रादेशिक राष्ट्रवादाचें तत्त्व लावणें हें अधिकच चुकीचें आहे. या प्रादेशिक राष्ट्रीयत्वाच्या मृगजळामुळें चाळीस कोटि हिंदूंना आपल्या पुत्रपौत्रांसह आपल्या स्वत्वाला मुकावें लागत आहे. कारण, राष्ट्रीयत्व याचा अर्थच

असा कीं, त्याच्या पोटांत अन्य कोणतीहि स्वतंत्र निष्ठा चालणार नाहीं. 'हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व असें जेव्हां म्हटलें जातें, त्या वेळीं त्याच्या आंत कोणी बंगाली नाहीं अथवा पंजाबी नाहीं, सारस्वत नाहीं अथवा कायस्थ नाहीं, ब्राह्मण नाहीं अथवा शूद्र नाहीं; सर्व एकाच हिंदुत्वाचे आहेत. बंगाली, पंजाबी इत्यादि कल्पना सोयीसाठीं, व्यवहारासाठीं आहेत. प्रसंगीं राष्ट्रीयत्वासाठीं सर्व महाराष्ट्राला मरावें लागलें तरी चालेल, पण हिंदुत्व टिकलें पाहिजे' अशी भूमिका आवश्यक आहे. म्हणजे हिंदुत्वाच्या रक्षणासाठीं कोणताहि त्याग अधिक वाटतां कामा नये. 'अंतिम निष्ठेसाठीं पोटनिष्ठेचा त्याग केला पाहिजे,' ही भूमिका प्रादेशिक राष्ट्रवादासाठीं घ्यावयाची झाल्यास हिंदूंनीं आपलें हिंदुत्व सोडलें पाहिजे आणि हिंदुत्व सोडणें म्हणजे चाळीस कोटि लोकांनीं मनानें व शरीरानें अक्षरशः परतंत्र होणें, दास होणें होय. कारण सहस्रों वर्षांच्या परंपरेनें या चाळीस कोटि मानवांच्या उद्धाराचे, उन्नतीचे, विकसनाचे मार्ग केवळ हिंदुत्वामधूनच जातात. ते मार्ग बंद झाले म्हणजे सर्व संपलेंच ! !

पृथ्वीवर असें एकहि राष्ट्र नाहीं कीं, जगाच्या सुद्धां उद्धारासाठीं तें स्वतःचा बळी देईल. सर्व राष्ट्राचा बळी देऊन साधावें असें जगांत कांहींच असं शकत नाहीं, हें आम्हीं लक्षांत ठेविलें म्हणजे आमच्या विचारांची सुरुवात हिंदुसमाजांतील व्यक्तीपासून होईल आणि तिचा अन्त सर्व हिंदूंना सामावणाऱ्या हिंदुराष्ट्रापाशींच होईल. हिंदुराष्ट्र हा विचार मानव्य-हितबुद्धींतून आलेला आहे. जो अधिकार जगांतील दुसऱ्या कोणत्याहि समाजाला, राष्ट्राला देण्यास आपण हिंदु सिद्ध आहोंत, तोच आपण आपणां स्वतःसाठीं वापरीत आहोंत. त्यामध्यें संकुचित, जातीय, Theocratic-पंथाधिष्ठित, लज्जास्पद कांहींहि नाहीं, उलट हा विचार अत्यंत न्याय्य अभिमानाचा, आनंदाचा असाच आहे, हें आतां पुरतेपणीं सिद्ध झालें.

## ७

असें आहे हें हिंदुराष्ट्र. हिंदु समाज आणि हिंदु समाजाच्या निःसंशय स्वामित्वाची आसिंधुपर्यंता अशी भूमि म्हणजेच हिंदुराष्ट्र. कित्येक जण हिंदु-जीवनपद्धतीशीं राष्ट्र-कल्पनेचें एकरूपत्व समजूं पाहतात; पण तसें

करण्याचें कारण नाही. 'आत्म्याचा आविष्कार करा, सर्वभूती, जळीं, स्थळीं, काष्ठी, पाषाणीं, आत्मतत्त्व पाहा, तें सर्वत्र एकच आहे हें जाणून जीवनात खऱ्याखुऱ्या समतेनें वागा, स्त्री ही माता आहे' इत्यादि विचार जींत ग्रथित केलेले आहेत ती विचारसरणी म्हणजे हिंदुजीवनपद्धति. ही विचारसरणी अत्यंत प्रगल्भ आहे, सामर्थ्यदायिनी आहे, ही विचारसरणी हेंच हिंदुराष्ट्राचें सर्वोत्तम भूषण आहे इत्यादि गोष्टी बरोबर आहेत. पण 'ही विचारसरणी आजच्या व्यवहारांत पूर्णांशानें असेल तरच हिंदुराष्ट्र, नाहीं तर हिंदुराष्ट्र नाहीं,' असा अर्थ करणे मात्र शास्त्रीय दृष्टचा बरोबर ठरणार नाहीं. हिंदुराष्ट्र हें कारण आहे, हिंदु-जीवनपद्धति हें त्याचें कार्य आहे. हिंदु-जीवनपद्धति आज व्यवहारामध्यें वावरतांना दिसत नाहीं, अतएव हिंदुराष्ट्र मिथ्या आहे' असें म्हणणें उतावीळपणाचें होईल. हिंदु जीवन-पद्धतीमधील परिवर्तनशील भागाची पुनः मांडणी आजच्या काळाला शोभल अशा रीतीनें निश्चित करतां येईल. पण ही मांडणी अभ्यासपूर्वक विचार करून करावी लागेल, त्याला कांहीं काळ लागेल. तोंपर्यंत हिंदुराष्ट्र नाहीं असें नाहीं, हिंदुराष्ट्र हें आहेच. हिंदुराष्ट्र काल होतें, आजहि आहे, उद्यांहि असणार ! हिंदु-जीवनपद्धति काल होती, आज कदाचित् अस्तंगत झालेली भासत असेल, कदाचित् त्वरित् उत्पन्न होण्याची शक्यता दिसत नसेल! पण तेवढयासाठीं हिंदुराष्ट्र नाहीसें करतां येणार नाही. कारण त्या बीजांतूनच वृक्ष निघणार आहे. हिंदुराष्ट्राचें रक्षण व संवर्धन करा, त्यांतून आपोआप पूर्वींची उदात्त हिंदु-जीवनपद्धति पुनरपि उदयाला येईल. ती आज दिसत नाहीं म्हणून हिंदुराष्ट्र धिक्कारूं म्हणाल, तर वृक्ष तर नाहींच पण बीजहि जाईल.

उन्नत जीवन-पद्धति असेल तर तें माझें हिंदुराष्ट्र; आणि मागें पडलेलें, जीवनप्रणालि विसरलेलें तें माझें हिंदुराष्ट्र नाहीं, या म्हणण्यांत खरोखर काय अर्थ आहे ? ज्या काळांत व्यक्तिगत जीवन परमउदात्त होतें, समाज जीवन अत्यंत सुखपूर्ण, पराक्रमशाली, विजिगीषु होतें, तो वेद-काल आणि वेदोत्तर काल जर हिंदुराष्ट्राचा, तर बुद्धानंतर, अशोकानंतर, अनाचारांत, कामुकतेंत, मदिरा-मदिराक्षींच्या तावडीत सांपडलेल्या दिवसाचा ओघहि हिंदुराष्ट्राचाच. सद्गुणी पांडव हे हिंदुराष्ट्राचे, तसे दुष्ट समजले जाणारे कौरवहि हिंदुराष्ट्राचेच ! श्रीकृष्ण हिंदुराष्ट्राचा, कसहि हिंदुराष्ट्राचाच !

भूत्रमात्रांत आत्मतत्त्व पाहणारें तत्त्वज्ञान हिंदुराष्ट्राचेंच आणि अस्पृष्टांच्या गळ्यांत मडकीं बांधून फिरावयास लावणाऱ्या रूढीहि हिंदुराष्ट्राच्याच ! ' हिंदुराष्ट्र हें निरपवादपणें, सर्वोत्तम सर्वगुणसंपन्न अशा जीवनप्रणालीनें युक्त असेल तरच माझें आणि तसें नसेल तर तें माझें नाहीं ' हें म्हणणें खरोखरी योग्य नव्हे. कारण हिंदुराष्ट्र म्हणजे तीस कोटि मानव नि त्यांचे पुत्रपौत्र यांच्या विकसनाचा एकमेव मार्ग; तो चांगला असो वा वाईट असो, तो कांटेरी असो वा खांचखळग्यांनीं भरलेला असो. येथून माघारीं जातां येणार नाहीं अथवा दुसरा रस्ताहि पत्करतां येणार नाहीं. तो एकच एक आहे. आमच्या प्रयत्नांनीं हा मार्ग चांगला करूं, आमच्या हातांनीं ते कांटेकुटे दूर सारूं, आमच्या देहांची भर घालून खांचखळगे भरून काढूं, पण हा रस्ता कांहीं सोडून देणार नाहीं.

हें हिंदुराष्ट्र कोणत्याहि जुन्या, निरुपयोगी किंवा बलात्कारी रूढींशीं बांधलेलें नाहीं. हिंदुराष्ट्र म्हटलें म्हणजे त्यांत जमीनदारी असलीच पाहिजे, त्यांत गरिबांवर अन्याय झालाच पाहिजे, त्यांत लोक पिळले गेलेच पाहि-जेत, तेथें समान संधि असणारच नाहीं अथवा स्त्रीला सन्मानाचें स्थान मिळ-णारच नाहीं, तेथें स्वच्छता, सुधारणा, आधुनिकता येणारच नाहींत, तेथें शास्त्रज्ञानाकडे पाठ फिरविलेलीच असणार, तेथें लोकशाही असूंच शकणार नाहीं, तेथें जुलुमी राजसत्ता अथवा अधोगतीस गेलेली हुकूमशाहीच येणार, येथें मतवैचित्र्य असण्यास बंदीच असणार, भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, संघटन-स्वातंत्र्य याला तेथें काळिमा फांसला जाणार, तेथें केवळ पंचगव्य-प्राशन आणि तीन-तीन नि लांब शेंड्या कोणाच्या आहेत त्यावर योग्यता ठरणार, असें कोणी हेकटपणें म्हणूं लागेल तर त्याची कींव करण्यावांचून गत्यंतर नाहीं. जसे अन्य कोणत्याहि राष्ट्रामध्यें पुराणमताभिमानी (Conservative) असतात, उदारमतवादी (Liberal) असतात, समाजसत्तावादी (Socialist) असतात, साम्यवादी (Communist) असतात, तद्वत् हिंदुराष्ट्रामध्येंहि अनेक पक्षोपपक्ष असूं शकतील. अन्य राष्ट्रांप्रमाणेंच हिंदु-राष्ट्रहि स्वभावतः पुरोगामी नाहीं, प्रतिगामीहि नाहीं; हिंसक नाहीं, अहिंसकहि नाहीं; तर या राष्ट्रांतले आम्ही हिंदु या राष्ट्रजीवनाची, राष्ट्र-वैभवाची जशी निर्मिति करूं, तसें तें होणार आहे. या राष्ट्रांतील घटना कोणती असावी, येथील विधि कोणते असावे, येथील भूमीची वांटणी कशी

करावी, येथील उत्पादनावर कोणाची सत्ता असावी इत्यादि गोष्टी या हिंदुराष्ट्रांतील लोकांनीच विचार करून ठरवावयाच्या आहेत. या प्रश्नावर दोन किंवा अधिक मतें उत्पन्न होऊन वर म्हटल्याप्रमाणें पक्षहि उत्पन्न होतील. ते प्रश्न सोडविण्यासाठीं लोकशाही समाजवाद स्वीकारावा लागेल अथवा राज्यक्रांतीची पद्धत अवलंबावी लागेल. अथवा येथील प्रश्न सहकार्यानें, संघटनेनें सुटणार असतील, पण हे सर्व हिंदुराष्ट्रान्तर्गत असे प्रश्न आहेत. या कोणत्याहि प्रश्नानें राष्ट्रीयत्वाच्या मुद्द्यावर आम्हांमध्यें मतभेद होण्याचें कारण नाहीं.

राष्ट्रीयत्वाची ही भूमिका दृढ झाली तर आपल्या देशांतील शेंकडा पन्नास प्रश्नांची सोडवणूक तत्काळ होऊं शकेल. कारण आज ज्यांना आम्ही विभिन्न मानतों, प्रसंगीं शत्रु समजतों ते नि आपण सर्व एक हा ऐक्यभाव यामुळें पक्का होईल. आपल्या देशाचें राष्ट्रीयत्व कोणतें आणि आपल्या देशाचें नांव काय, या प्रश्नावर जगांतील कोणत्याहि देशांत आपल्याकडच्यांसारखे पक्ष असल्याचें आढळणार नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यासारख्या देशांत मतभेद आहेत, ते तीव्र स्वरूपाचेहि आहेत; पण ते अंतर्गत व्यवस्था अथवा क्वचित् परराष्ट्रीय राजकारण एवढ्या बाबतीपुरतेच आहेत, हें राष्ट्र कोणाचे या बाबतींत नाहींत. आमच्यावरील पारतंत्र्यानें आमच्या देशांत नेमका याच मुद्द्यावर तीव्र स्वरूपाचा मतभेद माजून राहिला आहे आणि हेंच आमच्या देशाचें मोठें दुर्दैव आहे. आज देशाची कार्यशक्ति कोणत्याच भूमिकेवर एकत्रित होऊं शकत नाहीं. परस्परांबद्दल संशय, कटुता, मत्सर, द्वेष या विविध विकारांनीं आम्हीं परस्परांना दूर ढकलिलें आहे राष्ट्रीयत्वाची भूमिका सर्वांची एक हें जर ठरेल, तर आम्ही परस्परांचें गुणग्रहण करूं शकूं, सहकार्यानें हातांत हात घालूं शकूं, देशांतील कामांनाहि आमचे हात एकत्र लावूं शकूं.

यासाठीं या प्रश्नावर पुनः पुनः विचार होणें अवश्य आहे. वास्तविक पाहतां स्वर्गीय महात्मा गांधी अथवा पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या ग्रंथांत सुद्धां हिंदुसंस्कृतीचाच गौरव आढळत असतो, हिंदुसंस्कृतीचीच उपासना सांगितलेली असते. जे समाजवादी आहेत तेहि Values, नैतिकमूल्यें इत्यादि परिभाषेनें याच संस्कृतीचा उदय करूं इच्छित असतात. ज्यांचा उदयास्त रशियाबरोबर जोडला गेलेला आहे आणि रशिया-छाप साम्यवाद (Communism) म्हणजेच विश्वबंधुत्व अशी धारणा

ज्यांची झालेली आहे असे कांहीं साम्यवादी कम्युनिस्ट सोडून दिले तर बाकीच्या विचारी साम्यवाद्यांमध्यें, या देशाच्या खऱ्या राष्ट्रीयत्वाबद्दल विचार केला पाहिजे अशीच भावना निर्माण झालेली आहे. रशियानें प्रथमारंभीं राष्ट्रविचाराचा त्याग केला होता; पण थोडक्याच दिवसांत Communism within a single country is possible असें म्हणन राष्ट्रविचारांचीच कांस त्यानें पुनः धरली. 'पीटर दि ग्रेट, सुव्हराव, कुटझॉव टॉलस्टॉय, लेनिन आदींच्या परंपरेंत जन्मलों ते आम्ही रशियन' असें त्यालाहि म्हणावें लागलें. हें उदाहरण समोर आहेच. चीनमध्येंहि राष्ट्रविचाराच्या ओघांतून साम्यवाद येऊं शकला. युगोस्लोव्हियांत साम्यवादी क्रांति झालेली असतांनाहि राष्ट्रीयत्वाचा त्याग करण्यास तेथील पुढाऱ्यांनीं आणि जनतेनें नकार दिला. हें ध्यानांत घेतां हिंदुस्थानांत साम्यवाद येण्यासाठीं येथील राष्ट्रीयत्व सोडण्याची काय आवश्यकता आहे? शरीर राष्ट्रीयत्वाचें आणि स्वभाव साम्यवादाचा असें येथें कां घडूं नये? आणि असें घडावयाचें असल्यास येथील राष्ट्रीयत्व कोणतें? अशासारख्या प्रश्नांचा विचार विचारी कम्युनिस्ट करीत असल्याचें ऐकिवांत येतें. म्हणजे सर्वांच्या मनोमनीं राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेबद्दल एकरूपता दिसते, मात्र ओंठाबाहेर भाषा तेवढी वेगळी उमटते. हें जर खरें असेल आणि यामुळेंच परस्परांपासून आम्ही इतके दूर गेलेलों असूं तर आपआपल्या विचारांचें पुनः एकदां चिंतन करून त्यांतील साम्य वा एकत्व आम्हीं जाणलें पाहिजे. असें हें परस्परांतील सौहार्द जाणत असतांना मागें आपण अमुक बोललों होतों, त्याच्याशीं आजचा विचार विसंगत ठरेल, एतदर्थ हें चिंतनच नको, असा व्यामोह अथवा अशी पक्षप्रतिष्ठा आड येऊं देतां नये. कारण अशा स्वल्प अडचणींच्या निमित्तानें हिंदुराष्ट्रान्तर्गत भली भक्कम तटबंदी बांधून एकमेकांपासून विलग राहणें देशाला ऊर्जितावस्था आणणारें खात्रीनेंच ठरणार नाहीं.

राष्ट्रीयत्वाच्या या व्यापक भूमिकेवर एकमत घडलें तर कार्य-पद्धतीच्या बाबतींतील मतभेद कार्यहानि करणारे होणार नाहींत यासंबंधीं काडीमात्रहि शंका नाहीं. या राष्ट्रांतील आम्हां सर्व घटकांचें परस्परांवर मनःपूर्वक प्रेम असलें पाहिजे. 'मनुष्यमात्रावरच नव्हे, तर सर्व चराचर सृष्टीवरच प्रम करा' असा जेथें हिंदुसंस्कृतीचा संदेश आहे, तर तेथें स्वतःच्याच समाजबांधवांवर प्रेम न करतां त्यांना दूर लोटणें, परकीय समजणें अथवा

त्यांचा द्वेष करणें असें वर्तन करतां येईल का ? हिंदुत्वावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना हिंदुसमाजांतील प्रत्येक व्यक्ति स्वतःइतकीच प्रिय असली पाहिजे आणि या प्रेमबंधनामुळें कोणत्याहि खऱ्या वा कृत्रिम कारणासाठीं अथवा कल्पना-विलासाच्या भरारीसाठीं या समाजांत भक्ष्य नि भक्षक या स्वरूपाचे वर्ग आपणांस कल्पितां येणार नाहीत. हिंदुसमाजांत विषमता असेल, ती कदाचित् तीव्र स्वरूपाचीहि असेल; ती कमी होणें अथवा नाहींशी करणें हेंहि आवश्यक असेल; पण त्या तीव्र विषमतेसाठीं सुद्धां आम्हांस कोणाचा द्वेष करतां येणार नाहीं. स्वार्थानें प्रेरित होऊन एकादी व्यक्ति वा अनेक व्यक्ति कदाचित् दुसऱ्या कित्येकांच्या जीवनाचा नाश करीत असतील. पण हें कृत्य हिंदु संस्कृतीचा साक्षात्कार त्यांच्यापासून दूर राहिल्यानें त्यांच्या हातून अज्ञानपूर्वक घडत असणार. हिंदु संस्कृतीचा साक्षात्कार त्यांना ज्या दिवशी घडेल त्या दिवशीं त्यांच्यांतील स्वार्थाचा लोप होईल. तेथें माझ्या देश-बांधवांच्या सुखांत माझें सुख ही भावना निश्चयानें उदित होईल. हिंदु-समाजांत तरी नित्याच्या वर्गद्वेषाला वर्गविग्रहाला जागा नाहीं.

हिंदुसमाजांतील कृत्रिम भेद न पाहतां सर्वांवर प्रेम करणें हा आमच्या कार्य-पद्धतींतील पहिला विशेष असला पाहिजे. दुसरें असें कीं विचारांना येथें संपूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. पारमार्थिक बाबतींत जें बुद्धिस्वातंत्र्य हिंदुधर्मानें आपणांतील व्यक्तींना दिलेलें आहे, तेंच विचारस्वातंत्र्य समाज-प्रामाण्याविना अन्य वैचारिक क्षेत्रांत हिंदुराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला असलें पाहिजे, हें उघड आहे. विविधतेमध्यें एकत्व पाहणाऱ्या या संस्कृतींत ठोकळेबाज विचारांची सक्ति करण्याच्या कल्पनेला थारा कोठून नि कसा मिळणार ? समाज-अंतर्गत अशा, पण मूलग्राही विरोधांत सुद्धां हृदयपरिवर्तन हीच पद्धति हवी. राष्ट्रापुढील प्रश्नांवर विविध बाजूंनीं अगदीं मूलगामी विचार केल्यानंतर त्यांतून कार्यान्वित करणारा निर्णय कसा करावयाचा यासंबंधीं भिन्नभिन्न विचारप्रणालींच्या पद्धति भिन्नभिन्न असतीलहि. कांहीं-जण बहुमतानें केलेली निवड निर्णयात्मक समजतील आणि अशा पद्धतीला लोकानुवर्ती–बहुमतानुवर्ती पद्धति म्हणून नांवाजतील; अथवा अन्य कांहीजण सर्व प्रश्नांचा सर्वांगीण, सशास्त्र विचार केल्यानंतर, कोण्या एका उत्तरदायी

व्यक्तीनें निःस्वार्थ नि समाजहितबुद्धीनें केलेला निर्णय संमत करतील, आणि या पद्धतीस एकचालकानुवर्तित्व म्हणून गौरवतील. पण अशा कोणत्याहि विचारपद्धतीला मूलभूत बुद्धिस्वातंत्र्य संमत असणें, आणि केवळ परमत-सहिष्णुताच नव्हे तर अन्यमत धारण करणाऱ्या व्यक्तीबद्दलहि अंतःकरणांतून आत्मीयताच अनुभविणें हेंच हिंदुसंस्कृतीच्या दृष्टीनेंहि विहित असणार यांत शंका नाही.

## ८

गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील राजकारणांत भाग घेतलेल्या कित्येक कार्यकर्त्यांना हें मनांतून पटलेलें आहे कीं, हिंदु हा शब्द केवळ परमार्थ-धर्मवाचक नसून तो प्रामुख्यानें समाजवाचक आहे; या देशांत जीं मूल्यें टिकावींत असें वाटतें, तीं 'हिंदु' शब्दानें दर्शविलीं जातात. तथापि हिंदु-शब्दाला जातीय, संकुचित, सनातनी असा वाईट अर्थ प्राप्त झालेला आहे; हिंदु-शब्द उच्चारल्याबरोबर देशांतल्या कित्येक लोकांच्या डोक्यांत त्या शब्दा-पासून दूर जाण्याची तिडीक उत्पन्न होते; तसेंच या देशांतील अन्य तटस्थ समाज हिंदु-शब्दानें व्यक्त होणाऱ्या कल्पनांशीं एकरूप होण्यास राजी नाहींत, असे त्यांचे आक्षेप आहेत. एवढ्यासाठीं तत्त्वतः हिंदुराष्ट्रविचार कितीहि बरोबर असला तरी या राष्ट्राला 'भारत' आणि राष्ट्रीयांना 'भारतीय' म्हणून संबोधावें असें त्यांचें मत आहे.

या ठिकाणीं असा विचार केला पाहिजे कीं, हिंदु-शब्दाला जातीय आदि वाईट अर्थ आला आहे असें समजलें, तरी तो किती दिवसांपासून? हा गेल्या केवळ २० वर्षांतील राजकारणाचा परिणाम आहे. गेलीं वीस वर्षें चाळीस कोटि हिंदुसमाजांतील दशलक्षांतल्या फार तर एक इतक्या व्यक्तींनीं नेणिवेनें राज-कारणासाठीं हा शब्द दूषित ठरविला म्हणून आम्हींही तो दूषित मानावा का? ती चूक आम्हीं सुधारावयास नको का? हिंदूंच्या शत्रूंनीं हिंदुत्वाचें तेज पांगळें करण्यासाठीं म्हणून या शब्दावर गहजब उडविला. त्याला आम्हीं हिंदूंनीं बळी पडून स्वतःचा तेजोभंग करून घ्यावा का? वीस वर्षांच्या अप-प्रचारानें या शब्दाला वैगुण्य आलें आहे असें वाटत असेल, तर मोकळ्या मनानें येत्या वीस वर्षांत त्याचें यशोगान दाही दिशांना दुमदुमवून टाकावें. म्हणजे आतां क्षणिक वाटणारें हें वैगुण्य अस्तित्वांतहि आलें नव्हतें असेंच भविष्यकाळांत वाटेल.

भारत आणि भारतीय हे पर्यायी शब्द शास्त्रीय दृष्टचा चूक नाहींत, अमान्य असण्याचेंहि कारण नाहीं; पण हिंदुराष्ट्र आणि हिंदु या शब्दांमागील सामर्थ्य त्यांच्यांत नाहीं. ४० कोटि हिंदूतील बहुसंख्यांना या शब्दांची अनुभूति नाहीं. तूं भारतीय आहेस का, म्हणून खेडचांपाडचांत जाऊन विचारलें तर लोकांना त्याचा अर्थ समजत नाहीं. त्यांना आपण 'हिंदु' हें कळतें. भारतीय हा शब्द केवळ ग्रांथिक आहे; त्याच्यामागें हिंदु-शब्दामागचें सामर्थ्य नाहीं. बहुजनसमाजाला प्रचोदना देण्यासाठीं त्यांच्याच भाषेतून बोललें पाहिज असा आमचा आग्रह असतो. तर मग ४० कोटींना जो शब्द समजतो आणि ज्याच्यामध्यें सहस्रावधि वर्षांच्या परंपरेचें सामर्थ्य सांठलेलें आहे, तो शब्द आम्ही कां टाकून द्यावा आणि त्याऐवजीं दुसरा कां घ्यावा ? दुसरें असें कीं भारत आणि भारतीय या शब्दांना तडजोडीचा वास मारत आहे. भारत आणि भारतीय यांचा नेमका अर्थ एवढा निश्चित झालेला आहे कीं, जें केवळ हिंदूपुरतें नाहीं तें; थोडक्यांत हिंदु आणि हिंदुत्व या जातीय कल्पना वगळून जें शिल्लक राहतें तें. त्याचेंच नांव भारत आणि भारतीय. अशा स्थितींत हे शब्द स्वीकारणें म्हणजेच प्रादेशिक राष्ट्रवादाला पर्यायानें मान्यता देणें आहे. बरें, ज्या तटस्थ समाजांच्या मनधरणीसाठीं भारत आणि भारतीय हे शब्द वापरावयाचे, ते तरी त्यांचा, मान ठेवतात का ? हिंदुस्थानांतील इंग्लिश वृत्तपत्रांत भारतीय या शब्दाची सरसहा टिंगल चाललेली आढळते. भारतीय म्हणजे सनातनी, भारतीय म्हणजे बुरसलेले हाच अर्थ ते रूढ करीत आहेत. म्हणजे जे दुर्बल आहेत त्यांनीं जरी कोणाची खानसाहेब म्हणून हांजी हांजी केली तरी त्यांना लाथ बसावयाची ती बसणारच. मुख्य मुद्दा हिंदु शब्द अथवा भारतीय शब्द हा चांगला आहे वा वाईट आहे हा नसून, दुबळ्या असलेल्या हिंदूंनीं स्वतःच्या संस्कृतीचा निदर्शक कोणताहि शब्द काढला तरी त्याची किंमत पहिल्याइतकीच राहणार हा आहे.

'हिंदु' हा शब्द गुलाम, दास या अर्थी पर्शियन आणि उर्दू वाङ्मयांत वापरलेला आहे. अतएव तो टाकून 'आर्य' असा शब्दप्रयोग रूढ करावा, असें पूर्वी आर्यसमाजीयांचें म्हणणें होतें. वास्तविक जे विजेते असतात त्यांचे शत्रू त्यांना नेहमींच शिव्या देतात. पूर्वी हिंदु जेव्हां मध्य आशियांतील रानवटांचा

नित्य पराभव करीत होते तेव्हां, आम्हीं मधल्या काळांत ज्याप्रमाणें इंग्रज म्हटला कीं तो चोर, पिळणारा, साम्राज्यवादी असा अर्थ रूढ केला होता, तसाच हिंदु या शब्दाचा चोर, गुलाम असा अर्थ आमच्या शत्रूंनीं रूढ केला. पण आर्यसमाजीयांच्या हें ध्यानांत न आल्यानें, 'सोम्या-गोम्याच्या भावेंत हिंदुशब्दाचा अर्थ वाईट आहे एवढ्यासाठीं तो शब्दच बदला' असें ते म्हणूं लागले. स्वामी विवेकानंद यांनीं त्यांना तडफदार उत्तर दिलें आहे. लाहोरच्या व्याख्यानांत ते म्हणतात—

'आपला जे द्वेष करीत आले त्यांनीं हिंदु शब्दाला वाईट अर्थ चिकटविला असेल. पण त्याचें काय ? " हिंदु " या शब्दानें जें जें आध्यात्मिक, गौरवाचें, सन्मानाचे आहे त्याचा निर्देश होतो, कीं जें जें लज्जास्पद, भिकारडें, पायतळीं तुडविलेलें आहे त्याचा बोध होतो, हें आम्हांवरच अवलंबून आहे. आज हिंदु शब्दाला कांहीं वाईट अर्थ प्राप्त झाला असेल तरी हरकत नाहीं. कोणत्याहि भाषेंतील सर्वांत गौरवपूर्ण असणारा अर्थ आपल्या कृतीनें हिन्दु शब्दाला आणून देण्यासाठीं आपण सिद्ध होऊंया .'

' हिंदु ' च्या ऐवजीं इतके दिवस आम्ही हिन्दी शब्दाचा आग्रह धरीत होतों. हा हिन्दी शब्द तरी तटस्थ समाजांना प्रिय होतो का ? त्यांना प्रिय कांहींच नाहीं. हिंदूंचा तेजोभंग करणें एवढेंच त्यांना प्रिय आहे. हिन्दी शब्द प्रिय होता तर राष्ट्रभाषेला हिन्दी म्हणूं लागल्याबरोबर त्यांच्या पोटांत कां दुखूं लागलें ? अन्यत्र प्रिय आणि योग्य वाटणारा हिन्दी शब्द यथें टाकाऊ कां ठरला ? तेथें हिंदुस्तानी शब्द रूढ करा असा त्यांचा धोशा कां सुरू झाला ? मग जे आम्हांला लाथाडण्यांत तत्पर आहेत त्यांना कवटाळण्यासाठीं तडजोडीचें भिक्षापात्र पुढें पसरीत, स्वतःच स्वतःचा तेजोभंग करीत बसण्यांत काय अर्थ आहे ? त्यापेक्षां या तटस्थ समाजांना स्पष्ट सांगावें कीं, " हिन्दु " या शब्दाचा अर्थ राष्ट्रवाचक आहे; याउपर तो तुम्हांस पसंत नसेल तर सुखेनैव आमच्या देशांतून जा ना ! तुम्हांला सारें जग मोकळेंच आहे. येथें आमच्यावर उपकार करण्यासाठीं राहण्याची कांहींच आवश्यकता नाहीं.

सारांश, हिन्दु आणि हिन्दुस्थान हे शब्द टाकणें हें अपमानाचें आहे. त्यांतून ४० कोटींच्या हृदयांतून हे शब्द उपटून काढण्याचा प्रयत्न केला आणि हिंदुत्वाची अनुभूति न देणारे दुसरे शब्द तेथें ठेवले, तर देशाच्या मानसिक शक्तीवर मोठाच आघात होईल. हिन्दु–हिन्दुस्थान शब्द जातील नि त्याबरोबर हिंदु संस्कृतींतील नैतिक मूल्येंहि हरपतील. अन्तीं हिंदु वंशाचें वंश-चैतन्य जागृत होऊन ते पुनरपि स्वतःला व स्वदेशाला 'हिंदु' 'हिंदुस्थान' म्हणवूं लागेतों शंभर-सवाशें वर्षांचा काळ अंधारमय परिस्थितींत जाईल. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर आम्ही आमचें मानसिक स्वातंत्र्य गमावून बसूं आणि एकदां तें गमावल्यानंतर दुसऱ्या कोणत्या आपत्ति ओढवतील यांचें भविष्य कोण वर्तवूं शकेल ?

९

आतांपर्यंत संक्षेपानें चर्चिलेला हिंदुराष्ट्र-विचार तात्त्विक दृष्टिकोनांतून मांडणी करून विस्तृत स्वरूपांत असा, प्रथम स्वामी विवेकानन्द यांनीं मांडला. तत्पूर्वीं स्वामी दयानन्द यांनींहि याच विचारांतून आर्यसमाजाची स्थापना केली. तथापि विवेकानंदांचें प्रतिपादन सुलभ, रेखीव नि व्यापक झालेलें आहे.'सिन्धूच्या अलीकडे पलीकडे राहणारे ते हिंदु' ही हिंदु शब्दाची फोड प्रथम त्यांनींच केली. विस्तीर्ण अशा या देशांतील विविधतेमध्यें धर्म हेंच आमचें एकमेव समानत्व आहे; युरोपमध्यें राजकीय ध्येयांतून राष्ट्रीय ऐक्य होतें, पण हिंदुस्थानांत धार्मिक ध्येयांतून राष्ट्रीय ऐक्य होतें. धर्म शब्दानें कोणताहि पंथविशेष दर्शवावयाचा नसून मुसलमान आणि ख्रिश्चन ज्यामध्यें जात (caste) म्हणून समाविष्ट होऊं शकतात अशा व्यापक धर्माची कल्पना यांत अनुस्यूत आहे, इत्यादि विचार त्यांनीं मांडले. ते या पुस्तकाच्या प्रारंभीं वाचकांनीं वाचलेच आहेत. या विचारमंथनांत आतांपर्यंत जें प्रतिपादन केलें त्या सर्व प्रतिपादनाला या त्यांच्या उद्धृत केलेल्या विचारांत आधार आहेत हें वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. या विचारांचा अभ्यास वाचकांनीं केला तर स्वामीजींनीं मांडलेला हिंदुराष्ट्र–विचार कोणत्या स्वरूपाचा आहे, किती व्यापक आहे, किती प्रतिभासंपन्न आहे, हिंदु-राष्ट्रापुढें त्यांनीं ठेवलेलें ध्येय किती ज्वलन्त आहे हें कळून येईल.

हिन्दुराष्ट्र-जीवनपटाचे आडवे धागे धर्मबुद्धि, व्यापक तत्त्वज्ञान, सांस्कृतिक विचार हे आहेत, तर त्याचे उभे धागे राष्ट्राचा अखंडपणें घडत आलेला अितिहास, त्यांतील सुखदु:खें,त्यांतील संकटें नि विभवप्रसंग, त्यानें मिळविलेलें यशापयश यांत आहेत. मनुष्य त्याच्या गुणाअितकाच दोषांनीहि परिपूर्ण होतो, उक्ती अितकाच त्याच्या कृतीनेंहि तो मोजला जातो. राष्ट्राचें तसेंच आहे. राष्ट्रजीवन हें तत्त्वज्ञान नि अितिहास या दोहोंनीं परिपूर्ण होत असतें.

जेथें केवळ तत्त्वज्ञान आहे आणि त्या तत्त्वज्ञानाच्या आधारानें विजय प्राप्त करणारे वीर पुरुष जेथ जन्माला आलेले नाहींत, तेथें हा जीवनपट विसविशीत आणि झिरझिरीत राहिला आहे. जेथें केवळ शूर विजेते जन्मले पण तत्त्वज्ञानानें त्यांचा पाठपुरावा झाला नाहीं, तेथें रणजितसिंहानंतर शिखांचें राज्य कोलमडलें त्याप्रमाणें अथवा रजपुतांचें शौर्य कालांतरानें विलयास गेलें त्याप्रमाणें घडतें. एकाविना दुसरें खरोखरी अपुरें आहे. जेथें तत्त्वज्ञान आणि शूर पुरुष यांचें साहचर्य एकाच कालखंडात परस्परांना साहाय्य करीत उदय पावतें, तेथें राज्यनिर्मिति, धर्मरक्षण हीं दोन्ही घडतात. जेथें संस्कृति आणि अितिहास या दोन्ही क्षेत्रांतील श्रेष्ठ पुरुष नित्य जन्माला येतात, तो देश कधींहि परतंत्र होत नाहीं,तो देश सदैव भरभराटीसच जातो, तेथें मानव देवत्वास पोहोंचतो.

असे श्रेष्ठ पुरुष आम्हांमध्यें जन्माला येवोत ! उषासूक्तें गाणाऱ्या ऋषींपासून विवेकानंद आणि त्यांनंतरचे हिन्दु संस्कृतीचें गुणगान गाणारे ब्रह्मवेत्ते आम्हांस प्रिय असोत, त्यांनीं प्रतिपादिलेल्या तत्त्वविचारांनुरूप आमचें जीवन घडो ! श्रीरामकृष्णादि अवतारी पुरुषांपासून श्रीशिवछत्रपति नि त्यांच्यानंतर जन्मलेले,हिंदुत्वाचा विजय करणारे वीर पुरुष आम्हांस प्रिय असोत, त्यांच्या ध्येयनिष्ठेचें, आशा-आकांक्षांचें पूजन आम्हांकडून घडो !

आजच्या हिंदुस्थानची आवश्यकता हीच आहे. ब्रह्मर्षी रामकृष्ण जन्मले, विवेकानंद जन्मले,पण हिंदुत्वाचा ध्वज रणांगणांत विजयी करणारा शूर पुरुष शिवराया अजून जन्मला नाहीं. तो जर जन्मता तर आज हिन्दुसमाजांत दिसणारी दुर्बलता, आत्मविश्वासशून्यता. निरुत्साहिता, किंकर्तव्यमूढता हीं दिसलीं नसतीं. येथील बुद्धिमान् लोक परधार्जिणे

झालेले असतात, स्वदेशाचा साक्षात्कार त्यांच्यांत नसतो, तसें घडलें नसतें; स्वराष्ट्राभिमान्यांत जी कर्तृत्वशिथिलता आढळते, गगनभेदी प्रतिभेची उणीव सांपडते, ती सांपडली नसती. शिवछत्रपतींचा पराक्रम डोळ्यांदेखत घडला असता, तर अशा शूरपुरुषांचा वारसा म्हणजेच अप्रतिहत, नवनवोन्मेषशालिनी विजय-मनीषा, ती पदोपदीं दृष्टोत्पत्तीस आली असती आणि त्या थोर ब्रह्मर्षींचीं मनोवांच्छा म्हणजे विश्वविजयाकांक्षा, तिचा उत्साह मनांमनांतून ओसंडत असलेला दिसला असता.

अहो विवेकानंद ! आपल्या गुणगानानें आम्हांमध्यें हे सद्‌गुण उत्पन्न होऊं देत ! हा समाज खऱ्या बुद्धिनिष्ठेच्या, खऱ्या श्रद्धेच्या पायावर उभा राहून संघटना, पराक्रम आणि विश्वविजय यांचा उपासक बनूं दे ! आपण म्हणालांत कीं, ' या देशांतील एक कुत्रा सुद्धां जोंपर्यंत भुकेला आहे तोंपर्यंत मला मुक्ति नको; मी पुनः पुनः जन्म घेऊन या देशाची सेवा करीन. ' या देशांतलें दैन्य अजूनहि पुरतें संपलेलें नाहीं हें आपण पाहतां ना ? मग आपण पुनरपि भारतांत या. येतांना श्रीशिवछत्रपतींना घेऊन या. अभेद्य, चतुरस्र, विजयशाली संघटना करून या देशाचें दैन्य नित्याचें विलयास न्या. पुरातन असलेली हिन्दु संस्कृति येथें पुनः एकदां प्रकर्षानें नांदूं द्या ! मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव आणि सर्वांआधीं राष्ट्रदेवो भव या नमनांचे निनाद चोहोंकडून कानीं पडूं द्यात ! जें ईश्वरतत्त्व माझ्यांत आहे तेंच माझ्या पलीकडच्या बांधवांत आहे हें उमगल्यानें त्याला वगळून कोणतेहि ऐहिक वा पारमार्थिक भोग भोगण्याची लालसा आमच्या मनांत न उरूं द्या ! प्रत्येक अंतःकरणांतून त्याच आत्मतत्वाचें स्फुरण होऊं द्या ! उपनिषदांचें तत्त्वज्ञान घरांघरांतून गायिलें जाऊं द्या ! आणि ' कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ' हा ध्येय–मंत्र आमच्या हातून प्रत्यक्षांत उतरूं द्या ! अन् भक्तिपूर्ण, कृतसमर्पण अंतःकरणानें आमच्या तोंडून नित्य असेंच गान होऊं द्या कीं––

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती,<br>
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती ।<br>
धर्म, राजकारण समवेत चालती<br>
शक्ति, युक्ति एकवटुनि कार्य साधिती ।<br>
यत् नामा परिसुनि रिपु शमितबल, अहा !<br>
प्रिय अमुचा हिंदु हिंदु ! हिंदु देश हा ! ॥

१०

विचारमंथन येथें संपलें. या विचारमंथनामध्यें स्वामीजींनीं आपल्या व्याख्यानांतून वेळोवेळीं जे विचार मांडले, त्यांतील एकसूत्र जाणून त्या सूत्राची सुसंगत, सुस्पष्ट निष्पत्ति करण्याचा प्रयत्न केला आहे. ' फोडिलें भांडार, धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ।।' अशीच स्थिति येथें आहे. हिंदुराष्ट्र-विचार हा स्वामीजींच्या अंतःकरणाचा ठाव घेणारा विचार. तेव्हां हिंदुराष्ट्राचें पूजन केल्यानेंच स्वामीजींना आदरांजलि अर्पण केल्याचें पुण्य लाभेल हें जाणून, हें पूजन करण्याचा अल्पस्वल्प प्रयत्न येथें केला आहे. या पूजनार्थ वापरलेलें उपकरण-लेखणी ओबडधोबड आहे. अमृताचीं अक्षरें त्यासाठी मेळवावींत, पण प्रतिभा लंगडी आहे; अितकेंच काय, पण पूजनाला जें अत्यंत अवश्य-अंतःकरण-तें परिपूर्ण भक्तीनें, परिपूर्ण श्रद्धेनें भरलेलें नाहीं. अहो विवेकानंद, असें हें अर्धवट झालेलें पूजन आपणांस आवडेल का? आपणांस संतोष देईल का ?

हिंदुराष्ट्रमंदिरांत हेंच पूजन सतत चाललें आहे. तेथें केवढी तरी गर्दी झाली आहे ! ज्यांनीं जीवनांतील पावित्र्यानें दशदिशा उजळून टाकिल्या, ते ब्रह्मर्षि प्रत्यक्ष गाभाऱ्यांतच आहेत. ज्यांनीं स्वतःच्या पराक्रमानें मातेच्या पुत्रांना धर्माच्या, वैभवाच्या सिंहासनावर स्थापिलें, तेहि तेथेंच आहेत. ज्यांनीं झुंजतां झुंजतां आयुष्येंच्या आयुष्यें मातेच्याच चरणीं अर्पण केलीं अशांनीं सभामंडप दाट भरून गेलेला आहे ! आंत चोहींकडे सुस्वर मंत्रघोष, जयघोष नि पुष्पसमर्पण चालू आहे.

ज्याच्या जीवनाला पावित्र्यानें पुनीत केलेलें नाहीं, राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं जीवन समर्पण करण्याची संधि ज्यानें संपादिलेली नाहीं, देशवैभवार्थ ज्याचें तनमन झिजलेलें नाहीं, त्यानें चोखामेळ्याप्रमाणें बाहेर उभें राहून कळसाच्याच दर्शनांत धन्यता मानली पाहिजे. तेथूनच हातांतलें रंगरूपरसगंधहीन असें पुष्प, या दरिद्रयानें मंगलमय मातृभूमीच्या, प्रेमस्वरूप जगदंबेच्या पायीं वाहिलें पाहिजे आणि विनविलें पाहिजे—

वंदनाके इन स्वरोंमें
एक स्वर मेरा मिला लो ।

ॐ

# उपसंहार

## आक्षेप-विचार

स्वामी विवेकानंद यांनीं हिंदुराष्ट्र हा शब्दप्रयोग एकदांच नव्हे तर अनेकदां योजून, अव्वल इंग्रजीमध्यें जवळ जवळ पहिल्यांदांच अितक्या स्पष्टपणें मांडणी करून, या हिंदुराष्ट्राची मूलभूत धारणा काय आहे याबद्दलचे विचार रेखीवपणें ग्रथित केले. त्या त्यांच्या विचारांमधून हिंदुराष्ट्रीयत्वाबद्दलची भूमिका कशी पूर्णत्वानें प्रकट होते हें विचारमंथन या प्रकरणांत दाखविलें आहे. हें असें असलें तरी कांहीं ग्रंथनिरीक्षकांचें एक म्हणणें असें पडलें कीं, स्वामीजींनीं चुकून कोठें तरी हिंदुराष्ट्र शब्द वापरला तो संदर्भरहित रीतीनें लेखकानें उचलून घेऊन त्याच्यावर कसलें तरी भारूड रचण्याचा म्हणजे हिंदुराष्ट्रीयत्वाची चर्चा करण्याचा—'अयशस्वी प्रयत्न' केलेला आहे. दुसरें म्हणणें असें कीं, स्वामीजींचे जे विचार 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' या ग्रंथांत परिशिष्टामध्यें दिलेले आहेत, त्यांतून कांहींहि अर्थ-बोध होत नाहीं.

निरीक्षकांच्या या विधानाचा सहानुभूतीनें विचार करूनहि असे वाटतें कीं, एकदां दोनदां नव्हे तर पांच–पन्नास वेळीं हिंदुराष्ट्र–हिंदुराष्ट्र हा शब्दप्रयोग स्वामीजींच्या बोलण्यात आला तो लेखकानें दिलेल्या अर्थानुरूप नसून स्वामीजींनीं तो वेगळया अर्थानें कसा वापरला आहे, लेखकानें ठिकाठिकाणीं संदर्भाला कसें डावललें आहे हें जर कोणी टीकाकार दाखविता तर त्याच्या टीकेचें सप्रमाणत्व प्रकट झालें असतें; हिंदुराष्ट्र-विचारांच्या चर्चेत तात्त्विक विसंगति काय आहे, हें जर कोणी लिहिता तर त्यालाहि उत्तर देणें अवघड झालें नसतें; स्वामीजींच्या विचार-गंगेंतून थोडींथोडकीं नव्हेत तर पन्नास पानें मजकूर निवडून स्वामीजींचे हिंदुराष्ट्रासंबंधी काय विचार होते तें दाखविलें हें उतारेच खोटे आहेत असें कोणी लिहिता तर त्यालाहि उत्तर देतां आलें असतें, पण असें न करतां केवळ मोघमपणें आक्षेप घेतले गेल्यानें विचारसंघर्षांतील एक बाजूच तोटकी पडलेली आहे हें उघड आहे. तथापि त्याचा विचार मनांत न आणतां निःपक्षपातीपणानें स्वामीजींच्या विचारांचें एकूण सूत्र काय याचा येथें पुनः एकवार शोध घ्यावा असें योजिलें आहे.

## स्वामीजींच्या विचारसरणीचें सार

हा पन्नास पानें मजकूर वास्तविक अितका स्पष्ट आहे कीं, त्यांतील सार शालान्त परीक्षेला बसणाऱ्या कोणाहि विद्यार्थ्याला काढतां यावें. तथापि राष्ट्रद्रष्ट्रे विवेकानंद या ग्रंथाच्या कांहीं परीक्षणकारांना हें सार सांपडलें नाहीं. स्वामीजींच्या उद्धृत केलेल्या विचारांचें सार खालीलप्रमाणें आहे:–

१. हिंदु हे उत्तर ध्रुव किंवा आशिया मायनर अशा कोणत्याहि हिंदुस्थान-बाह्य प्रदेशांतून आलेले नाहींत. हिंदु हिंदुस्थानांतीलच आहेत.

२. सिंधु नदीवरून हिंदु हे नांव उत्पन्न झालें.

३. मुळांत एकवर्ण असलेला हा समाज पुढें चतुर्वर्णांत परिणत झाला.

४. शूद्र व द्रविड हे मूळचे आर्यच. द्रविड म्हणून कोणताहि वेगळा वंश नाहीं.

५. एका वर्णांतून अनेक वर्ण झाले. यापुढें अनेक वर्णांतून एका म्हणजे ब्राह्मण वर्णाकडे जावयाचें आहे. जातीजातींमधील बंधनें ही दृढ आणि पक्कीं नसून लवचिक आणि विकासाला वाव देणारीं आहेत.

६. संस्कृत भाषा ही आमच्या संस्कृतीची निदर्शक असून तिचा अभ्यास सर्व वर्णांतील स्त्री-पुरुषांनीं केला पाहिजे, त्यांतील अध्यात्म-विचारांचें ग्रहण केलें पाहिजे.

७. आमच्या समाजाची अथवा राष्ट्राची प्रेरक शक्ति ही राजकारण वा अर्थकारण इत्यादि गोष्टींत नसून ती धर्मामध्यें आहे. या धर्मचैतन्याला हात घातल्याविना समाज जागा व्हावयाचा नाहीं.

८. हा धर्म म्हणजे नीतिनियमांचे जुडगें नसून अध्यात्मनिष्ठ, अत्यंत व्यापक व सर्व विचारभेदांचा संग्रह करणारा असा आहे.

९. म्हणून भविष्यकालीन हिंदुस्थानांत एकच एक अशा या व्यापक धर्माला या टोकापासून त्या टोकापर्यंत मान्यता मिळणें आवश्यक आहे.

१०. 'अल्ला हो अकबर' या आरोळ्यांनीं शेंकडों वर्षे आकाश कुंद होऊन गेलें असतांना, आपलें आयुष्य कोण्या क्षणीं संपेल याची शाश्वती कोणाहि हिंदूला राहिली नसतांना, आपण (हिंदु) जवळ जवळ जसेच्या तसे खडे आहोंत, याचें कारण आपल्यांतील धर्मचैतन्य.

११. हिंदु समाजांतील विघटनेचें कारण धर्म नसून धर्माबद्दलच्या विपरीत कल्पना हें आहे.

१२. हिंदुधर्मांतून परधर्मांत गेलेल्या लोकांना स्वधर्मांत घेतलें पाहिजे. कारण, हिंदुसमाजांतून गेलेली प्रत्येक व्यक्ति हिंदूंची संख्या एकाने घटविते एवढेंच नसून शत्रूची संख्या एकानें वाढविते.

१३. जे निखालस परकीय आहेत त्यांनासुद्धां हिंदुत्वांत घेतलें पाहिजे.

१४. हिंदुस्थानानें सर्व जगामध्यें जाऊन अध्यात्म शिकविलें पाहिजे, आणि पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान, त्यांची संघटनकुशल वृत्ति या गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.

१५. पाश्चात्यांची भ्रष्ट नक्कल करण्यांत देशाची हानि आहे. खरी सुधारणा आंतून झाली पाहिजे.

१६. हिंदुसमाजाची संघटना केल्याशिवाय या देशाचे प्रश्न सुटणार नाहींत.

१७ या संघटनेच्या योगें आम्हीं निर्मत्सर, विद्याभिमुख आणि समाजसेवारत झालें पाहिजे.

१८. बहुमत-निर्णय-पद्धति ( Democracy ) ही कितीहि चांगली असली तरी आपल्या देशाच्या आजच्या स्थितीमध्यें वर उल्लेखिलेल्या संघटनेनें एकाधिकार( Dictatorship )–पद्धतीचा अवलंब केला पाहिजे.

१९. देशाभिमानानें ज्यांचीं हृदयें उचंबळून येतात असे प्रचारक निर्माण करून ते सर्व देशभर धाडले पाहिजेत् आणि त्यांनीं पक्षभेदातीत अशी संघटना घडवून आणली पाहिजे.

२०. तात्त्विक दृष्टचा अद्वैताचें तत्त्व आम्हांस पूर्णपणें कळलें असलें, तरी व्यावहारिक दृष्टया सर्व समाजांत समता पाहणें म्हणजेच व्यावहारिक अद्वैताची उपासना करणें हें आम्हांस शिकावयाचें आहे.

## स्वामीजी हिंदुराष्ट्रद्रष्टे कीं हिंदी-राष्ट्र मताचे

हे सूत्रबद्ध विचार पाहिल्यानंतर स्वामीजी हिंदुराष्ट्रद्रष्टे होते अथवा नाहीं याबद्दल किंचित्हि संभ्रम राहण्याचें कारण नाहीं. तथापि गेल्या ३०–३५ वर्षांमध्यें या देशांत हिंदुत्वाचा त्याग करून, हिंदु–मुसलमान–ख्रिश्चन या सर्वांचें एक निधर्मी रसायन तयार करावें, अशी जी प्रवृत्ति निर्माण झाली आहे, तिचे उत्पादक असलेल्यांना स्वामी विवेकानंद हे ' हिंदुराष्ट्रद्रष्टे ' होते असें म्हटलेलें आवडत नाहीं. त्यांच्या मतें स्वामी विवेकानंद हे 'हिंदी राष्ट्र ' मताचे, समन्वयाचे पुरस्कर्ते होते.

या त्यांच्या म्हणण्याकरता प्रत्यक्ष पुरावा म्हणून कोणीहि कांहींहि पुढें मांडलेलें नाहीं. तथापि या संभ्रमाचें संपूर्ण निरसन करण्याच्या दृष्टीनें स्वामीजींनीं मुसलमानांच्या संबंधीं काय काय म्हटलेलें आहे याचें परीक्षण पुढें केलें आहे. तत्पूर्वी हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, स्वामीजी हिंदुराष्ट्रद्रष्टे होते याचा अर्थ ते मुसलमानद्वेष्टे असलेच पाहिजेत आणि ज्याअर्थी

ते मुसलमानद्वेष्टे नव्हते, त्या अर्थी ते हिंदुराष्ट्र–विचाराचे नव्हते असा कोटिक्रम करणें केव्हांहि तर्कसंमत ठरणार नाहीं. हिंदुराष्ट्र-विचार म्हटला कीं त्याच्या मागें मुस्लिमद्वेषाचें शेपूट जोडून देण्याचा उपक्रम गेलीं अनेक वर्षे राजकीय वावदूकांनीं केला असल्यामुळें शुद्ध स्वरूपांतील हिंदुराष्ट्रविचार पाहण्याची आणि ग्रहण करण्याची क्षमता कित्येकाना राहिलेली नाहीं. हिंदुराष्ट्र–विचार हा कोणाच्या द्वेषांतून अथवा प्रतिक्रियेंतून निघालेला नसून तो या समाजाचा, या भूमीचा, म्हणजेच या देशाचा सहस्रों वर्षापासून घडत आलेला स्वाभाविक आविष्कार आहे, हें ध्यानांत घेऊन मग त्यावर विचार व टीका आधारल्या पाहिजेत.

## मुहंमदाच्या चरित्रांतील धोका

स्वामी विवेकानंद मुसलमानद्वेष्टे कधींच नव्हते. ‘ सर्व धर्म परमेश्वराकडेच नेतात ’ या मंत्राचा उद्गाता, मुसलमान धर्म आणि मुसलमान समाज यांचा बहुमान करणाराच होता. तथापि विचारांचें परीक्षण निष्ठुर कसोटीवर करावयाचें असतें. असें करतांना स्वामीजी मुसलमानांबद्दल काय म्हणतात हें पाहण्यासारखें आहे.

अमेरिकेंतील दौऱ्यामध्यें एके जागीं व्याख्यान देतांना ‘योगी हे उच्चतर मानस–शक्तीच्या (Super–conscious state of mind) योगें उत्स्फुरित असें ज्ञान मिळवितात, तें ज्ञान आधिभौतिक नसून आधिदैविक वा आध्यात्मिक असतें, मनापलीकडे जाण्याच्या या स्थितींचें रहस्य न समजतां एकादी व्यक्ति दैवयोगानें, दैववशात् या स्थितींत जाऊन पडते; आणि आपल्याला अशामुळें होणारें हें ज्ञान कोठून झालें हें न कळल्यामुळे तें स्वयंस्फुरित, देवदूताकडून अथवा देवाकडून मिळालेलें ज्ञान आहे असें ती म्हणू लागतें; ’ असें विवेचन करण्याच्या ओघामध्यें स्वामीजी मुहंमदाबद्दल म्हणतात—

‘या स्थितीमध्यें अचानक जाऊन आदळण्यांत एक मोठा धोका आहे असे योग्यांचें मत आहे. मेंदूला धक्का पोंचण्याची भीति यात कित्येक वेळां असते. या अतिमानस भावावस्थेच्या स्थितीची जाणीव न होतां, जे या स्थितीमध्ये जाऊन पडतात ते कितीही मोठे असोत, तुम्हांला ते अंधारांत चाचपडतांनाच आढळतील हें निश्चित समजा.

त्यांना उपलब्ध होणाऱ्या ज्ञानाबरोबरच कांहीं भ्रामक विचार त्यांच्यांत शिरलेले असतात. कल्पनागम्य इंद्रजालामध्यें ते फसतात. " ग्रॅबिएल हा देवदूत आला आणि हराक नांवाच्या स्वप्नांतल्या घोड्यावर बसवून तो मला स्वप्नामध्यें घेऊन गेला. " असें मुहम्मदाचें म्हणणें आहे. तथापि असें असलें तरी कांहीं आश्चर्यकारक सत्यें मुहंमदानें सांगितलीं हें खरें आहे. कुराण तुम्हीं वाचून पाहा. त्यांत आश्चर्यमुग्ध करणाऱ्या सत्यांचें जोडीला भ्रमयुक्त विधानेंहि मिसळलेलीं आढळतील. याची फोड कशी करतां येईल ? त्या मनुष्याला स्फुरण होतें यांत शंका नाहीं. पण तो स्फुरणावर जाऊन आदळला, आपटला, पडला असला पाहिजे. तो कांहीं शिक्षित, अनुभवी असा योगी नव्हता. आपल्या हातून काय घडत आहे त्याचें त्याला ज्ञान नव्हतें.

★ मुहंमदाच्या हातून जगाचें कितपत भलें झालें याचा विचार करा. आणि त्याच्या धर्मवेडानें किती प्रचंड व अपरिमित नुकसान झालें याचा विचार करा ! त्याच्या शिकवणुकीमुळें जे लक्षावधि लोक कापले गेले त्यांचा विचार करा. स्त्रिया आपापल्या मुलांना मुकल्या, मुलें आपल्या आई-वडिलांना मुकलीं, देशच्या देश बेचिराख झाले, कोटिकोटि लोक ठार मारले गेले ! ★

मुहंमदासारख्या मोठ्या प्रणेत्यांचीं चरित्रें या धोक्याची कल्पना आपणांस देऊं शकतील.' (Vol I, page. 184 )

## स्वार्थ नि अनतिकता या द्वैताशीं चिकटलेला धर्म

दुसऱ्या एका प्रसंगीं स्वार्थ हा वाईट कां व कसा याचें वर्णन करतांना 'व्यक्तिगत अशा क्षद्र सुखाच्या मागें लागणें आणि तेंच क्षुद्र सुख शाश्वत टिकावें अशी इच्छा होणें हा नागडा स्वार्थ होय. "मला प्रत्येक गोष्ट मिळेल आणि दुसऱ्या कोणाचीहि मला पर्वा नाहीं" हें या स्वार्थाचें सूत्र असतें,' असें प्रतिपादन करून, श्रीगौतमबुद्धांचा जन्म बहुजनसुखासाठीं कसा होता याचें वर्णन करून स्वामीजी मुसलमान धर्माकडे वळतात—

'मनुष्य जितका अधिक स्वार्थी तितका तो अधिक अनैतिक. वंशाबद्दल, जातीबद्दल हेंच म्हणतां येईल. जी जाति केवळ आपल्या पुरतेंच पाहते ती सर्व जगांत अत्यंत क्रूर, अत्यंत दुष्ट ठरलेली आहे.

★ अरबस्तानच्या प्रेषिताच्या धर्माविना ( स्वार्थ आणि अनैतिकता ) या द्वैताला अधिक चिकटून बसलेला अन्य धर्म नाहीं. आणि ज्यानें अपरिमित रक्तपान केला आणि दुसऱ्या लोकांशीं जो अधिकतर क्रूरपणें वागला असा या धर्मासारखा दुसरा धर्म नाहीं.

"या शिकवणीवर विश्वास न ठेवणाऱ्या मनुष्याला ठार मारावें." असें कुराणाचें वचन आहे; त्याला ठार मारणें ही त्याच्यावर वास्तविक दया आहे ! आणि जेथें सुंदर सुंदर हुरे आहेत, विषयोपभोगांची सर्व साधनें आहेत, असा स्वर्ग मिळविण्यासाठीं या काफरांना मारणें हाच निश्चित मार्ग आहे. ☆

या प्रकारच्या श्रद्धेमुळें केवढा रक्तपात झालेला आहे याचा विचार करा.' ( Vol II, page. 350 )

'एक एक लहान पंथ निघतो, त्याला ईश्वरतत्त्वाचा कांहीं भाग आकलन होतो आणि तो म्हणूं लागतो कीं मला सर्व कळलें, माझें म्हणणें म्हणजेच सर्व ईश्वरतत्त्व ! केवढा हा उर्मटपणा !' असें म्हणून स्वामीजी या उर्मटपणाचें उदाहरण सांगतात,

'या विचारसरणीच्या बाबत मुसलमानांचें उदाहरण स्पष्ट स्पष्ट आहे. पुढें टाकलें गेलेलें प्रत्येक पाऊल तलवारीच्या जोरावरच टाकलें गेलें. एका हातांत कुराण नि दुसऱ्या हातांत तलवार ! "कुराण स्वीकारा, नाहीं तर तुम्हांस मेलेंच पाहिजे." यांत तिसरा पर्याय नाहीं. त्यांचें यश किती नेत्रदीपक होतें हें तुम्ही इतिहासावरून जाणतां. ६०० वर्षांपर्यंत त्यांना कोणी सामना देऊं शकलें नाहीं. आणि नंतर अशी वेळ आली कीं, त्यांना थोपविणें अत्यावश्यक झालें.

इतर धर्म याच पद्धतींचा अवलंब करतील तर त्यांचीहि गत तीच होईल.' ( Vol II, page. 365 )

## मुसलमान धर्मांतील सत्य

'प्रत्येक धर्माला कांहीं एक कामगिरी दिली आहे, प्रत्येक धर्मामध्यें सत्याचा कांहीं अंश आहे,' असें म्हणून स्वामीजी मुसलमान धर्मांत काय सत्य आहे तें सांगतात—

'मुसलमानी धर्माचें उदाहरण घ्या. ज्या क्षणीं एकादा मनुष्य मुसलमान होतो त्या क्षणीं सर्व मुसलमानजगत् कोणताहि भेद मनांत न आणतां त्याचें दोन्ही हातांनीं स्वागत करतें. इतर धर्मांत तसें होत नाहीं. तुमच्याकडील रेड इंडियनांपैकीं जर एकादा मुसलमान झाला तर तुर्कस्तानच्या सुलतानाला सुद्धां त्याच्याबरोबर जेवण्यांत कांहीं दोष वाटणार नाहीं. त्याला बुद्धि असेल तर कोणतेंहि सन्मानपद मिळण्यांत त्याला अडचण येणार नाहीं. पण या देशामध्यें ( अमेरिकेंत ) असें एकहि चर्च मी पाहिलें नाहीं कीं जेथें नीग्रो आणि गौरकाय हे शेजारीं शेजारीं गुडघे टेकून प्रार्थना करीत आहेत. विचार करा याचा ! इस्लाम आपल्या सर्व अनुयायांना सारखेंच लेखतो. मुसलमानी धर्माचें लक्षांत घेण्याजोगें वैशिष्ट्य पाहिलेंत ? कुराणामध्यें अनेक ठिकाणीं आत्यंतिक इंद्रियोपभोगाच्या कल्पना तुम्हांला आढळतील. आढळूं द्यात ! "आपल्या धर्मांतील सर्व घटकांमध्यें व्यावहारिक बंधुभाव असावा" हा सन्देश सर्व जगाला देण्यासाठीं मुहमदी धर्म उदय पावला. मुसलमानी धर्मांतील महत्त्वाचा भाग तो हाच. बाकीच्या, स्वर्ग आणि जीव इत्यादींबद्दलच्या त्यांच्या ज्या कल्पना आहेत तो कांहीं मुसलमानी धर्म नव्हे. तें पाखंड आहे.'

( Vol II page 369. )

'The great teachers of the world' या विषयावर व्याख्यान देतांना कृष्ण, बुद्ध, खिरस्त यांचेबद्दल विवेचन करून, स्वामीजी मुहंमदाबद्दल म्हणतात–

'आणि यानंतर मुहंमद—समतेच्या तत्त्वाचा प्रेपित—याचें आगमन ! तुम्ही विचाराल त्याच्या धर्मांत चांगलें तें काय असणार ? जर त्यांत कांहींच चांगलें नसेल तर तो इतके दिवस टिकला कसा ? चांगलें तेंच जिवन्त राहतें, चांगलें तेंच टिकतें; कारण चांगलें तेवढेंच बलसंपन्न असतें आणि म्हणून तें टिकतें. जर त्या शिकवणुकींत चांगलें कांहींच नसतें तर मुसलमानी धर्म जगला असता तरी कसा ? त्यांत पुष्कळ चांगलें आहे. मुहंमद हा समतेचा–मनुष्य मात्रांतील बंधुभावाचा–सर्व मुसलमानांतील बंधुभावाचा प्रेषित होता.'

(Vol. IV, page 129, Lines 2 to 14.)

याच पानावर २८ ते ३६ ओळींमध्यें हाच मुद्दा पुनः एक वार सांगितला आहे–

‘ मुहंमदानें आपल्या आयुष्यभरच्या वागण्यानें हें दाखवून दिलें कीं, मुसलमानांमुसलमानांमध्यें जात, धंदा, वर्ण अथवा स्त्री-पुरुष या बाबतींत संपूर्ण समानता आहे. तुर्कस्तानच्या सुलतानानें आफ्रिकेच्या जंगलांतून ज्या एकाद्या नीग्रोला साखळदंडांनीं बांधून पकडून आणिलें असेल तोच जर उद्यां मुसलमान झाला आणि त्याच्याजवळ शहाणपण आणि कर्तृत्व असेल तर आपली मुलगी सुद्धां त्याला देण्यामध्यें सुलतानाला कमीपणा वाटणार नाहीं.’

(Vol. IV, page 129, Lines 28–36.)

## हिंदु संस्कृतीचा मुसलमानांवरील परिणाम

मुसलमानांवर हिंदु संस्कृतीचा काय परिणाम झाला याबद्दल प्रतिपादन करीत असतांना स्वामीजी म्हणतात,

‘ आपल्या विजेत्यांना पुनरपि जिंकणें हें हिंदुस्थानच्या भाग्यांतच लिहिलेलें आहे. मुसलमान विजेत्यांच्या बाबतींत हें तर घडलेलेंच आहे. सुशिक्षित मुसलमान हे सुफीपंथी असतात. हिंदु संस्कृतीनें त्यांच्या संस्कृतीच्या अंतरंगांत प्रवेश केला. मुसलमानांनीं शिष्यत्वाची भूमिका पत्करली. प्रसिद्ध मोगल बादशहा अकबर हा तर जवळजवळ हिंदुच होता.’

(Vol. V, p. 120.)

‘ सुफी गोमांस खात नाहींत. अन्य व्यवहारांत सुद्धां ते आमच्याच रीतिरिवाजांनुसार वागतात.’

(Vol V, p. 125.)

‘ वेदान्तांतील उदार धर्मविचारांचा मुसलमानी धर्मावर मोठाच ठसा उमटला आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानी धर्म हा बाहेरच्यापेक्षां अगदीं वेगळा आहे. जेव्हां बाहेरच्या देशांतून मुसलमानी धर्मवेडे या देशांत येतात, आणि आपल्या धर्मबांधवांना हिंदुस्थानांतील ( मुसलमानाविना ) अन्य धर्मीयांच्या बरोबर कसें वागावें तें सांगूं लागतात, तेव्हां (हिंदुस्थानांतील) मुसलमान जमाव खवळतो आणि लढूं लागतो.

( Vol V, p. 234–235.)

३६८४३
१५०८

## विचारांचें सार

वर दिलेल्या उताऱ्यांमध्यें स्वामीजींनीं मुसलमानी धर्मसंबंधीं खालील मतें मांडलेलीं आहेत.

(१) मुसलमानी धर्ममत हें योगशक्तीच्या संपूर्ण आविष्कारांतून उत्पन्न झालेलें नाहीं. त्यामध्यें कांहीं आश्चर्यकारक सत्यें असलीं तरी त्यांत भ्रामक कल्पनांची मिसळ झालेली आहे. मुसलमानांनीं जगाचें जितकें हित केलें त्यापेक्षां कितीतरी अधिक पटींनीं त्यांनीं जगाचें अनहित केलेलें आहे.

(२) मुसलमानी धर्म हा आत्यंतिक स्वार्थीपणा व त्याचमुळें आत्यंतिक अनैतिकता यांत गुरफटला आहे. जे कुराणावर विश्वास ठेवत नाहींत त्यांना ठार मारणें हीच त्यांच्या दृष्टीनें दया आहे.

(३) मुसलमानी धर्मप्रसाराकरितां टाकलेलें प्रत्येक पाऊल तलवारीच्या जोरावर टाकलें गेलें. अखेर त्यांना पायबंद घालणें भाग पडलें. इतर धर्म असेंच करतील तर त्यांचीहि गत तीच होईल.

(४) मुसलमानी धर्मांत कांहींच चांगलें नाहीं असें समजण्याजोगी स्थिति असली तरी मुसलमानी धर्मातील व्यावहारिक समानता ही त्यांच्यांतील चांगली गोष्ट आहे.

(५) मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकण्याचा प्रयत्न केला तरी हिंदूंनीं त्यांना परत जिंकलें. सुशिक्षित मुसलमान हा सुफी-पंथी असतो. त्याच्यावर अद्वैताची छाप असते. अक्बर हा जवळजवळ हिंदुच होता.

(६) हिंदुस्थानांतील मुसलमानांना बाहेरच्या मुसलमानांनीं चिथावणी दिली तर ते असहिष्णु बनतात व लढण्यास उद्युक्त होतात.

स्वामीजींच्या वरील विचारांमधील सत्यता ही प्रत्येक विचारवंताच्या ध्यानीं येण्यासारखी आहे. केवळ क्रमांक ५ आणि ६ या टिपणींतील स्वामीजींचे विचार हें व्यवहारांत तितकेसे खरे ठरले नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. स्वामीजींनीं १८१९-नंतरच्या ज्या काळाचें परीक्षण केलें आहे त्या काळापर्यंत म्हणजे इ. स १८९८-पर्यंत मुसलमानांतील तीव्र असहिष्णुशक्ति आणि आक्रमक, धर्मांध वृद्धि प्रकट झाली नव्हती. हा अनुभव ध्यानांत घेतां, जमवून व सामावून घेण्याच्या हिंदुस्वभाववैशिष्टयास अनुसरून स्वामीजींनीं ही विधानें केली असल्यास त्यांत नवल असें कांहींच नाहीं.

तथापि गेल्या पंचावन्न वर्षांतील घडामोडीचें परिशीलन केलें असतां सुशिक्षित मुसलमानावर अद्वैताची छाप वसली आहे, तो हिंदुधर्माच्या जवळ आला आहे, अथवा हिंदुस्थानांतील मुसलमानाला वाहेरचे मुसलमान चिथावतात तेव्हांच तो चिथतो, हीं विधानें सत्याच्या कसोटीला उतरलेलीं नाहींत हें ध्यानांत येईल. किंबहुना या विधानांच्या उलट सुशिक्षित मुसलमान हा अधिक जात्यंध असतो. आणि हिंदुस्थानाबाहेरील मुसलमानी आक्रमण वृत्ति गोठत चालली असून हिंदुस्थानांतील मुसलमानच तिला चेतविण्याचा प्रयत्न करीत असतात अशीं विधानें कोणीं केली तर तीं चूक ठरण्याचा फारच थोडा संभव आहे.

वर दिलेल्या उताऱ्याखेरीज आणखी तीन ठिकाणी स्वामीजींनीं मुसलमानांसंबधीं उल्लेख केला आहे. दोन ठिकाणीं ( Vol. III.–61, Vo . IV–270) मुसलमान मूर्तिपूजक नाहीत हें म्हणणें खोटें असून ते व्यवहारांत सहस्रोसहस्र फकिरांची व थडग्यांची पूजा करीत असतात असें प्रतिपादन केलें आहे. तिसऱ्या उल्लेखांत (Vol. IV—88) 'मुसलमानी मताप्रमाणें स्त्रियांना आत्मा नाहीं अशी असलेली अमेरिकन लोकांची समजूत चुकीची आहे' असें सांगून खुद्द कुराणांत 'स्त्रियांना आत्मा आहे' असेंच म्हटल्याचें त्यांनी दाखवून दिलें आहे.

## एकुलता एक तथाकथित आधार

ज्या ठिकाणीं मुसलमानांच्यासंबंधी कांहीं चांगलें म्हटलें आहे, आणि ज्या पत्रावरून हिंदु-मुसलमान संस्कृतींचा समन्वय स्वामीजींना अभिप्रेत होता असें गैरसमजानें वाटण्याची शक्यता उत्पन्न होईल, अशा एकच एक पत्राचा तथाकथित आधार पुढें आणता येण्यासारखा आहे. विचारवंतांच्या परिशीलनासाठीं तोही खाली दिलेला आहे.

या पत्राबद्दलची भूमिका ध्यानांत घेणें आवश्यक आहे. इंग्लंड-अमेरिकेचा प्रवास संपवून स्वामीजी हिंदुस्थानांत आल्यावर त्यांना नैनिताल येथें एक मुसलमान सद्गृहस्थ भेटला. या मुसलमान सद्गृहस्थाच्या मनांत स्वामीजींच्याबद्दल दृढ स्वरूपाची भक्ति होती असें दिसतें. स्वामीजींना तो अवतार' समजत असे, किंबहुना 'उद्यां जग तुम्हांला अवतार समजूं लागेल, तथापि आपण अवतारी पुरुष आहात हें मीं, एका मुसलमानानें प्रथम जाणलें याचें स्मरण असूं द्यावे, 'असें तो म्हणत असे.' या गृहस्थानें पुढें मोहंमदानंद

हें नांव धारण करून स्वामीजींचें शिष्यत्व पत्करलें. एवंगुणविशिष्ट अशा या गृहस्थाच्या पत्राला उत्तर देतांना स्वामीजी लिहितात :

अल्मोरा.

माझें प्रिय मित्रवर, १० जून १८९८

तुमचें पत्र मला विचारार्ह वाटलें ! आणि आपल्या मातृभूमीसाठीं परमेश्वर शांतपणें केवढ्या आश्चर्यकारक गोष्टींची रचना करात आहे याचें ज्ञान होऊन अत्यंत आनद झाला.

आपण त्याला वेदान्तिझम् अथवा दुसरें कोणतेहि इझम् म्हणावें; पण हें खरें कीं, अद्वैत तत्त्वज्ञान हा धर्मविचारांतील निर्णायक अंतिम विचार होय. सर्व धर्म आणि पंथोपपथ यांच्याकडे प्रेमानें पाहावयास सांगणारें असें हेंच एक स्थान आहे. भविष्यकालीन सुसंस्कृत मानवजातीचा हाच एक धर्म असेल असा आमचा विश्वास आहे. या अंतिम सत्याला आधीं जाणण्याचें श्रेय हिंदुजातीला मिळूं शकेल, कारण, ती हिब्रू अथवा अरब यांचेपेक्षां जुनी आहे. तथापि ‘आत्मवत् सर्वभूतेषु’ याप्रमाणें खरा आचार करणें हें जें व्यवहारांतील अद्वैत तें सर्व हिंदूंना अद्याप शिकावयाचें आहे.

दुसऱ्या दृष्टीनें पाहता, या ‘समत्व’ तत्त्वाचें रहस्य हिंदु जसें स्वभावतःच स्पष्टपणें खोलवर पाहूं शकतात तसें न पाहतां अथवा समत्ववागणुकींतील अर्थ सखोलतेनें न पाहतां का होईना, पण दैनंदिन व्यवहाराच्या पातळीपर्यंत या तत्त्वाचा अवलंब त्यांतल्या त्यात अधिक अंशानें जर कोण्या धर्माचे अनुयायी करीत असल्याचें आढळत असेल तर तो इस्लाम आणि इस्लामचे अनुयायी यांतच आढळतो असा आमचा अनुभव आहे.

म्हणून वेदान्तविचार हा कितीहि सूक्ष्म आणि विस्मयकारक असला तरीहि त्यांत व्यावहारिक इस्लामची भर पडल्याखेरीज, मानवजातीच्या अफाट जनसंमर्दाला तो उपयोगशून्य आहे, अशी आमची खात्री झाली आहे. आमच्या मनांत मानवजातीला ज्या ठिकाणीं वेद नाहींत, बायवल नाहीं अथवा कुराणहि नाहीं अशा ठिकाणीं न्यावयाचें आहे. तथापि

हें घडेल तें वेद, बायबल आणि कुराण यांच्यांत सुसंवाद उत्पन्न केल्यानें घडेल. मानवजातीला हें शिकविलेंच पाहिजे कीं, विविध धर्ममतेंही त्या अंतिम धर्माचीं, अद्वैताचीं विविध रूपें आहेत; ज्याला जो मार्ग उत्तम रुचतो, तो त्यानें पत्करावयाचा आहे.

आपल्या मातृभूमीसाठीं हिंदुधर्म आणि इस्लाम या दोन विचार-प्रणालींच्या साहचर्यांतच केवळ, वेदान्ताची बुद्धि आणि इस्लामचें शरीर यांतच, आशास्थान आहे.

वेदान्ताचा मेन्दू आणि इस्लामचें शरीर धारण केलेला असा भविष्य-कालीन भारत आजच्या झगड्यांतून, अंदाधुंदींतून, विजयानें, वैभवानें बाहेर आलेला माझ्या अंतश्चक्षूंनीं मी पाहत आहें.

मनुष्यमात्राच्या साहाय्यासाठीं आणि विशेषतः आपल्या या दरिद्री, निरतिशय दरिद्री मातृभमीच्या साहाय्यासाठीं, परमेश्वरानें आपणांस साधनभूत करावें अशी नित्य प्रार्थना करीत असलेला,

आपला

**विवेकानंद.**

वर दिलेलें एकच एक पत्र स्वामी विवेकानंद यांना हिंदु व मुसलमान यांची संमिश्र संस्कृति अभिप्रेत होती या म्हणण्यास कांहीशी पुष्टि देऊं शकेल. विशेषतः ‘ वेदान्ताची वुद्धि व इस्लामचें शरीर यांतच आशास्थान आहे ’ हें वाक्य त्यासाठीं फारच उपयोगी आहे.

तथापि या पत्राचें विश्लेषण काळजीपूर्वक केलें पाहिजे. क्रमानें घेत-ल्यास पत्रामध्यें खालील मुद्दे येतात:—

(१) अद्वैत तत्त्वज्ञान हा धर्मविचारांतील निर्णायक अंतिम विचार होय. भविष्यकालीन सुसंस्कृत मानवजातीचा हाच एक धर्म असेल.

(२) हें अंतिम सत्य प्रथम हिंदुजातीनें जाणलें. तथापि त्यांत ‘आत्मवत् सर्वभूतेषु’ या तत्त्वाप्रमाणें आचार करण्याचें शिकावयाचें आहे.

(३) इस्लामचे अनुयायी या तत्त्वाचें रहस्य न समजतां या तत्त्वाचा अवलंब त्यांतल्या त्यांत अधिक अंशानें करीत असतात.

(४) आपल्या मातृभूमीसाठीं हिंदुधर्म आणि इस्लाम या दोन विचार-प्रणालींच्या साहचर्यांतच आशास्थान आहे.

या चारहि मुद्द्यांचा सरळपणें विचार केला तर हिंदु व मुसलमान यांचीं 'हिंदी' नांवाची मिश्र संकृति बनवावी असा अर्थ स्वमीजींना अभिप्रेत असल्याचें आढळून येणें शक्य नाहीं. एक तर मुहंमदानंद नांव धारण करणारी कोणी एकादीच व्यक्ति अद्वैत-विचारापर्यंत जाऊं शकेल. सर्व मुसलमान समाजच अध्यात्मनिष्ठ अशा अद्वैतभूमिकेवर आरूढ होण्याची कल्पना करणें सर्व मुसलमान समाजानें हिंदुत्व पत्करण्याइतकेंच सोपें अथवा अवघड आहे. अध्यात्मनिष्ठ अद्वैत हा विचारच असा आहे कीं त्याला हिंदु हें नांव देण्याचें टाळलें तरीहि त्याच्या कानामात्रांतून 'हिंदु, हिंदु' हेच पडसाद ऐकूं येतील.

## अर्थवादी गौरव बाजूला काढला पाहिजे

अशा स्थितींत हिंदुधर्म आणि इस्लाम या दोन विचार–सरणींच्या साहचर्यांत आशास्थान आहे, याचा अर्थ अद्वैताच्या तत्त्वज्ञानाबरोबरच हिंदु-समाजानें व्यवहारांतील खऱ्या अद्वैताची वागणूक, मुसलमानांच्याप्रमाण केवळ मुसलमान-मुसलमानांपुरतीच न ठेवितां, 'आत्मवत् सर्वभूतेषु', यच्चयावत् सर्व भूतमात्राशीं करण्यास शिकलें पाहिजे, अशाबद्दलच्या स्वामीजींच्या विधानाबद्दल कोणाचाहि मतभेद होणार नाहीं.

मुसलमान समाजापासून समानतेचें तत्त्व हिंदु समाजानें शिकावें हा वरील विधानांतील खरा अर्थ आहे. मुहंमदानंद नांव धारण करणाऱ्या म्हणजे जवळजवळ हिंदुत्व पत्करलेल्या व्यक्तीला त्याच्या वृत्तीचा गौरव करण्याच्या हेतूनें जें पत्र लिहिलें गेलें आहे त्यांतील गौरवार्थ बाजूला करून नेमका कोणता अर्थ अभिप्रेत आहे हें पाहिलें पाहिजे. अशा वेळीं **'उपक्रमोपसंहारौ योग्यताऽपूर्वताफलम्'** हा न्याय येथें लावला पाहिजे. आतांपर्यंत स्वामीजींचे मुसलमानांसंबंधींचे तेरा प्रमुख प्रमुख असे संदर्भ दिले. त्यांपैकीं पहिल्या तीन संदर्भांत मुसलमानी धर्मामध्ये भ्रांत कल्पना आणि अनीति कशी आहे हें स्वामीजींनीं सांगितलें. त्यांपुढील तीन संदर्भांत मुसलमानी धर्मांत समता हें महत्त्वाचें तत्त्व आहे हें सांगितलें. त्यांपुढील तीन संदर्भांत

हिंदुसंस्कृतीचा मुसलमानांवर काय परिणाम झाला तें सांगितलें. यांशिवाय दिलेले तीन संदर्भ मुसलमान मूर्ति पूजक आहेत आणि त्यांच्या मताप्रमाणें स्त्रियांना आत्मा आहे असें प्रतिपादन करणारे आहेत. तेरावा एकुलता एक संदर्भ वरील प्रकारचा ! या प्रमुख संदर्भांशिवाय स्वामीजींनीं मुसलमानां-संबंधीं जे अनेक स्फुट उद्गार काढले आहेत ते, एखादा अपवाद सोडून दिला असतां, मुसलमानांच्या क्रौर्याचा, हिंदूवरील आक्रमणाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निषेध करणारेच आहेत.

**समानार्थ उदाहरण**

★ मुसलमानांपासून हिंदुसमाजानें समतेचें तत्त्व शिकलें पाहिजे हें जसें स्वामीजींचें म्हणणे आहे तसेंच पाश्चात्य समाजापासूनहि संघटनकुशलता, मोठमोठीं सामर्थ्यें एककेंद्र करणें, तीं नीट हाताळणें आणि हिंदूंच्या प्रकृतिधर्मानुसार सौम्य केलेला आवश्यक असा जडवाद हिंदु समाजानं शिकला पाहिजे असेंहि त्यांचें म्हणणें आहे. ★

(Vol III p 149.)

या संबंधीं एका पत्रांत ते लिहिताता—

‘ With all thier faults the HINDUS ARE head and shoulders above all other NATIONS in morality and spirituality and that with proper care and attempt and struggle of all her disinterested sons, by combining some of the active and heroic elements of the West, with calm virtues of the Hindus, there will come a type of men far superior to any that have ever been in this World. (Vol VIII p. 131–32).

‘ सर्व दोष ध्यानांत घेतां सुद्धां हिंदुराष्ट्र हें अन्य राष्ट्रांपेक्षां नैतिकता आणि अध्यात्म या बाबतीत किती तरी उंच आहे. योग्य काळजी घेऊन या हिंदुराष्ट्राच्या सुपुत्रांनीं प्रयत्न केले, झुज घेतली, पश्चिमेकडून गतिशीलतेचे आणि शौर्याचे सद्गुण घेऊन त्याचा आपल्या शांत गुणांशीं संयोग केला तर आजवर जगात झालेल्या कोणत्याहि मानव-प्रकारापेक्षां अतिशय वरचढ असा मानव-प्रकार निर्माण होईल. ’

७९९

वरील उताऱ्यांत हिंदुसमाज हें एक राष्ट्र आहे हा गोष्ट स्वामी-जींनीं पुनर्घोषित केली असून पश्चिमेकडून कांहीं गुण शिकल्यास हें राष्ट्र फारच विलक्षण बलशाली होईल असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. पाश्चात्य संस्कृतींतून कांहीं गोष्टी शिकल्या पाहिजेत याचा अर्थ हिंदुसमाज आणि पाश्चात्य इंग्लिश समाज यांची मिश्र संस्कृति निर्माण केली पाहिजे अशी सांखळी, मागच्या पत्राला लावण्यांत येणाऱ्या तर्क-विज्ञानावरून कोणी लावूं म्हणेल, तर हा प्रयत्न निखालस वेडगळणाचा होईल.

पश्चिमेकडून हे गुण कसे शिकावे याबद्दल स्वामीजी स्वत:च दुसऱ्या एका ठिकाणीं म्हणत आहेत.

'The old Hinduism can only be reformed through Hinduism and not through the new fangled reform movements. At the same time the reformers must be able to unite in themselves the culture of both East and West.' (Vol. VIII, 316-317).

'परंपरित हिंदुत्वाची सुधारणा केवळ हिंदुत्वांतूनच होऊं शकेल. नव्यानें चालविलेल्या सुधारणा-चळवळींतून नव्हे! मात्र सुधारणा करणाऱ्यांना पूर्व व पश्चिम या दोन्ही संस्कृति स्वत:मध्यें आत्मसात् कर-ण्याचें जमलें पाहिजे.

## अद्वैताची भूमिका

श्री. मुहंमदानंद यांना लिहिलेल्या पत्रांत अद्वैताबद्दल जी भूमिका स्वामीजींनीं मांडलेली आहे तीच भूमिका त्यांनीं अन्यत्रहि मांडलेली आहे. श्री. ई. टी. स्टर्डी यांना लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतात.

'पूर्वमध्यें असो वा पश्चिमेमध्यें असो, अद्वैत-तत्त्वज्ञान हेंच मानवी स्वभावाला मुळांतून सामर्थ्य देईल, खणखणीतपणा आणील आणि भुतां-खेतांची उपासना वा त्याच प्रकारच्या अन्य भ्रामक समजुती यांपासून वांचवील. तुमच्या या मताशीं मी संपूर्णपणें सहमत आहें या तत्वज्ञानाची हिंदुस्थानाला स्वत:ला पश्चिमेइतकीच, प्रसंगीं पश्चिमेपेक्षां अधिकच आवश्यकता आहे.' (Vol. VIII p. 345)

अद्वैत तत्त्वज्ञान हेंच जगाला स्वीकारावें लागेल, पण नुसतेंच अद्वैत पुरेसें नसून तें अध्यात्मनिष्ठ आणि हिंदुधर्मात सांगितलेल्या सर्व अंगोपांगांसह स्वीकारावें लागेल हें स्वामीजींच्या आणखी एका पत्रावरून स्पष्ट होतें.

सुप्रसिद्ध संस्कृत–भाषाभिमानी आणि वेदविज्ञाते श्री. मॅक्समुल्लर यांच्यासंबंधीं स्वामीजी लिहितात––

'मी जें अपेक्षीत होतों तें आलें. माझी कल्पना होती कीं, जरी प्रा. मॅक्समुल्लर हे हिंदुधर्मावर लिहितांना शेवटीं कांहीं तरी नापसंतीचा सूर काढीत असतात, तरी आज ना उद्यां त्यांतील साकल्यपूर्ण सत्य त्यांच्या ध्यानांत आल्याविना राहणार नाहीं. तुम्हांला जेव्हां लवकरांत लवकर जमेल तेव्हां त्यांचें अखेरचें पुस्तक, "वेदान्तिझम्" हें मिळवा. त्यांत पुनर्जन्म आणि तत्सदृश सर्व कल्पना त्यांनीं स्वीकृत केल्याचें आढळून येईल.'

(Vol. VIII, p. 347)

## अद्वैताबद्दलची स्वामीजींची भूमिका

वर दिलेल्या तीन उताऱ्यावरून स्वामीजींची भूमिका अगदीं स्पष्ट होते. अद्वैत अथवा वेन्दान्तिझस् हा धर्म स्वीकारला पाहिजे, तो हिंदुधर्मांत सांगितलेल्या अंगोपांगासह स्वीकारला पाहिजे; हिंदुसमाजाला त्याची नितान्त आवश्यकता आहे आणि आजच्या हिंदुसमाजांत मुसलमानांतील समतेची आणि पाश्चात्यांच्या संघटनवृत्तीची भर पडली पाहिजे अशी स्वामीजींची विचारसरणी आहे. समता आणि संघटनवृत्ति या गोष्टी फारच निकट आहेत हें विचारवंतांना सांगावयास नको. समतेविना व्यापक संघटना होऊं शकत नाहीं, हें लक्षांत घेतां मुसलमान व्यक्तींना लिहितांना मुसलमानी समतेचा व्यवहारांतील अद्वैत म्हणून गौरव केला अथवा पाश्चात्य व्यक्तींना उद्देशून लिहीत असतांना संघटनकुशलता असा शब्दप्रयोग केला तरी दोन्ही गोष्टींचा अर्थ मुसलमान अथवा पाश्चात्य संस्कृतीबरोबर मिश्र संस्कृति उत्पन्न करावी असा नसून हिंदुसमाजाच्या अंतरंगांतून हे सद्गुण येणें अवश्य आहे, हें जें स्वामीजींनीं अन्यत्र प्रतिपादन केलेलें आहे त्याचाच अनुवाद यांतून आहे हें समजूं शकेल. सारांश, 'उपक्रमोपसंहारौ' या न्यायानें पाहतां मुसलमानी धर्ममतांत समतेविना बाकी पाखंड आहे हे प्रतिपादणें म्हणजे उपक्रम, हिंदुसमाजांत ही समता आंतून आली पाहिजे हा उपसंहार

मुसलमानी वृत्तीचा पुनः पुनः केलेला निषेध हा अभ्यास, हिंदुराष्ट्राचा वारंवार केलेली घोषणा ही अपूर्वता आणि कालांतरानें जन्मास आलेली क्रांतिकारकांची चळवळ हें फल होय यांत शंका नाहीं. अखेर अर्थवाद आणि उपपत्ति यांचा विचार करितां व्यक्तिगौरवासाठीं मुहंमदानंदाचा केलेला गौरव सोडून देऊन, वेदान्ताची बुद्धि आणि इस्लामचें शरीर धारण करणें यांतील वाच्यार्थ बाजूला करून, व्यावहारिक वेदान्ताची म्हणजेच समता नि संघटन यांची भर अद्वैत-विचारांत पडून हिंदुसमाज सामर्थ्यसंपन्न व्हावा. हा गर्भितार्थ ध्यानांत घेणें हेंच युक्त आणि तर्कसंगत ठरेल.

### HINDU NATION हा स्पष्ट शब्दप्रयोग

आपल्या अनेक भाषणांत स्वामींजींनीं HINDU NATION हा शब्द-प्रयोग स्पष्टपणें केल्याचीं उदाहरण मागें किती तरी येऊन गेलीं आहेतच. आणखीहि अशीं उदाहरणें येथें दिलीं आहेत, त्यांवरून स्वामीजींची जाज्वल्य हिंदुराष्ट्रभक्ति ध्यानांत येऊं शकेल.

'NO NATION possesses so many laws as the HINDUS......but they never made any doctrines or dogmas in religion! ( Vol. VIII P. 258. )

'हिंदूंच्या इतके विधिनिर्बंध दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहींत. परंतु त्यांनीं धर्माच्या क्षेत्रांत ठरीव सांचा अथवा तत्त्वें केव्हांहि निर्माण केलीं नाहींत.'

" Says the Hindu,... ' Yes, we have buried all the nations of the world and stand to bury all the new races also; because our ideal is not this world but the other. Our ideal is the spirit. That alone exists. Nothing else exists and like Him we live for ever."' ( Vol.VIII P. )

'हिंदु म्हणतो—" हो, आजपर्यंत आम्हीं जगांतले सर्व देश पायाखालीं तुडविले आहेत, आणि येणाऱ्या नव्या जाती, नवीं राष्ट्रें यांनाहि पुरण्या-साठीं खडे आहों. कारण आमचें ध्येय या जगाविषयींचें नसून दुसऱ्या जगाविषयीं आहे. आमचें ध्येय परमात्मा हें आहे. त्यालाच केवळ अस्तित्व आहे. अन्य कांहींहि अस्तित्वांत राहूं शकत नाहीं. आणि त्याच्याप्रमाणें आम्हीहि चिरंजीव होऊं."'

'Why should the Hindu Nation with all its wonderful intelligence and other things have gone to pieces? I will answer you, "Jealousy."'

(Vol VIII p. 307.)

'इतकी विलक्षण बुद्धिमत्ता आणि अन्य गोष्टी असतांना हिंदुराष्ट्र हें तुटून फुटून कां गेलें? मी त्याचें उत्तर सांगतों. "मत्सरामुळें!"'

अमेरिकेंत १८९५ मध्यें दिलेल्या एका व्याख्यानांत बौद्ध धर्माची मूलतत्त्वें अध्यात्मपर असतांना त्यांत भ्रष्टाकार कसा आला आणि तो भ्रष्टाकार आल्यानें हिंदु राष्ट्रानें भ्रष्टट बौद्ध-तत्त्वांची हकालपट्टी कशीं केली याचे विवेचन करतांना स्वामीजी म्हणतात--

' In later years these doctrines of Buddha were forgotten. Going to lands yet unprepared for the reception of these noble truths, they came back tainted with the foibles of these nations. Thus the Nihilists arose--a seat whose dectorine it was that the whole universe, God and soul, had no basis, but that everything is continually changing. They believed in nothing but the enjoyment of the moment, which eventually resulted in the most revolting orgies. That, however, was not the dectrine of Buddha, but a horrible degeneration of it, and honour to the HINDU NATION who stood up and drove it out.'

Swami Vivekananda in America : New Discoveries. Advaita Ashram : Page 493, lines 14 to 24.

'नंतरच्या काळांत बुद्धाच्या या तत्त्वांचा विसर पडला. या उदात्त तत्त्वांचे ग्रहण करण्यास त्या काळांत असमर्थ असलेल्या देशांत हीं तत्त्वें जाऊन, त्या राष्ट्रांतील व्यक्तिचारित्र्यांतील दौर्बल्यांशी संयोग पावून, कलं-

कित होऊन परत आली. त्यांतून शून्यवादी पंथाचा उदय झाला. त्यांच्या मतें सर्व विश्व, परमेश्वर आणि आत्मन् यांच्या अस्तित्वाला कांहींहि आधार नाहीं. मात्र प्रत्येक वस्तुमात्र संततपणें रुपांतरित होत आहे. तत्क्षणीच्या उपभोगापेक्षा अन्य कशावरहि त्यांची निष्ठा नव्हती. यांतून पराकाष्ठेच्या निंद्य अशा वामाचारांची निष्पत्ति झाली. हे वामाचार कांही बुद्धप्रणाली नव्हती, तर तिची भयानक विकृति होती. आणि--हिंदुराष्ट्राचा गौरव असो--त्यानें दृढतापूर्वक या विकृतिला हांकलून दिलें.'

हिंदुराष्ट्रांतील शिल्पकला किती भरभराटलेली होती, मूर्तिभंजक मुसलमानांच्या हातून वांचलेले त्या शिल्पकलेचे तुकडेताकडे देखील मुसलमान अथवा मोंगल अथवा पाश्चात्य शिल्पकलेपेक्षां श्रेष्ठ आहेत याचें विवेचन करतांना स्वामीजी एका पत्रांत म्हणतात—

फर्ग्युसनचीं आणि इतर तज्ज्ञांचीं पुस्तकें मी सध्यां वाचीत आहें. त्यांच्या मतें ओरिसामधील अथवा जगन्नाथमंदिराजवळच्या भग्नावशेषांत सांपडणाऱ्या मानव-कलाकृति सौंदर्य आणि रेखीव अवयव या बाबतींत कोणत्याहि ग्रीक कलाकृतीला हार जाणार नाहींत.

...परंतु तुमच्या स्मरणामध्यें असूं दे, कीं, मूर्तिभंजक मुसलमानानें जवळजवळ सर्व नष्ट केलें आहे. तथापि जे अवशेष आहेत त्यांची मौलिकता युरोपांतील ( कलेच्या नांवावर खपणाऱ्या ) सर्व चिंध्या एकत्र केल्या तरी त्यांच्यापेक्षां अधिक आहे !

नंतरच्या काळांतील मोंगलांच्या इमारती अथवा हिंदुस्थानांतील मुसलमानी स्थापत्यकला प्राचीन काळांतील अत्युत्तम नमुन्यांच्या पासंगालाहि पुरणार नाहींत.'

(Vol. VIII, pp 403-404)

यांत ' मूर्तिभंजक मुसलमान ' असा निंदागर्भ उल्लेख आलेला आहे. अन्यत्र मुसलमानांसंबधींचे किरकोळ उल्लेख म्हणून' जे म्हटले ते असेच आहेत.

आणखी एका ठिकाणीं, ' मुसलमानी आक्रमणाच्या पूर्वीं हें राष्ट्र जव्हां संपूर्ण स्वतंत्र होतें ' असा उल्लेख करून हिंदुराष्ट्राचें शोषण थांबलें तर काय होईल याचें विवेचन स्वामीजी करतात--

'आजच्या " इंग्रजी " (इंग्रजांच्या सत्तेखालील) हिंदुस्थानची कामगिरी काय, तर राष्ट्रीयत्व विसरलेलीं, अर्धवट शिकलेलीं पांचपन्नासशे नवशिक्षित माणसें ! बस्स इतकींच ! आणखी कांहींहि नाहीं. बाराव्या शतकांतील मुसलमान इतिहासकार फेरिस्ता याच्या मताप्रमाणें हिंदूंची संख्या त्या वेळीं साठ कोटि होती आणि आज ती वीस कोटींहूनहि कमी आहे.

... ( या नव्या ब्रिटिश राजवटींत ) लोकसंख्येमध्यें बरीचशी वाढ आहे. परंतु ज्या वेळीं देश पूर्णपणें स्वतंत्र होता--मुसलमानी अंमलापूर्वी तेव्हांच्या इतकी नाहीं. हिंदुस्थानांतील कलाकौशल्य आणि उत्पादन यांतून ( दुसऱ्यांकडून ) कांहींहि हलविलें गेलें नाहीं, तर आज हिंदुस्थानांत आहेत त्यांच्या पांचपट लोकसंख्या येथें सुखानें नांदू शकेल.'

( Vol. VIII, p. 484. )

वरील विविध उतारे वाचून स्वामी विवेकानंद यांचें हिंदुराष्ट्रासंबंधींचें प्रेम किती जाज्वल्य होतें याची कल्पना येऊन वाचकांची खात्री होईल. स्वामीजींना तडजोड कधींहि पसंत पडत नसे. ते तडजोडीचा अतोनात तिटकारा करीत असत. तेव्हां परंपरेनें सहस्रावधि वर्षांपासून चालत आलेलें हिंदुराष्ट्र मोडून परकीय आक्रमकांशीं तडजोड करण्यासाठीं एका नव्या राष्ट्राची, संमिश्र समाजाची आणि निधर्मी संस्कारांच्या इतिहासाची मांडणी करावी हें त्यांना कदापि पसंत पडलें नसतें. असा प्रश्न त्यांच्या कालांत जर उत्पन्न झाला असता तर त्याला त्यांनीं प्राणपणानें विरोध केला असता. स्वामीजींच्या शिकवणुकीचें एक फल म्हणजे बंगालमधील क्रांतिकार्याचा जन्म झाला हें वर म्हटलेंच आहे. डाक्का अनुशीलन समिति ही बंगालच्या क्रांतिकारकांची संघटना. तीमध्यें मुसलमानाला सभासदहि करून घेण्यांत येत नसे.

वर उद्धृत केलेले सर्व विचार पाहून स्वामीजी हिन्दुराष्ट्र-विचाराचे होते कीं तडजोडीवर आधारलेली हिंदु-मुसलमान समन्वयात्मक अशी मिश्र संस्कृति त्यांना प्रिय होती, याचा वाचकांनींच विचार करावा. सर्व पुरावा त्यांच्या समोर आहे. मुहंमदानंद याला पाठविलेल्या पत्राचा वास्तविक

अर्थ काय, त्याला लिहिलेली अद्वैताची भूमिका तशीच्या तशीच श्री. स्टर्डी यांसहि कशी लिहिलेली आहे, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील अद्वैत हिंदूंनीं व्यवहाराच्या क्षेत्रांत आणावें याबद्दल त्यांना काय म्हणावयाचें आहे आणि या सर्वांवरून नेमका अर्थबोध काय होतो याचें परीक्षण आतां त्यांनींच करावें.

स्वामीजींच्या हिंदुराष्ट्रासंबंधींच्या या सर्व विचारांनंतर अजूनहि कांहीं टीकाकार असंतुष्ट राहतील हें शक्य आहे. त्यांच्या कोटिक्रमाचा उल्लेख वर केलेलाच आहे.'हिंदुराष्ट्रनिष्ठा असणें याचा अर्थ मुसलमानांच्याबद्दल द्वेष असणें आणि ज्या अर्थी स्वामी विवेकानंद यांना मुसलमानाबद्दल द्वेष वाटत नव्हता त्या अर्थी ते हिंदुराष्ट्रप्रेमी नव्हते हें उघड आहे,'' असा या टीकाकारांचा कोटिक्रम असतो. या कोटिक्रमानें टीकाकारांच्या तर्कशास्त्रज्ञानाबद्दल जरी आदर उत्पन्न झाला, तरी स्वतःच्या राष्ट्रावर मनापासून प्रेम करीत असतां, यच्चयावत् भूतमात्राबद्दल हिंदु मनाला आत्मीयता वाटते; इतकी उदारता हिंदुमनांत उपजतच बाणलेली आहे आणि प्रतिपक्षाबद्दल आत्मीयतापूर्वक विचार करीत असतांनाहि त्याचें स्वराष्ट्रावर होणारें आक्रमण निश्चयानें आणि धैर्यपूर्वक मोडून काढण्यांतहि हिंदु वीरपुरुषांना अडचण यत नाहीं, मनाची एवढी विशालता येथें आहे, याची कल्पना टीकाकारांना आलेली नाहीं, हें कोणाहि वाचकाच्या ध्यानांत आल्याविना राहणार नाहीं. चाळीस कोटि समाजाचें सहस्रावधि वर्षांपासून चालत आलेलें राष्ट्रीयत्व म्हणजे जातीयता, आणि ज्याला ना शेंडा ना बुडखा, ज्यांत ना स्वाभिमान ना वीरता, ज्यांत ना स्वार्थ ना परमार्थ, ज्याला ना इतिहास ना भविष्यकाळ,तो मिश्र–संस्कृति-वादी, हिंदुसमाजाचा संपूर्ण ग्रास करणारा तथाकथित हिंदी राष्ट्रवाद म्हणजेच खरा राष्ट्रवाद, ही व्याख्या ज्यानें घोटून घोटून पाठ केलेली आहे, प्रत्यक्ष वस्तुस्थितिहि ज्याला बदलवूं शकत नाहीं, त्याला कोण काय सांगूं शकणार ?

## रोखठोक प्रश्न

हिंदुस्थानच्या राष्ट्र-विचारासंबंधीं विचार करतांना समोर असणारे प्रश्न रोखठोक आहेत. (१)मुसलमान या देशांत येण्यापूर्वी म्हणजे वेदकालापासून इ. स. ११००पर्यंतच्या ६०००वर्षांच्या कालांत येथें कांहीं एकात्मता,

कांहीं संस्कृति म्हणजेच राष्ट्रीयत्व नांदत होतें कीं नाहीं ? (२) असें षट्सहस्त्र वर्षांचें कांहीं राष्ट्रीयत्व मुसलमान येथें येण्यापूर्वी असल्यास तें मुसलमानांच्या आगमनानें नष्ट होऊन गेलें आणि मुसलमान प्रतिष्ठित असें नवें राष्ट्र येथें उत्पन्न झालें कीं काय ? (३) तसें नवराष्ट्र उत्पन्न झालें असेल तर श्रीराणासंग, राणा प्रताप, हरिहर व बुक्क, कृष्णदेवराय श्रीशिवछत्रपति, श्रीछत्रपति संभाजी, थोरले बाजीराव, गुरु तेजबहाद्दर, गुरु गोविंदसिंह इत्यादि ज्या धर्मनिष्ठांनीं आणि वीर-शिरोमणींनीं मुसलमानी राज्य अखेरीस उलथून पाडलें,विजेत्यांना धुळीला मिळविलें, ते सर्व देशद्रोही होते कीं काय ? (४) हे वीर-शिरोमणि जर देशद्रोही नव्हते आणि त्यांचे प्रयत्न स्वराज्यसंपादनासाठीं, हिंदवी स्वराज्यासाठीं, हिंदवी पातशाहीसाठीं होते, म्हणजेच निराळ्या शब्दांत ६००० वर्षांपासून चालत आलेल्या राष्ट्रीयत्वामध्यें कांहीं बदल घडलेला नव्हता, तर इंग्रजांचें राज्य १८१८मध्यें आल्यानंतर असें काय घडलें कीं आतां ७००० वर्षांचें, परक्याशीं लढून विजयी झालेलें प्राचीन राष्ट्र भग्न होऊन तेथें दुसऱ्या संमिश्र राष्ट्राची स्थापना झालेली असावी ? (५) केवळ १५० वर्षांच्या इंग्रजांच्या गुलामगिरीमुळें पूर्वींचें ७००० वर्षांचें राष्ट्रीयत्व मोडलें असें म्हणणाऱ्यांना, ज्यांचे लाड करण्यासाठीं या संमिश्र राष्ट्रीयत्वाच्या आत्मविध्वंसक गप्पा करण्यांत आल्या, ते १९४७ मध्यें आम्हांला लाथा मारीत, केवळ मुसलमान संस्कृतीलाच शोभतील अशीं अनन्वित कृत्यें करीत निघून जाऊन स्वतंत्र राज्य, राष्ट्र स्थापून या हिंदुस्थानावर टांगत्या तलवारीप्रमाणें रोख धरून बसलेले दिसत असतांना, त्याची प्रचीति नित्य नवी येत असतांना, अजूनहि संमिश्र राष्ट्रीयत्वाचेच गोडवे गावेसे वाटतात काय ?

या प्रश्नांचीं स्पष्ट उत्तरें विचारवंतांनीं स्वतःच्या मनाशीं दिलीं पाहिजेत. ज्यांना या देशाचाच अभिमान नाहीं, परकीय देशांतून उसनें तत्त्वज्ञान घेऊन उसन्या पैशावर त्यांचा हिंदुस्थानांत ज्यांना प्रसार करावयाचा आहे त्यांनीं वरील प्रश्नांवर उत्तरें काढलेलीं आहेत. त्यांच्या मतें हिंदुस्थान हें यापूर्वी कधींहि राष्ट्र नव्हतें, आजहि तें राष्ट्र नाहीं. आजच्या पूर्वींचा इतिहास हा राजांच्या केवळ व्यक्तिगत राज्यतृष्णेचा आणि एका

वर्गानें केलेल्या दुसऱ्या वर्गाच्या पिळवणुकीचा आहे. त्यामध्यें कोणतेंहि एकसूत्र नाहीं; यापुढें सुद्धां हिंदुस्थान हें एक राष्ट्र व्हावयाचें नसून, राष्ट्रसमूह व्हावयाचें आहे त्या समूहांत आजचे प्रान्त हीं स्वतंत्र राष्ट्रें असतील. ज्यांना हिंदुराष्ट्र मान्य नाहीं असें म्हणावेंसें वाटतें त्यांना घेतां येण्यासारखी भूमिका ही एवढीच आहे. परधार्जिण्या आणि परपुष्ट अशा पंचमस्तंभ्यांची ही भूमिका, हिंदुराष्ट्र मान्य न करणाऱ्या सर्वांना घ्यावयाची आहे कीं काय, याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे.

अथवा या दोन भूमिकांविना हिन्दी राष्ट्रवादाची तिसरी कांहीं भूमिका असेलच तर वर उद्‌धृत केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्या भूमिकेचें शास्त्रशुद्ध मंडन करून दाखविलें पाहिजे. गेले कित्येक दिवस जातीयतेची तुमची व्याख्या तरी लिहून दाखवा, तुमची राष्ट्र-कल्पना नीट मांडून दाखवा म्हणून आव्हान दिलें गेलें असतांनाहि, ही व्याख्या अथवा 'हिंदी राष्ट्र' ही भूमिका सशास्त्र रीतीनें अजूनहि मांडली गेलेली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

## विविध प्रश्नांच्या सोडवणुकीचा मार्ग

आज देशापुढें विविध प्रश्न आहेत; उत्पादनाचे आहेत, मजुरीचे आहेत, राष्ट्रीयीकरणाचे आहेत, शिक्षणाचे आहेत, प्रान्तरचनेचे आहेत, आरोग्यविषयक आहेत, अन्नधान्याचे आहेत, दळणवळणाचे आहेत, नानाविध प्रश्न आहेत. तेहतीस कोटि लोकांमध्यें प्रत्येक व्यक्तीगणिक एक असे तेहतीस कोटि प्रश्न आहेत. या प्रश्नांचें निरसन फुटकळ उपायांनीं, स्थानिक अथवा प्रांतिक योजनेनें होणार नाहीं, तर एकराष्ट्रीयत्वाच्या अभिमानांतून रसरसून आलेल्या, देशभक्तीच्या तेजानें प्रज्वलित झालेल्या लक्ष लक्ष आणि कोटि कोटि बांधवाचे हात देशाच्या बांधणुकीकडे लागणें, स्वार्थत्यागाची परिसीमा गाठून लांचलुचपत, पिळवणूक, राष्ट्रीय चारित्र्यहीनता यांना स्वतःच्या नैतिक सामर्थ्यानें पायबंद घालून, एका बाजूला शेती सुधारणें रस्ते बांधणें, बांधबंधारे घालणें, नानाविध कारखान्यांतून अधिकाधिक उत्पादन करणें अशा रीतीनें देशाच्या लौकिक संपत्तींत भर घालणें, तर

दुसऱ्या बाजूनें शिक्षणाचा झरा, इतिहास-ज्ञानाचा झरा, धर्म-संस्कृतीचा झरा, असे विविध झरे वाहते ठेवून या पंचेचाळीस कोटि जनतेला हिंदुत्वाचा राष्ट्रीयत्वाचा प्रत्यक्ष साक्षात्कार घडविणें, यांतून होणार आहे.

पण यासाठीं आमचे सर्वांचे हात अखिलभारतीय—प्रान्तीय अथवा प्रासंगिक नव्हे—अशा एकाच भूमिकेवरून कामाकडे लागले पाहिजेत. स्वामी विवेकानंद यांची इच्छा हीच होती. सर्व हिंदुस्थानांत एकच एक धर्माला मान्यता मिळावी हा त्यांचा आग्रह होता; ख्रिश्चन अणि मुसलमान यांना जात म्हणून प्रवेश देतां येईल-आणि त्यांनी तसा तो मिळवावा—एवढी हिंदु धर्माची, हिंदुत्वाची भूमिका व्यापक आहे, असें त्यांचें कळकळीचें सांगणें होतें; जागोजाग मंदिरांची स्थापना करा, तेथें ॐ ची प्रस्थापना करा, बाहेर आपआपल्या पंथाचा प्रचार केला तरी मंदिरांत एका ॐ चीच पूजा करा, सर्व पंथोपपंथांत, 'शरीर हें अनित्य असून आत्मा हा चिरंतन, सर्वव्यापी आहे' ही भूमिका समान आहे; ही अध्यात्मनिष्ठ भूमिका आमच्या संस्कृतीचा गाभा आहे, या गाभ्यावर हिंदुराष्ट्राची पुनर्मांडणी करा असा एकूण त्यांचा संदेश आहे.

अंत:करणपूर्वक विचार केला तर यांतील सत्य प्रचीतीला येईल. आज कोणत्याहि पक्षाचा सच्चा हिंदु असू दे, त्याच्या मुखांतून जी भाषा निघते, तींत याच विचारांचे पडसाद आढळतात, केवळ बाह्यांग वेगळेंसें भासतें. विविध अशा सर्व विचारसरणींतून असणारें हिंदुजीवनाचें हें सूत्र मनोमन जाणून आचारांचे, प्रतिपादनांचे अथवा विचारांचे बाह्य भेद कितीहि असले तरी आंतून आमचीं अंत:करणें जुळलेलीं असों देत. 'माझी जीवनधारा पोसण्याचा मला जितका अधिकार आहे, तितकाच स्वत:ची जीवनधारा पोसण्याचा त्याला अधिकार आहे, तो देशद्रोही नाहीं पंचमस्तंभी नाहीं, देशबुडव्या नाहीं, देशभक्तच आहे; माझें त्याचें पटत नाहीं एवढेंच; न पटेना, पण त्यामुळें एकत्र काम करण्यांत उणीव येणार नाहीं; त्याच्या जीवनधारेला जनमतानें उचलून धरलें तरी मला त्याचें

वैषम्य वाटणार नाहीं, माझ्या जीवनधारेचा देशानें स्वीकार केला तर त्याला वाईट वाटणार नाहीं,' असा विश्वास, अशी भूमिका प्रत्येकाची असली पाहिजे. यांतच खरोखरीची सहिष्णुता अथवा सत्यत्व आहे.

स्वामीजींनीं अक्षरशः कंठरवानें म्हटलेलें आहे—

**संगच्छध्वं, संवदध्वं, सं वो मनांसि जानताम् !**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८१९९६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्र. ३६८४३ वि: ग्रंथ
क्रमांक १५०८ नों दि: ६-८-१५

REFBK-0008196

# श्री. वि. वि. पेंडसे यांचीं पुस्तकें

## राष्ट्रद्रष्टे-विवेकानंद

★ स्वामी विवेकानंद यांचें हृदयंगम चरित्र वर्णिलें असून त्यांचें तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत मांडलेलें आहे. विवेकानंदांचा पराक्रम अणि त्यांची शिकवण हें आपलें बलस्थान आहे अशी ग्रंथकाराची दृढ श्रद्धा आहे. चरित्राप्रमाणेंच शेवटचीं परिशिष्टेंहि महत्त्वाचीं आहेत.

**आवृत्ति १ली १९५२** — रु. ६–००

## सरदार हरिसिंह नलुआ

★ इ. स. १८००पूर्वी पेशावर, काश्मीर आणि सारा पंजाब हा भारताचा प्रदेश परकीय आक्रमक मुसलमानांच्या ताब्यांत होता. महाराजा रणजितसिंह यांचे सरसेनापति सरदार हरिसिंह नलुआ यांनीं भीमपराक्रम करून मुलतान, काश्मीर इत्यादि भाग स्वराज्यांत आणून अखेर पेशावर कसें जिंकलें, जुनें पाकिस्तान कसें मोडलें, तेथून काबूलला शह कसा दिला याची रोमहर्षक कथा या चरित्रांत दिली आहे.

**आवृत्ति १ली १९५०** — रु. १–५०

## विवेकानंद आणि इतर कथा

● या कथासंग्रहात एकापेक्षां एक सरस अशा सात कथा असून विवेकानंदांनीं शिकागो येथें हिंदुत्वाच्या केलेल्या जयजयकाराची कथा मुकुटमण्यासारखी आहे. क्रांतिकारकारकांचा सेनापति चंद्रशेखर आझाद याच्या बलिदानाची कथा असून सुभाषबाबूंनीं मंडालेचा किल्ला कसा लढविला याची कथाहि दिलेली आहे.

**आवृत्ति २ री १९६२**

मिळण्याचें स्थान—वि. वि. पेंडसे, ३/२ जुना अथवा नवा ५१४ सदाशिव, पुणें २.